म. ग्र. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६८६

RFFBK-0025218

अधम भूप्रवास
८८८
२५४९८
३०।१२।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1987
1 FEB 1987
15 APR 1987
31 MAY 1987

10 JUL 1987
26 JUL 1987
20 SEP 1987
27 SEP 1987
१।३।८९
27 AUG 1993

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

# नायगाऱ्याच्या पायथ्याशी

सुलभा हेलॅकर

REFBK-0025218

हीरक प्रकाशन

प्रकाशिका

सौ. सीमंतिनी सहस्रबुद्धे
हीरक प्रकाशन
'कला निवास'
हनुमान पथ,
धरमपेठ, नागपूर–४४००१०.

प्रथमावृत्ती :

सप्टेंबर १९८६

© सौ. सुलभा हेर्लेकर

मुद्रक

श्री विजय बढे
श्री विनायक प्रिंटिंग प्रेस,
रामदासपेठ, नागपूर१०.

मूल्य : २५ रुपये

हीरक प्रकाशन क्रमांक २३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

माझ्या समुद्रपल्याडच्या
प्रवासासाठी,

मृत्युचा प्रवास थोपवून
धरणाऱ्या.

माझ्या कै. ती. आईस,

## आत्मनिवेदन

आयुष्यात कुठल्याही गोष्टी कधी जुळवून किंवा घडून झाल्या नाहीत. तसे कधी जमलेही नाही. खरे म्हणजे कवितेत रमणारी मी ! पुढ्यात येईल त्या चागल्या संधीचा उपयोग करुन घ्यावा हे मात्र मनापासून वाटत कॅनडा अमेरीकेला आपण इतक्या लवकर जावू अस जाणवलंही नव्हतं. माझे दीर तिकडे असल्याने कुठल्या तरी कारणाने हा योग येईल अस वाटत होत पण हें जाणं इतक अनपेक्षित एकदम झाल की विमानात कधीच न बसलेली मी २२ तास विमानाचा प्रवास करुन थेट कॅनडात ! तिथे गेल्यावरही खूप काही निराळ घडतय अस वाटलच नाही.

सार सहज घडून आल. सहजपणे प्रवास झाला. हे प्रवासवर्णन लिहू हे सुद्धा वाटलं नव्हत तेही प्रकाशकांनी सहज येऊन घडवून टाकल. ही आयुष्यात येणारी सहजताच मला अनेकदा मोहवून टाकते आणि मग शब्द आकार घेतात ते असे . .

प्रकाशक, मुद्रक, चित्रकार, बरोबरचा सहप्रवासी ह्याच्या सहकार्यातून, मित्रमैत्रिणीच्या प्रोत्साहनातून आणि घरच्या स्वागतातून ... ह्या सर्वांशिवाय हा लेखनप्रवास सुखकर कसा होणार ? त्या सर्वांच्या ऋणातच राहूं इच्छिते.

सुलभा हेर्लेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अवकाशाच्या निळाईत

आयुष्यात कधीही विमानात बसण्याचा योग आतापर्यंत न आल्याने विमानाच्या आतील आणि बाहेरची उत्सुकता कायम डोळ्यात घेऊन आम्ही मुंबई विमानतळावर अेअर इंडिया जम्बोची वाट बघत निरोप द्यायला आलेल्याच्या सूचना घेत घेत बावरलेल्या अवस्थेत उभे होतो. पावसाळा नसतानाही आम्हा उभयतांना साश्रू निरोप देण्यासाठीच की काय धो धो पाऊस बरसत होता विमानतळावर अर्धे ओले सामान आणि थोडे भिजते आम्ही आलो तेव्हा मुंबईचे विमानतळ एखादा रेल्वेचा प्लॅटफार्मच वाटला कुठेही शिस्त नाही, सर्वत्र चिखल ओले वातावरण, भरीतभर कुत्र्याचे आवाज डोळ्यापुढचे विमानतळाविषयीचे रम्य चित्र १५–२० मिनिटातच मिटून गेले आणि रेल्वे प्लॅटफार्मला सरावलेले आम्ही इथेही सरावलो

फॉरीन एक्सचेंज, सामानाचे वजन इत्यादी सर्व रुपातून पार पडून आम्ही जवळच्याच रेस्टारंटमधे चहा प्यायला गेलो निरोप द्यायला आलेल्याच्या सूचना आणि गप्पांच्या नादात पहाटेचे ३॥ कधी वाजले ते कळलेही नाही ४–५० ला विमान सुटणार होते एअर अनाउंसरच्या आवाजातली विमानात बसणाऱ्या प्रवाशांविषयी सूचना मिळाली आणि सर्वांचा निरोप घेऊन आम्ही काचेच्या आत पारदर्शक झालो विमानात चढतेवेळी ' आम्ही सारे भारतीय ' अशा थाटात सर्व प्रवासी येत होते.

माझ्या धास्तावल्या मनाला, हे विमान कोसळणार तर नाही ना ? आणि कोसळले तर नागपूरच्या वृत्तपत्रात आपली बातमी कशी येईल इथपर्यंतचा मनाचा प्रवास झाला. सर्व प्रवासी जागेवर येताच,पट्टा कसा बांधायचा, Head फोन्सवर गाणे कसे ऐकायचे, वगैरे प्रात्यक्षिके झाली या जम्बोमधे अक्षरशः संगीताची मेजवानीच होती. मी सहजच कानाला

## आत्मनिवेदन

आयुष्यात कुठल्याही गोष्टी कधी जुळवून किंवा घडून झाल्या नाहीत. तसे कधी जमलेही नाही. खरे म्हणजे कवितेत रमणारी मी ! पुढयात येईल त्या चागल्या संधीचा उपयोग करुन घ्यावा हे मात्र मनापासून वाटत कॅनडा अमेरीकेला आपण इतक्या लवकर जावू अस जाणवलही नव्हतं. माझे दीर तिकडे असल्याने कुठल्या तरी कारणानें हा योग येईल अस वाटत होत पण हें जाणं इतक अनपेक्षित एकदम झाल की विमानात कधीच न बसलेली मी २२ तास विमानाचा प्रवास करुन थेट कॅनडात ! तिथे गेल्यावरही खूप काही निराळ घडतयं अस वाटलच नाही.

सार सहज घडून आल. सहजपणे प्रवास झाला. हे प्रवासवर्णन लिहूं हे सुद्धा वाटल नव्हत तेही प्रकाशकानी सहज येऊन घडवून टाकल. ही आयुष्यात येणारी सहजताच मला अनेकदा मोहवून टाकते. आणि मग शब्द आकार घेतात ते असे . .

प्रकाशक, मुद्रक, चित्रकार, बरोबरचा सहप्रवासी ह्याच्या सहकार्यातून, मित्रमैत्रिणीच्या प्रोत्साहनातून आणि घरच्या स्वागतातून ... ह्या सर्वांशिवाय हा लेखनप्रवास सुखकर कसा होणार ? त्या सर्वांच्या ऋणातच राहू इच्छिते

सुलभा हेर्लेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अवकाशाच्या निळाईत

आयुष्यात कधीही विमानात बसण्याचा योग आतापर्यंत न आल्याने विमानाच्या आतील आणि बाहेरची उत्सुकता कायम डोळ्यात घेऊन आम्ही मुंबई विमानतळावर अेअर इंडिया जम्बोची वाट बघत निरोप द्यायला आलेल्याच्या सूचना घेत घेत बावरलेल्या अवस्थेत उभे होतो. पावसाळा नसतानाही आम्हा उभयतांना साश्रू निरोप देण्यासाठीच की काय धो धो पाऊस वरसत होता विमानतळावर अर्धे ओले सामान आणि थोडे भिजते आम्ही आलो तेंव्हा मुंबईचे विमानतळ एखादा रेल्वेचा प्लॅटफार्मच वाटला कुठेही शिस्त नाही, सर्वत्र चिखल ओले वातावरण, भरीतभर कुत्र्याचे आवाज डोळ्यापुढचे विमानतळाविषयीचे रम्य चित्र १५-२० मिनिटातच मिटून गेले आणि रेल्वे प्लॅटफार्मला सरावलेले आम्ही इथेही सरावलो

फारान एक्सचेज, सामानाचे वजन इत्यादी सर्व रूपातून पार पडून आम्ही जवळच्याच रेस्टारंटमधे चहा घ्यायला गेलो. निरोप द्यायला आलेल्याच्या सूचना आणि गप्पाच्या नादात पहाटेचे ३. कधी वाजले ते कळलेही नाही ४-५० ला विमान सुटणार होते एअर अनाउसरच्या आवाजातली विमानात बसणाऱ्या प्रवाशाविषयी सूचना मिळाली \आणि सर्वांचा निरोप घेऊन आम्ही काचेच्या आत पारदर्शक झालो विमानात चढतेवेळी ' आम्ही सारे भारतीय ' अशा थाटात सर्व प्रवासी येत होते.

माझ्या धास्तावल्या मनाला, हे विमान कोसळणार तर नाही ना ? आणि कोसळले तर नागपूरच्या वृत्तपत्रात आपली बातमी कशी येईल इथपर्यंतचा मनाचा प्रवास झाला. सर्व प्रवासी जागेवर येताच,पट्टा कसा बांधायचा, Head फोनसवर गाणे कसे ऐकायचे, वगैरे प्रात्यक्षिके झाली या जम्बोमधे अक्षरशः संगीताची मेजवानीच होती. मी सहजच कानाला

हेडफोन्स लावले. आणि त्याच दुसर, ठीक डाव्या बाजूच्या खुर्चीच्या हाताच्या छिद्राला जोडल. तर लताची खास जुनी गाणी ऐकू येऊ लागली. किती वेळ मी लताच्या गाण्यात मग्न होते तेवढ्यात माझ्याच हाताचा धक्का दुसऱ्या बटणाला लागला तर सामुहीक लोकगीत ऐकू आले वेगवेगळे चॅनेलस ! फिल्मीसंगीत, पाश्चात्य संगीत किंवा शास्त्रीयसुद्धा ! गाईड म्हणून एक छोटेसे पुस्तक तुमच्या समोरच ! कुतुहला पोटी सर्वच चॅनेलस फिरवून झाले विमानाने टेकऑफ घेताच मुंबई कशी दिसते म्हणून खाली बघितले तर दूरवर दिवे लुकलुकताना तेवढे दिसले चांदण्याच्या रोषणाईतली ती मुंबईनगरी या पहाटेच्या वेळी कशी शांत वाटत होती संगीताच्या मैफिलीने तृप्त होऊन मलाही झोपेने घेरले होते

अखंड २२ तासाच्या प्रवासात दिल्ली आणि फ्रंकफूट हे दोनच हॉल्ट दिल्ली सोडल्या नंतरच जे अवकाशातल दर्शन असत ते प्रथमच विमानात बसून जाणाऱ्या प्रवाशाला कुतुहलाच असत निदान मला तरी ते उत्कटतेन जाणवल हत्तीच्या कातड्यासारखा पहाडाचा रंग, पर्वताचे शेकडो Geometrical आकार आणि मग नुसत्या ढगाच्या कापूस पिंजलेल्या गुच्छातून जात रहाणं. लहानपणी या कविकल्पनेत रंगलेलं मन प्रत्यक्ष स्वार झाल होत वास्तवात ! या रंगाच्या पार्श्वभूमीवर विमान मधेच पांढऱ्या ढगातून, मधेच पहाडातून तर निळ्या आकाशातून जाताजाता खालीच कुठेतरी मधेच बुध्दीबळाचा डाव मांडावा तसे घराचे गाव दिसायचे. कधी निळ्यागर्द शाईत तर कधी हिरव्या ब्राऊन रंगानी नटलेले खालचे भूवर . मी मधेच एअरहोस्टेसला बोलावून . 'आता आपण कुठल्या देशातून चाललोय' हा प्रश्न विचारायची, तीही हसून सांगायची आता आपण जात आहोत तो रशिया. हा देश अत्यंत सुबक व नीट्स आहे ! 'Thank you' म्हणत माझे डोळे पुन. खिडकीच्या काचेला लागायचे असे कितीवेळ मी रमले होते, बाकीचे प्रवासी सिनेमा enjoy करीत होते 'सौदागर ! मला मात्र निसर्गाच्या सौदागाराची किमया मोहवून गेली

टॉयलेटला जावे म्हणून सर्व प्रवासी न्याहाळत मी टॉयलेटरूमच्या दाराशी पोहचले एवढ्या मोठ्या चंद्रगुप्त जंबोजेट चे हे टॉयलेट यथातथाच

वाटले पण गरसोयीएवजी साथ तर होती एवढच समाधान वाटले. दार उघडून बाहेर आले तो एक थोडचाशा स्थुल मध्यमवयीन बाई फ्रँकफुर्टच्या Duty free shop चे वर्णन दुसरीला सागत होती. ती यापूर्वीही कॅनडाला गेली असल्याने जवळीक वाटली तिलाही 'टोरोंटोला' जायचे होते. 'मॉन्ट्रीयलला' भाऊ घ्यायला येणार होता लगेच एकमेकींचे पत्ते डायरीत उतरले पण तेवढेच नंतर त्या कधीही कॅनडाच्या वास्तव्यात भेटल्या नाहीत

फ्रँकफूर्ट येताच सर्व प्रवाशानी खाली उतरण्याची घाई केली फ्रँकफूर्टचे विमानतळ खूपच मोठे, भव्य आणि देखणे आहे आतरराष्ट्रीय महत्व असल्यामुळे पाकीस्तान वगैरे काही देशाची विमाने तिथे दिसली. धूक बरच होत आणि पाऊसही पडून गेलेला, त्यामुळे विमानतळावर सर्वत्र धूसर पडदा धूक्याचा दाटलेला होता जर्मनीतले यावेळेस दुपारचे १२ वाजून १० मिनीटे झालेले तर भारतातील ४। वाजले होते ह्या विमानात इतक खायला देतात प्रवाशाना, की मला तर शेवटी या पदार्थाचा नॉशीया आला. त्यामुळे फ्रँकफूर्टला खाली उतरताच बरे वाटले पण सर्वत्र एसकेलेटरस् म्हणजे चालण्याचेही श्रम नकोत. आम्ही सर्वच प्रवासी Duty free shop मध्ये जाण्यासाठी उत्सुक होतो. दिव्याच्या झगझगाटात घड्याळ, व्हिस्कीच्या बाटल्या, तऱ्हेतऱ्हेच्या शोभीवत वस्तू याने डोळे दिपून गेले आम्ही दोघही काही घ्यावे का की भारतात परतताना घ्यावे या विचारात असतानाच सकाळी भेटलेल्या सौ. देशपांडे म्हणाल्या 'मला भावासाठी व्हिस्कीची बाटली प्रेझेंट न्यायची आहे, तुमच्या मिस्टराना सागता का बरोबर यायला' त्या एकटयाच होत्या मग आम्ही तिघेही दुकानात पोहचलो वाटल एकीकडे स्त्री मुक्तीच्या गोष्टी करता करताच, एक बाटली घेण्यासाठी सुद्धा पुरूषाचा आधार स्त्री घेतेच सौ देशपाडे याना व्हिस्कीच्या बाटल्या मिळाल्यावर त्या खूष होत्या माझ सार लक्ष फक्त सेंटस्च्या बाटल्या नी चॉकलेटस् कडे होत सेंट हा तर माझा weak point होता सेंटच्या दुकानात तऱ्हेतऱ्हेचे सेंटस् न्याहाळताना सारेच सुगध एकमेकात मिसळून गेले होते मी चार्ली सेंटची बाटली घेतली, आणि इतरही बाटल्याचा उगाचच भाव विचारायला लागले पण ती जर्मन स्त्री मला उर्मटच वाटली, की इंडियन्स बद्दल तिचे मत चांगले नव्हते कुणास ठाऊक !

शेवटी इथले चॉकलेटस् भारतात परतताना मुलासाठी घेऊन जायचे हे ठरवून आम्ही परत विमानाच्या दिशेकडे वळलो यानतर आता एकदम कॅनडातच उतरायचे या कल्पनेने बरे वाटले.फिरून आल्याने फ्रेशही वाटत होते विमानाने ढगातून प्रवास करता करता केव्हा कॅनडा देश दिसू लागला ते कळलेही नाही घर, रस्ते, रगीबेरगी झाडे, आता हळूहळू स्पष्ट दिसू लागले होते हळूहळू मॉँट्रीयलच्या विशाल अेअर पोर्टवर विमान थाबले लगेच विमानाला दोन मोटर जोडल्या गेल्या आम्ही विमानातून थेट त्या मोटार मधे आलो आणि तिथून क्यूमधे उभे राहिलो कस्टम तपासणीसाठी ! सामान घेण्यासाठी! आम्ही, फॉर्ममधेच आमच्या जवळ काही नाही म्हणून सागितल्याने काहीच न तपासता, सरळ सामान घ्यायला गेलो.वरच्या गॅलरीत काचेतून असख्य चेहरे प्रवाशाना न्यायला आलेले हात दाखवत होते. एकीकडे सामानाची काळजी तर दुसरीकडे माझे दीर व जाऊ कुठ दिसताहेत याकडे लक्ष कारण काचेतून सर्वांचेच हात त्याचेच आहेत असे वाटायचे सामान, सर्वांचेच रोलीग कारवर फिरत होते. ४ व ५ नवरच्या कारवर आमचे सामान आहे असे कळले म्हणून तिकडे गेलो ते फिरता फिरताच उचलायचे असते खुप वेळ झाला तरी आमच्या बॅगज् दिसेचना वाटल राहिल ते फ्रॅकफुर्टला ! पण थोड्याच वेळात बॅगज् फिरत आल्या रोलीग कारवरून बॅग उचलणे म्हणजे एक मजेदार अनुभव होता म्युझीकल चेअरच्या खेळासारखा बॅगज् घेऊन आम्ही बाहेर पडलो. आणि एका चक्रव्युहातून सुटल्याचा नि श्वास टाकला अनतभावजी व प्रभा दोघेही आले होते त्यानी चटकन आम्हाला थाबवून त्या अवतारात एक फोटो घेतला इथे असे प्रत्येक थाब्यावर फोटो घेण्याचे वेड लोकाना आहे त्याची कार सर्वात वरच्या मजल्यावर पार्क केली होती एकावर एक कारपार्कीगचे मजले असतात सर्व सारखेच दिसतात

कार सुरु झाली आणि मॉँट्रीयलच्या प्रचड हायवे वरून धावू लागली सर्वत्र स्वच्छ गर्दी नाही, शात रस्ता,कर्कश हार्न नाही आणि इथे ड्रायव्हिग उजव्या बाजूने करतात आणि वाहनेही उजव्याच बाजूने चाल-वतात. डोळ्यात मावेल तितके आजूबाजूचे प्रसन्नपणे मी भरून घेतले. घर जवळ जवळ ४० मैल दूर ! पॉइंट क्लीअरच्या त्या सुबक उपनगरात

वळसे घेत ख्रिसमस ट्रीच्या एका झाडाजवळ गाडी थावली एक अत्यंत देखणे घर दिमाखात उभे होते समोरचे हिरवे लॉन आणि बाजूची पाईन्स ची झाडे सारेच उत्तेजित करणारे घराच्या पायऱ्या चढताना वाटले बाहेरचे अगणच इतके सुदर तर घर कसे असेल ? घरात गेल्यावर कळले की त्याचे घर ते वर्णन करीत त्यापेक्षा अधीक सुदर आहे वर कौलारू, आणि आत लाकडी, तळघरात म्हणजे बेसमेंटमधे वॉशींग मशीन वगैरे, Family Room मधे T. V. सेट, आणि ड्रॉईंग हॉल व कीचन डायनीग जवळ जवळ ! ओअर कंडीशन्ड असल्याने सर्वत्र काचानी बंद ! धूळीचे तर दर्शनच नको घराच्या प्रत्येक दालनात कुंड्या, सुंदर झाडे ! माझ्या कलावत मनाला हे सारे प्रथम दृष्टीतच फार आवडून गेले. वॉश वगैरे घेऊन आम्ही सर्व घर फिरलो तेवढ्यात प्रभा म्हणाली जेवायला चला , ' इतक्यात ? आत्ता तर उतरलो ' मग ती म्हणाली जरा घड्याळ बघ किती वाजलेत ते ! ' बापरे, ९।। रात्रीचे वाजलेत ! ' आणि बाहेर सूर्याच्या लाल धगधगीत गोळ्याचा लालसर सुंदर प्रकाश पसरलेला ! सारी निसर्गाची सायकलच इथे बदलून जाते. आम्ही जेवताना मग इथे कुठल्या भाज्या मिळतात, पोळी म्हणून तुम्ही काय खाता ? याबर गप्पा करता करताच झोपेने अनावर घेरले.

० ०

# इथे मॉन्ट्रीयल मधे

दुसरे दिवशी सकाळी उठलो तेव्हा ८॥ वाजले होते बापरे! म्हणजे ते दोघेही कामावर निघून गेले होते. आणि कीचनचा तावा माझ्या हातात होता. रात्री प्रभानी काही सूचना दिलेल्या होत्याच. मी आमच्या दोघाचा चहा बनवला आणि ' पॉइंट क्लीअर ' मधेच फिरायच ठरवल. आम्ही प्रवासाची कुठलीच आखणी वगैरे केलेली नव्हती दीर ठरवतील तसे आम्ही फिरणार होतो. पण तरीही भारतातून निघताना, ' मी एक स्त्री आहे ' या भूमीकेतून कॅनेडियन स्त्रीचे प्रश्न, तिचे शिक्षण, तिची मत एकूणच तिच करीअरमेड व्यक्तिमत्व मला समजावून घ्यायचेय् असे ठरवले होतेच त्या दृष्टीनेही मला फिरताना ज्या स्त्रिया आढळतील त्याच्या मुलाखती घ्याव्या हाही एक हेतू मनाशी होताच

चहा होताच, जेवण्याची, आघोळीची काहीच घाई नसल्याने आम्ही बाहेर पडलो. तस तर काहीच माहीत नव्हत. सेंट लॉरेंस नदी जवळच, आणि घर सापडेल अशा वाटेवर असल्याने घराला लॉक करुन निघालो थड हवा, मेपल्स आणि पाईन्सची झाड, प्रत्येक घरासमोर ख्रिसमसट्री ची झाड, सुदर असे हिरवे गच्च लॉन- आणि त्यावर रगीबेरगी फ्लॉवरबेडस्. हे सारे दृष्य बघून मला बालकवींच्या ओळी आठवल्या ' हिरवे हिरवे गार गालीचे.. . अगदी दृष्टी खिळवून ठेवावी असा देखावा रस्ते सारे शात, मधूनच फक्त एखादी कार जाताना दिसायची ! प्रत्येकाच्या कौलारु घरासमोर लॉन असणे म्हणजे घराची किमत वाढणे असेच तिकडे समजतात. वाटल की एकाही घराला कपाउड नाही, भित नाही, तरीही कुणी कुणाच्या घरासमोरची सुदर फुले अगर फळे चोरुन नेत नाही नाहीतर आमच्या नागपूरच्या घरी मेंदीचे कुपण सोडून जेवढी रगीत जास्वदी फुल असायची ती कधीच कुणी तोडून नेलेली ! त्या तोडण्यातही त्याना आपण बेशिस्त वागतोय् अस वाटतही नाही पण कॅनडात जरा वेळ घरासमोर उभ राहिल तरी ते लोक चमत्कारीक नजरेन, चोराकडे बघाव तसे पहायचे ! उगाचच उभ राहायला तिथे लोकाना वेळ तरी कुठे असतो ?

आणखी कुणाच्या घरात काय चाललय हे दिसायलाच नको एकतर अँअर कडीशण्ड घर ! त्यातून काचावर पूर्ण पडदे सोडलेले आतली माणसं बाहेर आली तरच दिसणार ! त्यामुळे माणसाची गर्दी बघायची इथे तर .नदीच्या किनाऱ्यावर, नाहीतर शॉपीग सेंटरवर ! पॉईंट क्लिअर हे माँट्रीयल मधल एक लहानस उपनगरच ! पण तिथे सोयी सर्वच असतात या बद घरानी आणि उघडया निसर्गानी माणसाना मात्र जवळ आणलेल दिसत नाही आम्ही ज्या वाटेने जात होतो ती सेंट लॉरेन्स नदीला जाणारी जवळची वाट होती नदीच्या जवळ पोहचताच किनाऱ्यावर रगीबेरगी बोटीवर माणसे उघडी-वागडी होऊन सकाळची सूर्यकिरणे अगात मुरवत पडली होती वर्षातले जवळ जवळ ४-५ महिने सोडले तर सारा वर्फच असतो त्यामुळे 'उन्ह अगावर घेणे' हे त्याच या उन्हाळी दिवसातल महत्वाच काम ! हे चार पाच महिने कॅनडातले लोक सहली काढून मनसोक्त आनद लुटतात कारण वर्फ सुरू झाल्यावर बद काचेआड जीवही बद करून ठेवायचा असतो ते उघडे लोक बघून माझ्या भारतीय दृष्टीला कसेसेच वाटले हे लोक एवढावेळ उन्हात अग तापवतात की त्याचा गुलाबी गोरा रग काळा पडतो. पण मी एकाला प्रश्न विचारताच तो म्हणाला की आम्ही लोक मुद्दामून black होण्यासाठी जास्त वेळ उन्हात थाबतो पण त्याच्या या सुदर गुलाबी गोऱ्या रगाची अशी ते स्वत.च वाट लावून घेताना वाटल आई लहानपणी म्हणायची साय हळद लाव, म्हणजे रग उजळेल तसच काहीस या लोकाकडे पाहताना वाटलं मात्र कॅनेडियन लोक स्त्रिया, मुले हे सारे सौंदर्य जपणारे लोक आहेत तस तर कॅनडात मूळ फ्रेंच लोक सुद्धा सगळी कडून आयात झालेली अशीच आहेत कॅनडा म्हणजे सर्व पिठाच कडबोळ ! पण फ्रेंचचा प्रभाव जास्त कॅनडा हा अमेरीकेला जवळचा नातेवाइक ! त्यामुळे ज्या गोष्टी अमेरीकेत येतील त्या तिथे असणारच पण तरीही तुलना करायचीच तर कॅनडातले लोक कलासक्त सौंदर्यवादी तर अमेरीकेतले बुद्धिवादी म्हणावे लागतील

एक-दीड तास किनाऱ्यावर फिरून थोड पाण्यात उतरून आम्ही घरी परतलो खर म्हणजे प्रभाचे घर सुद्धा अजून नीट पाहिले नव्हते. पण उत्सुकतेपोटी आम्ही हा सकाळचा लहानसा फेरफटका करुन आलो.

थड हवा आणि धूळीचा कणही नाही अशा रस्त्यावरून पायी फिरताना मजा येते घरी येताच लक्षात आल की अजून अघोळ आणि स्वयपाक वगैरे मलाच करायचाय् अनतभावजी दोनपर्यंत घरी जेवायला येणार होते, पाणी तापवणे वगैरे भानगड तिथे नव्हतीच ड्राईंगहॉलमधून थोडस चार पाच पायऱ्या वर चढून गेल की आमची बेडरुम, त्याला लागूनच त्याची, व त्यालाच लागून बाथरूम व टॉयलेट बेडरूमच्या समोरच दिराची स्टडीरूम. ड्राईंगहॉलमधून खाली सात आठ पायऱ्या उतरून गेलं की फॅमिली रूम तिथे टी व्ही सेट वेगळा, टेपरेकॉर्डर, अनेक जमवलेल्या वस्तू, फोटो, इथे फॅमिलीच्या फोटोना विशेष महत्व असत. ड्रॉईंगहॉल मधे सुदर इजिप्तचा गालीचा तर खालच्या फॅमिलीरूम मधे लालगर्द कारपेट त्याच मागच दार उघडल की मागच अगण, हिरवगच्च लॉन, त्याच्या कडेने लावलेली मेथीची, टोमॅटोची झाड, कोथिंबीर वगैरे एखाद्या भारतीय खेड्यातल्या शेतात असाव अस वातावरण. मागेच गोल्फ खेळण्याच मोठ मैदान ! एकूण मागची बाजूपण प्रसन्नच होती. पुन फॅमिलीरूमपासून जवळच्या पॅसेजमधून खाली पायऱ्या उतरून गेलं की बेसमेंट (तळघर) यात सर्व मशिन्स ओळीने बसवलेले! या बद तळघरातच आणखी एक स्टोअर रूम असते. कितीवेळा बेसमेंटमधे मी गेले असेन पण मला ही रूम कळलीही नव्हती पण एकदा माझ्या दिराचे मित्र बॉर्टलूचे, श्री एलाजा आमच्याकडे सहकुटुब आले होते प्रभा नेहमीप्रमाणे ऑफीसला गेल्याने, स्वयपाक, खाण्यापिण्याचा चार्ज अर्थातच माझ्याकडे होता, वाग्याच्या भाजीत टाकण्यासाठी मला कादे हवे होते. रोजच्या ठिकाणी नव्हतेच मी सार तळघर शोधल पण मला काही सापडले नाहीत शेवटी मिसेस एलाजा म्हणाल्या मी शोधते. आणि त्यानी खालून बेसमेंटमधून कादे आणले मला नवल वाटले की मी एवढं शोधून मला जे मिळाले नाही ते ह्यानी कसे शोधून आणलें ? मी मिसेस एलजाना विचारताच, त्या मला बेसमेंटमधे घेऊन गेल्या आणि कळ फिरवावी तस एक बटन दाबले, लगेच एक दार सरकल व एक छोटसं पॉश अस स्टोअररूम दिसल. मनात वाटल, खरच परदेशात रहाण म्हणजे परीकथेत रहाण्यारखच आहे

वर चढून येताच गॅरेज लागत. त्याच दारसुद्धा कार जवळ येताच उघडत आपोआप, आणि कार आत जाताच बद होत. अर्थात या साऱ्याच

गोष्टी वाचलेल्या असल्या तरी प्रत्यक्ष पहाताना, अनुभवताना त्या जास्त आकर्षक वाटतात जरा वेळातच मी प्रभाच्याच बाथरूमचा ताबा घेतला. अघोळ हा माझा वीक पॉईंट ! ह्यानी आधीच ड्राईंगहॉलमधून सांगितले की स्वयपाक करायचाय् बाथरूममधेच चितन करीत बसू नको तसा त्याचा इशारा मनावर न घेताच मी बाथरूममधे शिरले रगात निळा ऐसपैस टब, चकचकीत टाईल्स चहूबाजूनी, तऱ्हेतऱ्हेचे शापू, जोडूनच असलेले ड्रेसिंग टेबल, टबच्या भितीपासून लावलेला एक सुदर गुलाबी रगाचा झुळझुळीत पडदा. इग्लिश पिक्चरमधे पाहिलेल सारे आता प्रत्यक्षात समोरच होते त्यामुळे ह्या पहिल्या दिवशी तरी मी, थड गरम पाण्याच्या धारात मनसोक्त डूबले अक्षरश: बाथ एनजॉय केला. भारतामध्ये स्त्रियाना कामापायी स्वत:कडे बघायला सुद्धा वेळ नसतो. किंवहूना त्या तेवढे भानही ठेवत नाही (अलीकडे हे फिगरफिटीगचे वेड इकडूनच आले आहे) पण इकडे प्रत्येक स्त्री स्वत ची फीगर, स्वत चे वजन आरोग्य इतके जपते, की सकाळी एकदा वजन केल असल तरी रात्रीही पुन त्या वजन काटयावर उभ्या रहातात बाथरूममधेच हे वजनाच मशीन ठेवलेल असत त्यातून सुदर कस दिसाव यासाठी रात्रदिवस ही स्त्री धडपडत असते खर म्हणजे रगाची देणगी नैसर्गिकच मिळाली असूनही इतर मेकअप, वगैरेची त्याची धडपडण्याची जिद्द पाहिली की वाटत, भारतीय स्त्रीच साधेपणच बर !

बारा वाजून गेल्यावर मी स्वयपाक करायला सुरुवात केली इथे वावरताना वाटल की कीचन क्वीन म्हणून जरी इथे किताब मिळाला तरी तो अभिमानास्पद वाटाव" किचन म्हणजे खूप पसारा, अस आपल्याकडचं चित्र असत. पण इथे, आपले सेवक, कुकिंग रेंज, वॉशडिशर मिक्सर, मॅक्रो ओव्हन सगळ कस शिस्तीत उभ असत फ्रीजमधे वरचा पूर्ण कप्पा हा फ्रोजन भाज्या, चीज, चॉकलेटस्, आईस्क्रीम, यानी भरलेला असतो. इथे भाज्या निवडणे, तोडणे, वगैरे काम नसतच. पॅकेट उघडल की फोडणीत ! काही स्पिनच (आपल्याकडला पालक) सारख्या पालेभाज्या फक्त चिरून घ्यायच्या,अर्धा तासमुद्धा पूर्ण स्वयपाकाला इथे लागत नाही. त्यामुळे मी अगदी उत्साहात गर्क होऊन काम करीत होते स्वयपाक करता करता बेसीन जवळच्या वॉश डीशरच्या बटनाला माझा ओझरता

धक्का लागला आणि धाड्, धाड् करीत वॉश डिशर सुरु झाला त्याच्या प्रचंड आवाजाने मी इतकी घाबरलें की आता निश्चित काहीतरी धोका होणार असं वाटू लागले मनामधे 'भीमरुपी महारुद्रा' चा जप सुरु झाला ते बंद करायचं कसं किंवा त्याविषयी काहीच माहित नव्हतं कारण दुसराच दिवस नी त्यात वॉश डिशरचं लगेच काम पडणार नाही म्हणून प्रभानेही काही सांगितले नव्हतेच आवाज थांबेचना म्हणून मग ह्यांनी फोन नंबर शोधून प्रभाच्या ऑफीसला फोन लावला तर ती नुकतीच ऑफीसच्या बाहेरच्या कामाला गेली होती मग अनंतभावजींच्या ऑफीसला लावला फोन लागेपर्यंत डीश वॉशरचे ३ राऊंडस् होऊन ते आपोआप थांबलं होते त्यांनी फोनवर विचारले, 'काय काही प्रॉब्लेम ?' मी त्या शांत झालेल्या वॉश डीशरकडे पाहून लगेच सांगितले 'काही नाही. सहज केला होता' काही जुजबी बोलून मी फोन ठेवला नी हायसे वाटले. माणूस यंत्राचा कसा गुलाम असतो ते अनुभवले शेवटी सवयीने सारे काही अंगवळणी पडले

नागपूरहून निघताना सगळ्यांनाच वाटले होते, हिचे कसे होइल ? नॉनव्हेज खात नाही साधं अंडं सुध्दा चालत नाही ! पण कॅनडात, घरां किंवा इतरही कुठेच अडले नाही एकदा तर नागपूरला मुलांना फोन लावला होता तेंव्हा दीपकने विचारले सुद्धा की तिथे तुला जेवण व्यवस्थित मिळतं का म्हणून ? 'पण इथे इतक्या तऱ्हेच्या सॅलडस् मिळतात की त्यांनीच पोट भरते तऱ्हेतऱ्हेचे आईसक्रीमस् केकस्, ब्रेडचे प्रकार त्यामुळे खाण्याची कुठच गैरसोय झाली नाही. दोन वाजायला पाऊण तास होता त्यामुळे जेवण होईस्तोवर टी व्ही बघावा म्हणून बटन ऑन केले. इथे रिमोट कंट्रोल असल्याने बसल्या जागी बटन फिरवली की जे चॅनेल हवे ते सुरु करता येते (आता आपल्याकडेही रिमोट कंट्रोल आलाय) मी, दोन चार बटनप्रेस करुन, एका ठिकाणी स्त्रियांची चर्चा चालू असलेली दिसली म्हणून थांबले. मग लक्षात आले की कॅनडातल्या निवडणूका जवळ आलेल्या आहेत. त्या संबधात स्त्रियांची मतं मागताना, त्यांच्या विचाराच्या संदर्भात एक चर्चा सुरु होती, अजूनही या देशात स्त्रियांना आपल्या हक्कासाठी चांगल्या करीअरसाठी चळवळी कराव्या लागतात. भारतीय स्त्री जशी उच्च पदावर नोकरीत राहू शकते तसे इथल्या

स्त्रियानामात्र अजूनही झगडावे लागते त्या चर्चेतून एवढेच कळले की जो आता कॅनडाचा प्रेसिडेंट म्हणून उभा राहणार आहे त्याने स्त्रियाचे प्रश्न सोडवावे, स्त्रियाच्या मागण्या पूर्ण कराव्या तरच त्याला स्त्रियाची मतं मिळतील एकूणच ही चर्चा मला रोचक वाटली. विविध चॅनेलस असल्याने तुम्ही तुमच्या आवडीचा कार्यक्रम पाहू शकता. हा फायदा मला अधीक मोलाचा वाटला नाहीतर आपल्याकडे नको असतानाही काही कार्यक्रम बघावे लागतात टी. व्ही. चा निवडणुकीसाठी सुद्धा असा उपयोग इकडले लोक करुन घेतात, इकडे एकूणच टी व्ही चे फार आकर्षण आहे भिंद्रानवालाच्या मृत्यूच्या वेळचे काळथैमान आपल्याकडे जे अशत दूरदर्शनवर दाखवले ते इकडे इत्यभूत पूर्ण दाखवले त्यामुळे आपल्याकडील बातम्या त्याना आपल्याही आधीच व सविस्तर समजतात दुसऱ्या चॅनेलवर बघू या म्हणून बटन प्रेस केले तर नुसत्या जाहीरातीचा कार्यक्रम ! कितीतरी वेळ यात निघून गेला

दुपारी जेवण होताच, उद्यापासून कुठे फिरायच याचे प्लॅन सुरु झाले प्रभा व अनत भावजीनी दोघानीही दोन दिवस सुट्टी घेतल्याने पिकनिकला जायचे ठरले होतेच. त्याच रात्री कॅनडाचा स्वतत्रता दिन असल्याने ९।। वाजता फायरींग बघायला गेलो दुतर्फा माणस गर्दी करून उभी होती, दूरुन बॅडचा, ड्रमचा आवाज ऐकू येत होता प्रेक्षकामधली गुटगुटीत फ्रेंच बाळ आकर्षित करीत होती. काही स्त्री, पुरूष हातात कॅनडाचे झेंडे घेऊन हर्षाने नाचत होते इथे या दिवशी फायरींग करून रगीबेरगी फटाके उडवतात आणि शेवटी कॅनडाचा ध्वज उचावरून फडकवितात माँटीयलमधले कितीतरी कॅनेडियन फ्रेंच लोक त्या दिवशी बघायला मिळाले आम्ही एका झाडाखाली उभे होतो. येणारे, जाणारे प्रत्येक स्त्री, पुरुष माझ्या साडीकडे वळून बघत होते पण कुतुहलाने ! या सर्व लोकाचा रग फारच देखणा गोरा ! डोळे मात्र हिरवट, पिंगट शेड असलेलेच दिसले त्यामुळे आपल्या इडियन लोकाचा काळा रग आणि काळे डोळे एकदम निराळे दिसतात ह्या लोकाच तिथे त्याक्षणी एकदम वैशिष्ट्य डोळयात भरले ते अत्यत लीनतेचे, सज्जनपणाचे वागणे बोलणे; अतीशय मृदु, मुलयम बोलतात ते ! नाहीतर आपण घरीच बोलत बसलो तरी मोठ्यादा बोलण्याची सवय असते. इथे आणखी एक मजेशीर

गोष्ट म्हणजे, आपला हात नकळताच कुणाला स्पर्श न करताही सावली जवळून गेला तरी sorry म्हणतील हे लोक ! sorry, Thank you आणि execuse me,हे इथले परवलीचे शब्द खर तर कॅनडात सर्वत्र फ्रेंचचा प्रभाव अधीक आहे फ्रेंच भाषा आल्याशिवाय तिथे जॉबही मिळत नाहीत. पण इतर सर्व ठिकाणचे लोक आल्याने इग्लीशचा वापरही बऱ्याच प्रमाणात आहे. मात्र रस्त्यावरील पाट्या, जाहिराती वगैरे सर्व फ्रेंचमधेच आहे. रोज वाचून वाचून फ्रेंचमधली वरीचशी शब्दकळा आपल्यालाही समजू लागते. प्रभा फ्रेंच अगदी सराईतपणे बोलत असल्याने आमचे कुठेच अड-लेही नाही

रात्री ११।।–१२ पर्यंत आम्ही घरी येऊन पोहचलो. आल्याआल्याच कॅनडातल्या स्वातन्त्र्यदिनाचे असे सुखद दर्शन झाले. दुसरे दिवशी लवकर उठून सकाळीच आम्ही सेंटआगाथ या लेकवर पिकनिक साठी गेलो.

इथे पिकनिक म्हणजे लोकाच्या नसानसात मुरलेली आहे- पाच दिवस कसून काम केल की शनिवार व रविवार पिकनिकला जायच. मनसोक्त पोहायचे, गाणी ऐकायची, निसर्गाला सर्वांगात भिनवून ध्यायच आणि हे निसर्गाच बळ घेऊन परतल की पुन उत्साहाने कामाला लागा-यच. काम आणि करमणुक सारख्याच प्रमाणात चालते इथे ! पण म्हणू-नच इथे तारुण्याला ४० व्या वर्षी सुरुवात होते. तर आपल्याकडे ४० व्या वर्षी आता काय राहिलय् माझे ? म्हणून जीवनाबद्दलची उदासी-नता येते त्या लोकांबरोबर वावरताना आपणही दहा वर्षांनी लहान झाल्यासारख वाटत ! इथली दु ख ही व्यक्तिगत आहेत अफाट वैभवा-तून आलेली आहेत जिथे आपल्याकडे गरीब श्रीमत हा भेद, ही दरीच मोठी आहे आपल्याकडल्या दु खाची जात ही वितभर पोट भरण्यासा-ठीची आहे तरीही ह्या लोकाना निसर्गाने दिलेले वैभव वातावरण, परिस्थिती याचा लोक आत्यतिक उपयोग करून घेनात आळस झटकून कामाला लागा अशा पाट्या लावण्याची वेळ त्याच्यावर कधीच येत नाही.

सेंट आगाथ लेकवर पोहचताच रगीत पऱ्याच्या सहवासात गेल्या-सारखे वाटले लेकच्या चारी बाजूनी हिरवी गर्द झाडे, डोगर पहाड आणि मधे हे सळसळत पाणी ! पाण्यावर निरनिराळ्या रगाच्या बोटी ! सर्फ बोट म्हणजे एकट्याने बॅलन्स करीत जायचे. पॅडेल बोट वॉटर

बोट इत्यादी विविध नावे दिलेल्या बोटी ! आम्ही आपली सोपी पॅडेल बोट घेतली. आणि त्या निळयाभोर आकाशाखाली पाणी उडवित फिरून आलो. बोटीतून उतरताच एक शीख जोडपें आमच्याच दिशेने येत होते. ते अनतभावजीचे मित्रच होते. एका ठिकाणी बसून त्यानी आणलेल्या निरनिराळया श्रेडच्या पदार्थांचा सर्वांनीच समाचार घेतला त्याच्याशी बऱ्याच वेळ गप्पा करताना एकच गोष्ट लक्षात आली की, नुकत्याच झालेल्या अमृतसरसच्या मदीरातील दगल भिंद्रानवाल्याची हत्या या सर्वांचा ताण त्याना आलेला होता आम्ही भारतातून नुकतेच आलो आहोत हे कळताच त्याना खूप जवळीक वाटली. त्याच्या पदा-र्थांचा पाहुणचार घेऊन आम्ही लेकभोवती फिरण्यास निघालो जाता जाता एका ठिकाणी 'हरे राम हरे कृष्ण' ग्रुप मधले तरूण भगवा पोषाख, गळयात रूद्राक्षाच्या माळा, आणि उन्हात बसून योगसाधना करीत असताना दिसले मी प्रभाला म्हटले त्याना विचारु या की 'तुम्ही इतक्या तरुणपणी हा पथ का स्वीकारला ?' मला फ्रेंच येत नसल्याने प्रभानेच त्याना विचारले त्यातील जॉन नावाचा एक तरूण पुढे आला: नी म्हणाला, 'आयुष्यातल्या सगळया सुखाच्या कल्पना आम्हाला बद-लायच्या आहेत या साधनेत मन शाती मिळते. म्हणजे मन शांतीसाठी इथेही लोक आसुसले आहेतच शेवटी मानवजात इथून तिथून सारखीच. कुणाचे डोळे निळे, तर कुणाचे ब्राऊन, हिरवे, तर कुणाचे काळे ! पण त्या आड दडलेले मानवी मन एकच.

सूर्यास्त होता होताच आम्ही निघालो सेट अगाथ भोवती किती तरी कौलारू घरें होती, मॉंट्रीयलच्या आसपासची माणस पिकनिकसाठी तर येतातच पण इथे येऊन एकांतवास पत्करतात त्यासाठी इथे स्वत च्या मालकीची घरच लोकानी बाधली आहेत बर्फ असतो तेंव्हा मात्र इकडे कुणी रहात नाही, मी प्रभाला म्हटल काय सुदर परिसर आहे,तुमचं मॉंट्रीयल तर कॅनडातले सर्वात उत्तम शहर आहे.' तेंव्हा ती जरा गभीरपणानेंच म्हणाली की तू अजून इथला बर्फ पाहिला नाहीस. ८ महिने जवळ जवळ बर्फ असतो तेंव्हा माणसा माणसा मधल दळण-वळणच तुटल्यासारख होत बर्फाची वादळ होतात तेंव्हा आपल माणूस परत घरी येईल की नाही याची शाश्वती नसते.' तिच म्हणण जरी

पटल तरी सुखसोयी खूप असतात म्हणून तर भारतीय लोक इथे राहणे पसत करतात. जॉब मधले समाधान आणि वैभव ही आकर्षणच तर त्याना खुणावत असतात.

अधार बराच झाला होता. मधे एका वऱ्यापैकी हॉटेलमधे चहा घ्यायला थावलो. इथे चहा २ ते २।। डॉलरला मिळतो. इतका महाग असूनही तो चागला नसतोच. केटलीत गरम पाणी, चहाच्या साखरेची कुपी, आणि दुधाची एक त्रिकोणी कुपी ! ते सर्व उलगडून तुम्ही चहा बनवून घ्यायचा चहाचे पॅकेट केटलीत सोडून द्यायचे किंवा कपात. मग साखर व दुध की झाला चहा ! चहा करण अगदी सोपा पण चव मात्र अगदीच नसते रात्री ८–८।। च्या सुमाराला घरी पोहचलो तो दुसरे दिवशी पुन पिकनिकला जायचेय म्हणून तयारी करूनच !

ही पिकनिक होती महाराष्ट्र मडळाची मॉंट्रीयलमधले महाराष्ट्रीयन मराठी लोक तर होतेच शिवाय मद्रासी, बगाली, हिंदी अशाही भाषा बोलणारे सारे भारतातून आयात झालेले लोकच होते तिथे ! या एन–ग्रीनीग्रन पार्क मधे सर्वत्र पाईन आणि मेपलची झाडे. पार्क तसा नुस्ताच पसरलेला वाटला पण हिरव्या झाडांची गच्च वर्दळ मोहवित होती. एका ठिकाणी नुसतेच ६–७ झुलें ! झुल्यावर लहान मोठे सर्वच जण मुक्तपणे झुल्याचा आनद घेत होते. मी आणि तेजा अडकरने मिळून खूप झोके घेतले. झोका उच गेला नि मला इदिरा सताच्या झोक्यातल्या ओळी आठवल्या.

> “ झोका चढतो उच उच
> पाय पोचती मेघावरती
> इद्राच्या डोहावरी
> लाल पाखरे पाण्यात येती ”

झोका घेता घेता अशीच आठवण पाखरे जवळ येत होती कादळ-गावंकर, कर्णिक, इनामदार, नायक, खडकीकर,ही मडळी विशेष लक्षात राहिली इथे. ह्याच्यातील काहींनी कॅनेडियन मुलींशी लग्न केलेली ! पण क्वचितच असे उदाहरण आढळले ही एकूणच सर्व मडळी पाश्चात्य घाटणीची, फक्त चेहरा भारतीय, अशी वाटली. त्याच बोलणं, वागण,

मोकळेपणा, संकोच नाही त्यामुळे त्या सर्वांमध्ये मिसळताना आपलेपणा वाटला. हे महाराष्ट्र मंडळ इथे गणेशोत्सव, दिवाळी असे सणही साजरे करतात, विविध सांस्कृतीक कार्यक्रम, नाटक वगैरेही सादर करतात. मॉंट्रीयलमधले हे भारतीय लोक तिथल्या एका मस्कृतीत एकत्र ओवल्या सारखे वाटले जे भारतात वाटत नाहीत एकूणच परदेशात गेल की भारतीय माणूस आपले फार स्वागत करतो हे अनुभवास आले

ही पिकनिक म्हणजे एकत्र येऊन मजा करणे ! सर्वांनीच इतके विविध प्रकारचे पदार्थ आणले होते. की पदार्थांच समेलनच भरल होत सर्वांनीच बेस बॉल, पळापळी, काही नवीन वैशिष्टपूर्ण खेळ यात भाग घेतला या पिकनिकमध्ये सर्व मराठी मडळीची जवळून ओळख झाली. आमच निराळेपण मग राहिलच नाही

दोघांचीही सुट्टी सपली आणि मग त्यानी दिलेल्या सूचना अमलात आणून अम्ही दोघानीच मॉंट्रीयलमध्ये स्वतन्त्र फिराव अस ठरवल. इथे प्रत्येक एरियाचा सुसज्ज नकाशा असतो. एकदा तुम्हाला मॅप रीडिंग जमल की तुम्ही कुठेही व्यवस्थितपणाने फिरु शकता. आणखी सकाळीच चहा पिताना इथेही एक गोष्ट लक्षात आली की इथे जे सकाळी वर्तमानपत्र येत ते एका लघुकादबरीच्या स्वरुपात असत म्हणजे इतके पेजेस् असतात त्यात ! प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे पुरवण्या असतात. कुठे सेल आहे, कुठल्या वस्तूचा आहे, किंवा गाण्याचा मायकेल जॅक्सन वगैरेचा, तर प्रत्येक भागाची स्वतत्र पुरवणी ! ज्याना ज्या विषयाची आवड असेल तो ती पुरवणी वाचतो. मी फक्त साहित्य सांस्कृतीक कार्यक्रमाची तिथल्या स्त्रीयाच्या चळवळीची पुरवणी वाचायची . आणि रोज कुठे कोणत्या वस्तूचा सेल आहे हे बघायला मला खूप आवडायचे. जमल तर त्या ठिकाणी जायचेच अस ठरवून आम्ही पहिला मोर्चा शॉपींग सेंटरकडेच वळवला.

० ०

# इटन, सीम्पसनच्या दूनियेत

अमेरीका, जपान या देशाप्रमाणेच कॅनडातही उचउच टॉवरची सात सातमजले असलेली शॉपींग सेटरस् आहेत त्यातही इटन आणि सिम्पसन या दोन कपनीनी तर कॅनडात नाव मिळवले आहे आम्हाला पूर्ण माँट्रीयल मधे फिरायला बस किंवा रेल्वेने (मेट्रोने) एक महिन्याचा पास काढून ठेवला होता इथे गमत अशी की बसचे तिकीट मेट्रोलाही चालते इथली बस स्वच्छ, सीटस् उत्तम आणि फक्त ड्रायव्हरच असतो कडक्टर या नावाचा छळवादी प्राणी इथे नसतोच, प्रत्येकजण ड्रायव्हरजवळ ठेवलेल्या एका डब्यात तिकीट टाकतो आणि मगच बसमधे बसतो समजा तिकीट काढले नसेल तर 'उतर जाव निचे' असे अपमानीत शब्द इथे ऐकू येत नाहीत, १ डॉलर त्या डब्यात टाकला की चालल बसस्टॉप आला की ड्रायव्हरच पायाखालचे ब्रेक्स दाबतो नी बसचे दार उघडते उतारू उतरले की पुन बद आम्ही नवीन असल्याने आमच्या उतरण्याच्या स्टॉपच नाव त्याला सागून ठेवायची, तो बरोबर आम्हला मदत देऊन स्टॉपवर बस थाववायचा ! एकूणच इथल्या लोकाविषयी माझ मत अनुकूल झाल एकदा बसमधून उतरताना आम्ही घराच्या खूपच अलीकडच्या स्टॉपवर उतरलो आणि गोंधळ झाला आमच्या भावबलेल्या चेहऱ्याकडे बघूनच एका कॅनेडियन स्त्रीने आम्हाला 'May I help you'? विचारुन रस्ता दाखवला. सदभात एकदा मजा झाली पायी चालताना आपल्याकडे आपण वाह-नाना आधी जावू देतो मग आपण जातो. आम्ही चालत असताना एक कार आमच्याच दिशेने येत होती म्हणून आम्ही थावलो. आणि कारही थावली आम्हाला कळेचना की आमचे काय चुकले ? गाडीतल्या त्या कॅनेडियन स्रीने आम्हाला जाण्याची खूण केली आम्ही चालून गेल्या-नतर ती कार गेली. नंतर कळले की इकडे पायी चालणाऱ्याना प्रथम जावू देतात. रस्त्यावर आधी आमच्यासारखे पायी चालणारे तुरळकच. इथे रस्त्यांवर फक्त कार धावतात. सुरवातीला वाटायच की इथे या देशात माणसं रहातात की नाही ? पण प्रत्येक कार मधे माणस तर असणारच. एकूण माणसाची गर्दी कमीच. रस्त्यापेक्षा ही गर्दी तुम्हाला

भेटते फक्त शॉपींग सेंटरवरच ! आम्ही जाताना बसने जात असू आणि येताना भुयारी रेल्वेतून मेट्रोतून ! कुठे खेचाखेची नाही, धादल नाही. सगळ कस आखीव, रेखीव ! या रेल्वे दोन दोन मिनिटानी येतात. प्रत्येक डब्यात त्या गाडीच्या मार्गाचा नकाशा असतो आणि एकामागून एक कुठली स्टेशन येणार ते तुम्हाला त्यावरून कळत. त्यामुळेच 'आता पुढच स्टेशन कोणत हो?' असा प्रश्न विचारणाराही कुणी नसतो जाहिराती सुद्धा खूप आकर्षक स्वरुपात लावलेल्या असतात. या रेल्वेचही बस सारखच स्टेशन आल की दार उघडणार, आणि पॅसेंजर चढले की बद होणार! त्यामुळे गाडीच्या दाराशी जी रेटारेटी आपल्याकडे दिसते ती इथे नाही. आपल्याकडे प्रत्येकच गोष्ट इच इच लाढवून मिळवू' तस इथे मात्र सर्वच सुखकारक असत पोस्टमनपासून मंत्र्यापर्यंत सर्वांच्याच घरात फ्रीज, फोन, वॉशीगमशीन इत्यादी सुखसोयी सारख्याच दिसतील फरक फक्त कुणाचे बंगले मोठे तर कुणाकडे जगभरच्या वस्तू गोळा केलेल्या त्या वस्तूवरुन ते लोक जग फिरुन आलेत हे सहज कळावे पण रोजच्या जगण्याचा प्रश्न इथे नसतो गेल्सबर्गला माझ्या एका मैत्रीणीकडे (मीरा देवरस कडे) आम्ही जेवायला गेलो होतो तिचे मिस्टर डॉक्टर आहेत तिच्या घरात शिरल्यावर मी एखाद्या म्युझियममध्ये प्रवेश करतेय अस वाटल. चित्रविचित्र वस्तूचा सग्रह, कलाकूसर आणि फोटो तिच्या ड्रॉइगहॉलमध्ये सजले होते. तिच्या मुलीच्या नव्हे तर एकूणच परदेशीयाच्या खास सजवलेल्या खोल्या पहाताना भारतातली झोपडपट्टी मी विसरु शकत नव्हते पण या वैभवात रहाणारी माझी ही मैत्रिण आणि तिच्या मुली पूर्णपणे परदेशी वातावरण अगी रुळलेल असुन ही त्याच्या रक्तात मात्र आपल्या सस्कृतीचे भान जागे होते, हे विशेष वाटले

मेट्रोने निवातपणे प्रवास करुन थेट इटनच्या प्रचड भव्य द्वारात आम्ही प्रवेश केला सात मजल्यावर सात तऱ्हाचे भव्य वस्तूभांडार ! एकाल नुसते कपडे, दुसरीकडे क्रॉकरी, ज्युवेलरी, इलेक्ट्रिक अपलायसेस, सारेच देखणे ! आणि विकणारे ते सेल्समन आणि सेल्सगर्ल्स ही देखण्या! पहिल्याच मजल्यावर फिरता फिरता पायाल गोळे आले. पण स्त्रीस्वभावाला शॉपींगचे वेड अधिक ! मला तर वाटल की याहून इंद्राची मयसभा काय निराळी असणार ? झगझगाट, आणि चकचकाट, सुरवातीला तर

कोणच आधी बघू असं होतं मग सवयीने डोळ्यानाही नुसतच बघण्याची सवय होते कॉसमेटीक्सच्या भागात फिरताना, प्रत्येक तरुण स्त्री, युवक, युवती तिथे ठेवलेल्या अत्तराचा फवारा अंगावर उडवून जायची मी नुसतीच दूरुन बघायचे मग कळल की सॅंपलसच्या बाटल्या अशा वापरतात. शिवाय 'घेतलच पाहिजे' हा हट्टही नसतो या इटन कंपनीचे कॉसमेटीक्स सर्वात श्रीमंत समजले जातात तिथल्या सेल्स गर्ल्स जवळ येऊन फ्रेंच मधे काय हवे विचारायच्या इंग्लिशमध्ये त्यांच्याशी बोलून मी माझी सुटका करून घ्यायची तऱ्हेतऱ्हेचे सेटस् ही तर फ्रेंच युवतींची खास आवडती वस्तू आहे सौंदर्य आणि सुगंध याची जुगलबंदी त्यांच्या नसानसातून वहात आली आहे या इटनच्या सेन्टरला आम्ही ५–६ वेळा तरी भेट दिली असेल पण त्याचे औत्सुक्य काही कमी झाले नाही फिरता फिरता एकदा वरच्या मजल्यावर ग्राइंडर घ्यायला म्हणून आम्ही गेलो एक मध्यमवयीन फ्रेंच स्त्री तिथे विक्रेती होती. तिला किंमती विचारत असताना, तिचे लक्ष मात्र माझ्या मंगळसुत्राकडे आणि टिकली- कडे होते. तिने खुप उत्सुकतेने चौकशी करत 'हे मंगळसुत्र का वापरता?' 'ही कपाळाची टिकली निघते का? असे प्रश्न विचारायला सुरवात केली. कुंकवाची टिकली काढून दाखवताच तिला खूपच आश्चर्य वाटले. आणि 'मलाही अशा टिकल्या आणून दे' म्हणून तिने पुन. पुन. बजावले. पुढच्या खेपेस जाताना मी आठवणीने तिला टिकल्या नेऊन दिल्या. तेव्हा तिचा चेहरा आनंदाने उजळून निघाला होता या वस्तू विकणाऱ्या स्त्रिया कधीच रागीट चिडक्या किंवा मरगळलेल्या मी बघितल्या नाहीत सदैव हास्य त्यांच्या चेहऱ्यावर आणि अर्ध्या अर्ध्या तासानंतरचे सुबक मेकअप्! वाटायच की यांना कधी कंटाळा कसा येत नाही? पण उत्साह त्यांच्या रक्तातच भिनलेला आहे

स्वत च निवड केलेल्या वस्तू घेऊन मग काऊंटरवर पैसे द्यायचे असतात! आपल्याकडे एकाच दिवसात सर्व वस्तू चोरीला गेलेल्या सापडतील पण इथे स्वत च निवडूनही कुणी चोरी करीत नाही कुणी वस्तू उचलून नेत का, यासाठी प्रत्येक ठिकाणी टी व्ही सारखे आरसे असतात. ह्यातून सर्व दिसत. ह्यामुळे चोरी करता येत नाही. आणखी विशेष म्हणजे एक महिन्यानंतरही विकत घेतलेली वस्तू परत

करता येते याबाबतीत काही स्त्रिया बराच फायदा घेतात नेलेले कपडे किंवा ज्युवेलरी महिनाभर वापरायची आणि मग उत्तम स्थितीत ती परत करायची. पुन्हा दुसरी घ्यायची या पद्धतीने वेगवेगळे पोषाख व दागीने याचा उपयोग तेथील काही बनेल स्त्रिया करतात असे प्रकार फार थोडे असतात पण एकूण बनवाबनवी हा प्रकार मानवी स्वभावात थोड्या फार प्रमाणात भिनलेला असतोच.

या शॉपींग सेंटरमधे काम करणारे सारे स्त्री,पुरूष इथले फुलटाईम जॉब करणारे नसतात एक तरूण विक्रेता तर अमेरीकेत भेटलेला सागत होता, की तो रिसर्च असिस्टट म्हणून हॉपकीन इस्टिटयुट मधे दिवसा काम करतो आणि सध्याकाळी हे विक्रेत्याचे काम करतो. त्याची बायकोही अशीच डबल डयुटी करते. त्याचे हे दिवसरात्र काम असूनही थकवा नाही. त्यांची ही सारी कसरत आणि उत्साह बघून आम्हा महाराष्ट्रीयन लोकांना ओशाळायला झाल्यास नवल नाही मुळात कुठल्याही कामाचा कमीपणा त्याना वाटत नाही. वरच्या पदावरचा अधिकारी सायकाळी कपडे विकण्याच काम करतो म्हटल की आपल्याला कसेसेच होते इतक करूनही वीकएडला शनिवारी, रविवारी घरचे काम नाहीतर पिकनिकला जातील कॅनडात मला सर्वत्र आढळल ते बागकाम ऑफीसमधून घरी आल की आपला ऑफीसचा राग बायकोमुलावर काढणारे, वैतागणारे लोक आपल्याकडे मी नेहमीच बघितले आहेत पण इथे नवरा, बायको दोघही थकून आल्यानतर 'तू माझ्यासाठी चहा केला का नाही ?' हा प्रश्नच इथे नसतो प्रत्येकजण आपला चहा, ड्रिंक स्वत च तयार करून घेतो थोडे रिलॅक्स होताच लॉनकटरच मशीन सुरू करतील, लॉन कापून नीट करतील, झाडे, झुडपे, कचरा, वाढलेला आसपासचा काढून, पाण्याचे कारजे उडवतील. इथे झाडाना पाणी देणे हा देखील अनुभव सुखद आहे मध्यभागी कारज्यासारखे एक मशीन फिक्स करून द्यायचे म्हणजे ते गोल फिरत सर्वत्र सारखे पाणी उडवते. निरनिराळे फुलांचे बेडस्,रगीबेरंगी दुनिया आणि ह्या दुनियेत हरवून गेलेला त्या घराचा प्रसन्न असा मालक ! रोजच्या धावपळीतूनही जगण्याला अर्थ यावा असे क्षण शोधून काढणारे हे कॅनेडियन लोक पाहिले की आठवतात दासबोधातल्या ओळी "पुढे गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासगाशी । आपल्या जिवेसी सोसी । नाना श्रम ।"

इटनपेक्षा कपडे अधिक चांगले सिम्पसन् सेंटरला मिळतात म्हणून कपड्यांची खरेदी तिथेच करायची ठरवली हे दोन्ही शॉपींग सेंटरस् म्हणजे अक्षरश. डॉलरस्ची खैरात करणारी आहेत. जवळ काहीच पैसे नाहीत नी शॉपीग सेंटरला मात्र रोज भेटी, अशी आमची गत ! पण दृष्टिसुख हेही महत्वाचे वाटले मला. त्यातूनही जी कॅनेडियन माणस, स्त्रिया, तरुण मुली मला रस्त्यावर किंवा बंद काचाच्या घरातून दिसत नव्हत्या त्या इथे राजरोस बघता येत होत्या त्यांची राहणी, त्याच्या फॅशन्स, केसाच्या तऱ्हा, काय हव ते इथे शॉपीग सेंटरला बघायला मिळायचे नितळ गोरा रंग, गुलाबी आणि पिंगट डोळे, पिंगट केस ! मात्र काही तरुणी तर हिरव्या निळ्या रंगाच्या केसात दिसल्या म्हणजे तिथे हिरवे, निळे डाय सुद्धा वापरतात निसर्गाचे रग असे अंगी बाणवण्याची विशिष्ट तऱ्हा पाहून, त्यांच्या कल्पकतेचे आणि सदैव 'यौवनात मी' राहण्याची गमत वाटली एकूण तरुण मुली स्लिम फॅशनेबल तर ४५ च्या पुढे इतक्या लठ्ठ,की हा लठ्ठपणा त्यांना भयानक रोगाकडे ओढून नेतो. कॅनडामध्ये हा लठ्ठपणा विशेष आढळला. खाण्यापिण्याची सुबत्ता आणि व्यायाम काहीच नाही. सर्वत्र मशीन्सची सोय ! फॅटी पदार्थात केक, अंडी, बीफ, चीज, चॉकलेटस् असे पदार्थ रोज खाल्ले तर वाळसे धरायला काय वेळ लागणार ? त्यामुळे लठ्ठपणा हा त्याचा आजचा एक मोठा प्रश्न होऊन बसला आहे म्हणून तर हे लोक योगासन, व्यायाम ध्यानधारणा याकडे वळलेत आपण भारतीय आपल्या संस्कृतीमधले जे गमावतोय ते नेमके तेथील लोक अभ्यास करून अमलात आणतात

या शॉपींग सेंटरमध्ये रंगीबेरंगी माणसं बघून खूप करमणूक व्हायची. तर एखाद्या तरुणीशी बोलावस तरी भाषेची अडचण यायची मग काही वेळला खाणा खुणानीच बोलण व्हायच त्यातही मजा असायची आपल्याला फ्रेंच येत नाही, हे त्या वातावरणात विसरल्या जायच. इंडियन म्हटल की त्याना फक्त इंदिरागांधीचा देश एवढच माहीत असायच मग एखादी उगाचच गहन प्रश्न विचारायची, 'What is Indian Philosophy ?' प्रत्येक बाबतीत उत्सुकता दाखवणे हा ताजेपणा त्याच्या रोमरोमात भिनला आहे. म्हणून तर हे फ्रेंच लोक तरुण वाटतात मुलासाठी कपडे घेताना नेमके कोणचे आणि कुठले घ्यावे हा

प्रश्न पडावा इतकी विविधता त्यात असे. त्यातही स्वत:च पाहून घ्यायचे असल्याने दुकानदारासारखे आंबट चेहरे बघावे लागत नव्हते. त्यामुळे मनसोक्त फिरून निवड करून कपडे घेता आले मात्र एक लक्षात आले की मुलांनी माप लिहून दिली होती त्यानुसार एकही कपडा इथे नव्हता मापात तफावत होती. कारण इकडले साईजेस हे या देशातल्या मुला माणसाकडे पाहून केलेले तर आपली माप त्यात बसणार कशी ? मग पुन: एकदा भारतात घरी फोन करताना, माप नीट विचारून घ्यायची ठरवूनही थोडया फार फरकानी सैल कपडे घ्यावे लागले. एक गमत मात्र इथेही होतीच खुद्द कॅनडात तर गव्हाशिवाय तसे कुठलेच उत्पन्न होत नाही. या शॉपीग सेंटरमधेही 'मेड इन जपान' या लेबलच्याच वस्तू अधीक विक्रीला होत्या आणि त्यामुळे अमेरिकेपेक्षाही वस्तू इथे अधीक महाग होत्या आपल्याला जे नेहमी भारतात वाटत की परदेशात सगळ स्वस्त असत, ते इथे अगदी खोट पडत कारण सर्व वस्तूच तर बाहेरुन येतात. त्यामुळे त्याची किमत वाढलेली असते एकाच कपनीच्या वस्तु देखील निरनिराळया किमतीने इथे विकल्या जातात म्हणून आम्ही जेव्हा न्युयार्क शिकागोला गेलो तेंव्हा या किमतीतला फरक समजून आला. आपला एक रुपया इथल्या एर डॉलरसारखाच आहे. पण आपण नेहमी मनात डॉलरची किमत रुपयात करतो. म्हणजे दहा रुपये ही किमत आपल्याला फार वाटते या शॉपीग सेंटरच्या निमित्याने लोकाची गर्दी अनुभवली. कॅनडाचे मुख्य आकर्षण शॉपीग सेंटर का ? त्याचाही उलगडा झाला.

इथले शॉपीग सेंटर किंवा शॉपस्‌ही ऑफीसात काम करणाऱ्या क्लर्कसारखीच क्लर्क जसा पाच वाजले की फाईल्स बद करून घराकडे वळतो तसे इथले शॉपस् पण पांच वाजले की बंद होतात.मात्र शोकेसेस-च्या काचांआडून त्याच्या माडणीचे दर्शन आपल्याला होते आणि मग नुसत्याच कधी फॅशन्स बघत, त्याच्या किमती पहात मनाशी हिशोब करीत, आपल्या देशातल्या किमतीशी तुलना करत, कितीने स्वस्त, महाग, किती रुपयानी ? असे मनात विचार घोळवत एखादी संध्याकाळ निघूनही जायची: शेवटच्या भेटीत जेव्हा ठरवले की आता पुन: इथे यायचे नाही. तेव्हा मेट्रोने इथे येता येता रेल्वे स्टेशनवर गेलो तिथलीही शॉपस् प्रेक्षणीयच ! मुबईच्या सहार विमानतळापेक्षाही स्वच्छ नीट आणि

व्यवस्थित असे हे रेल्वे स्टेशन आहे पण गंमत अशी की पॅसेंजरच नाहीत. इकडे प्रत्येकजण कार, बस किंवा विमान यानी प्रवास अधीक करतो. त्यामुळे रेल्वे आता बंदच करावया, असा विचार सध्या तिथे सुरु आहे. इथे जसे सायकल स्टँड आपल्याकडे, तसे बाबागाडीसारख्या ढकलगाडीचा स्टँड असतो. शॉपींग सेंटर असो रेल्वे स्टेशन असो विमानतळ असो हाताशी अशी ढकल गाडी मिळते त्यात सामान ठेऊन ढकलायाचे त्यामुळे कष्टही होत नाही आणि वजनही नाही फार सामान असेल तर जिथे तुमची गाडी पार्क केली असेल तिथपर्यंत रोलींग टायरवरून हे सामान कारपर्यंत पोहचविले जाते इथल्या प्रत्येक गोष्टीं-साठी केलेली सोय बघून इथल्या लोकाच्या कल्पकतेची साक्ष पटते. म्हणूनच इटन आणि सिम्सन् या दोन्हीचा ठसा कायमचा मनात कोरल्या गेला.

• •

# थाऊजंड आयलँड

कॅनडाचे सर्वात देखणे आकर्षण म्हणजे थाऊजंड आयलँड प्रभाला व अनंतभावजींना दोघांनाही सुट्टी लागून आल्याने आम्ही त्याच्या कारनेच जायचे ठरविले मॉंट्रीयलपासून १६९ मैलावर हे आयलँड वसलेले आहे. सकाळीच आम्ही टिफीन वगैरे सर्व तयारी करून निघालो तेव्हा सकाळचे ६ वाजले होते थंड हवा आणि रस्त्याचे स्वच्छ नितळपण ! त्यात प्रभा ड्राईव्ह करीत होती कारमध्ये लता, आशाच्या गाण्याच्या टेप्स, चौरासियाची बासरी सारेच बरोबर ! नागपूरला घरी कधीही निवांतपणे कॅसेट ऐकायला मिळत नाही. पण इथे धावत्या कारमध्ये मात्र 'जेथे मिळे धरेला आभाळ वाकलेले' 'पासून तो वलहव रे नाखवा' पर्यंत सारी गाणी शब्दसूरातून अंतर्मुख होऊन ऐकलीत

निसर्ग आणि सुराच्या लयीत एका रम्य ठिकाणी आमची कार थांबली ब्रॉऊन्डाबे पार्कमध्ये लंच घेतला नदीकाठच्या हिरवळीत हा पार्क आहे इकडे हायवेवर असे जागोजागी प्रवाशांना थांबण्यासाठी पार्कस् असतात पाणी पिण्याची, टॉयलेटची व्यवस्थाही असते टॉयलेट सतत स्वच्छ ठेवलेले असतात काही ठिकाणी प्रवाशांना, टॉयलेटला जायला नाणी टाकावी लागतात.अर्थातच हे मला माहीत नसल्याने जेवणानंतर पर्स वगैरे सर्व सामान प्रभाजवळ सोपवून मी टॉयलेटकडे गेले काही केल्या दार उघडेचना. अंगातली सर्व ताकद लढवली मग हताश झाले. फ्रेंच अक्षरात तिथे १० सेंटस् टाकण्याबद्दल लिहिले होते. ते टाकले तरच दार उघडणार फ्रेंच वाचता येत नव्हतेच पण थोड्या अंतरावरच एक फ्रेंच कॅनेडियन स्त्री उभी होती माझी उघडण्याची मजा तिने थोड्यावेळ एनजॉय केली नंतर माझ्याजवळ येऊन सांगितले की १० सेंटस् टाकावे लागतील म्हणजे आता पुन्हा माघारी चालत जावून १० सेंटस्‌चनाणं घेऊन यायचं वैताग आला . पण त्या कॅनेडियन स्त्रीने मला या वैतागातून सोडवलं तिने १० सेंटस् नाणं दिलं आणि दार उघडलं त्या वेळपर्यंत माझ्या संयमाला मी रोखून धरले होते. तो दार उघडताच

हायसे वाटले तिकडे मला इतका का उशीर होतोय याची सर्वांना काळजी लागली होती !

टिफीन, खाण्याचे सामान आवरून आम्ही नदीच्या किनाऱ्यावर फिरून आलो आणि गाडी सुरु झाली या आयलँडला जायला तसे दोन, तीन रस्ते आहेत. जाता जाता सरळ रस्ता चूकला, आणि गाडी वेग-ळ्याच दिशेने धावू लागली मग लक्षात आले की डावीकडच्या वळणाचा रस्ता होता इकडे रस्ता चुकला की पुन. त्याच रस्त्याला यायला खूप लाबचा चक्कर घ्यावा लागतो मधे कुठेच थांबता येत नाही. कॅनडात वाहतुकीचे नियम अतीशय कडक आहेत.वेगवेगळ्या ठिकाणी ट्रॅफिक इन्स-पेक्टर्स त्याच्या गाडीसकट तयार असतात वाहतूक कंट्रोल ऑफीसातील रडारवर नियमभग करीत असलेल वाहन अचूक दिसत.ह्या इन्सपेक्टर्सना ती बातमी ताबडतोब पोहचते आणि कुठूनतरी त्याची गाडी येते. ५० ते १०० डॉलर्सपर्यंत दड होतो. इतकेच काय पण स्पीड जरी जशी दिली असेल, त्याप्रमाणे गाडी चालवली नाही तरीही द ड होतो. त्यामुळे गाडी चालवताना खूपच काळजीपूर्वक चालवावी लागते उगाचच्या उगाच आपल्याकडे जो कर्कश हॉर्न वाजवतात तसा हॉर्न ही वाजवता येत नाही. हॉर्न वाजवणे म्हणजे अपमानकारक समजतात इथे ! हॉर्न वाज-लाच तर समजतात की समोरचा काहीतरी भयकर चूक करतोय किंवा गभीर घटना असली पाहिजे. चुकीसाठी किंवा कुठल्या कारणाने सार्व-जनीक घोषणा देतात इथे तसे हॉर्न वाजवतात

चुकलेल्या रस्त्यानें पुन. मागे येऊन आम्ही सरळ रस्त्याला लागलो तोवर १ वाजला होता. थाऊजड आयलँडला पोहचलो दुपारी दोनच्या सुमारास !आयलँडची सफर करायला निरनिराळ्या बोटी उभ्या होत्या. फॉरीनर्सची आणि बेटावर रहाणाऱ्या तिथल्याच लोकाची रगीबेरगी गर्दी प्रत्येक बोटीसाठी क्यू लावून उभी होती. बोट केव्हा जाणार त्या प्रत्येक महिन्याच्या तारखा लागलेल्या होत्या हे आयलँड ऑटोरिओ प्रातात येते. त्यामुळे एका प्रातातून दुसऱ्या प्रातात आल्यावर वातावरण वेगळेच वाटत होते. आम्ही Gangnoaue बोट लाईन घेतली त्यावर लिहिले होते "The only Triple Decker line" या तीन मजली बोटीत

सर्वच सोयी असतात गिफ्ट शॉप पासून जेवणाच्या व्यवस्थेपर्यंत शिवाय रेस्ट रूमही जवळच जोडून असते

क्युमधे उभे राहून या बोटीचे तिकीट आम्ही काढले. आणि दुसऱ्या मजल्यावरच्या सीटवर अगदी खिडकिशी जावून बसलो. ओपन गॅलरीत उभे राहिले की पाण्याचे तुषार अंगावर यायचे. बोटीत कुठेही फिरता येत होते त्यामुळे सर्वदूरचा परिसर नजरेच्या टप्प्यात यायचा जवळ-जवळ ३५० ते ५०० पर्यंत पॅसेंजरस् या बोटीत बसू शकत होते तसा तर दुरवरचा हा बोटीचा प्रवासही पहिलाच होता सुट्टी घालविण्यासाठी किती तऱ्हेतऱ्हेचे लोक इथे आले होते.

समोर, मागे जेथवर दृष्टि जाईल तेथवर निळेभोर पाणी पसरलेले! खेळात मांडावे तसे मधून मधून बगळे ! पाण्यावरच्या फेनिल लाटा वाऱ्याच्या हातात हात घालून नृत्य करीत होत्या आपलचाकडे गंगेबद्दल "गंगा फेनसिता जटा पशुपते" म्हणतात तशीच या पाण्याची सीमारेषा दिसत होती थोड्याच वेळात ढगाचा गडगडाटही ऐकू यायला लागला. इकडे पाऊस पडतो तो झरझर आणि लगेच बंदही होतो वरूण देवाच्या नी पवनदेवाच्या मैत्रीतून गर्जना व हूकार बाहेर पडत होते. बोटीमधले लोक मात्र इकडून तिकडे आत्मविश्वासाने फिरत होते या पाण्यावर बोटीचे काय होईल ? ही पुसटशी शंकाही कुणाला आलेली नव्हती फेसाळणाऱ्या लाटाच्या गर्जना व नृत्यात बोटीचे यात्रीक आवा-जही ऐकू येत नव्हते अशा संमिश्र आवाजात मात्र मला माझ्याच देशाचे राष्ट्रगीत ऐकू येत होते

कितीतरी फ्रेंच लोक इकडुन तिकडे करीत oh, beautiful ! वगैरे उद्‌गार काढीत होते ही फ्रेंच माणसं नेहमीच कलाकुसरीच्या कामात गढलेले असतात वृत्तीने विलासी, पण त्याच्या कलामध्ये स्वर्गीय सौंदर्य आढळते एका प्रतिभावान लेखकाने तर म्हटलेय की 'फ्रेंच माणसाची तिरस्कार दर्शविणारी रागीट मुद्रासुद्धा सुंदर दिसते'कापूर किंवा कस्तुरी हवेत आपल्या सुगंधाने अस्तित्व व्यापून टाकतात तशी फ्रेंच लोकाची सभ्यता, वागणे बोलणे चहूकडे दरवळते. आमच्या शेजारच्याच फ्रेंच कपलला आम्ही आपल्या पध्दतीने चहा ऑफर केला. पण फ्रेंच कॅने-

डियन लोक चहा फारच कमी पितात. एक वेळ कॉफी चालेल पण चहा घेत नाहीत जेवणमात्र दोनदा घेतात. अर्थात तेही लाईट असे ! सकाळच्या जेवणाला ते 'देजूने' म्हणतात तर रात्रीच्याला 'दिने' म्हणजे डिनर ! त्या फ्रेंच कपलबरोबर कॉफी घेऊन आम्हीही दुर्बिण घेऊन डेकजवळ जावून उभे राहिलो उन्हाळ्यात मुद्दाम काही लोक इथे या लेकवर रहायला येतात आयलंडवर सुबक अशी घर लोकांनी बांधली आहेत बोटीवरच कार घालून नेतात व जाणे येणे करतात काही तर नेहमीसाठी, बर्फ असतानाही इथे राहणे पसंत करतात. हा सेन्ट लॉरेन्स नदीचा परिसर कॅनडातल्या अवघ्या परिसरामधे देखणा आहे दूरवर दिसत असलेला पण आता अगदी बोटीजवळ आलेला बोल्ट किल्ला दिसू लागला होता. भव्य दगडी इमारत फार प्राचीन आणि जुन्या संस्कृतीचे प्रतीक असलेल्या या किल्ल्याजवळ बोट थांबली काही लोक उतरले आम्ही नुस्ताच पाहून आलो पुढे जाताच या लेकवर असणारा एक इंटरनॅशनल ब्रीज जो सर्वात लहान आहे, तो दिसला. त्याची एक बाजू कॅनडाची तर दुसरी अमेरीकेची ! आणि मजा अशी की या एवढ्या छोट्या अंतरासाठी ही अमेरीकेतून इथे कॅनडात यायला, किंवा जायला व्हिसा लागतो अर्थात तिथे रहाणाऱ्या कॅनेडियन व अमेरीकन लोकांना मात्र तो लागत नाही.

या बोटीतून प्रवास केल्यावर थाऊजंड आयलंडचे सर्वात आकर्षण डोळ्यात भरते ती निसर्गरम्य हिरवळ, छोटेखानी बेटावरील घरे आणि त्याचे शांत असे जीवन १८३२ मधे बांधलेला Aistonic Town Hall इथून ठळकपणे दिसतो थाऊजंड आयलॅंड म्हणजे कॅनेडियन गेट वे ! क्लॉक टॉवर लँडमार्कही आणि त्याचे घड्याळाचे चकाकते काटे या बोटीतून दूरवर दिसतात त्यामुळेच ही ट्रीपल डेकर बोट सर्वांना आवडते. आम्हाला नंतर जॉईन झालेल्या सुजाता, प्रीति किती तरी वेळा पाहण्याबरोबर येऊन गेलेल्या पण उत्साह अगदी कायम होता

इथे आलेल्या फ्रेंच युवती, स्त्रियाच्या नटण्या मुरडण्याच्या रीतीसुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या ! कॅनेडियन फ्रेंच युवती मोत्याचे, खड्याचे अलंकार फार पसंत करते. पण या सर्व स्त्रियांचा वेश पाहिला की वाटत

भारतीय साडीत जे सौदर्य आहे ती या तोकड्या कपड्यात नाही शिवाय या सर्वच जणी केसाचा बॉब ठेवत असल्याने केसाच्या सुदर तऱ्हाही त्याना करता येत नाही त्यामुळे लांब शेपट्यावर किंवा अंबाड्यावर जो गुलाब, मोगऱ्याचा गजरा दिमाखाने भारतीय स्त्रीच्या केसावर रूळतो त्याला इथे वावच नाही शिवाय पायातले पैंजण्, चमकी, बिंदी हा सारा दागिन्याचा साजही इथे नसतो. पण गमत अशी की, आपले बघून, इथे कितीतरी तरुणींनी आपले झाऊन केस लांब वाढवलेले दिसले ते त्या मोकळेच टाकून फिरतात शिवाय कानातही, पूर्वीच्या आपल्याकडील स्त्रियाप्रमाणे दोन ठिकाणी टोचून दोन अलकार त्या घालतात या साऱ्या पाश्चात्य तरुणीना आपले सौदर्य आकर्षित करते तर आम्हा भारतीय स्त्रियाना त्याच्या short cut फॅशन्स आवडायला लागल्यात काही काळानी मधले अतर पुसले जाईल, इतके आपण त्याच्या जवळ पोहचलो आहोत निसर्गाला आपलस करुन घेता घेता आपण पुरातन सस्कृतीच्या एका आवर्तनातून बाहेर पडून पुन त्याच जागी जात आहोत

जातानाचा चिवचिवाट, परततांना शात झाला होता कुणी पे घेत, तर आईस्क्रीम खात शातपणे पाण्याच्या लाटाकडे बघत बसले होते अनुभवलेल्या साऱ्या क्षणाना मी शातपणे कुशीत घेतले होते. आणि प्रीति, कॅसेट लावून ऐकत होती ' सरसर चालली होडीत नाव ' आणि पावसाच्या मरीत सजनान होडीत लुटल ग ' मला हसायला आल वाटल, इतक्या दूरवर येऊन परत जायच्या कल्पनेवर मी क्षण मोजायला निघाले प्रीति सुजाता, प्रभा या कशा रमल्या असतील इथे ? ही दूरची वाट कशी जवळ केली असेल त्यानी ? गेलसबर्गला असताना डॉ जोशी काळे ' सत्यकथा ' बद पडल म्हणून हळहळ व्यक्त करीत होते, इतक्या दूरवर येऊनही कुठेतरी धागे आपल्याच सस्कृतीत जुळलेले होते

बोट किनाऱ्याला लागत होती,प्रीति वाचून दाखवित होती कविता गौरी देशपांडेनी एडिट केलेल्या पुस्तकातली ! मैत्रिणीनी दिलेला भावपूर्ण आतूर निरोप मग सुजाता, प्रीति सर्वच सामुहिक बॉनव्हायेज कविता वाचतात Mrs sulbha, now she is going to India and as she is .

बोट किनाऱ्याला लागली होती. थाऊजंड आयलेंडची जादुभरी निसर्गदुनिया सरली होती. दुर्बिणी बॅगेमधे दडल्या होत्या. बोटीतल्या पायऱ्या उतरतना... माझा तात्पुरता निरोपाचा बॉनव्हॉयेज सपला होता उद्या पुन्हा क्युबेकमधे !

० ०

# क्युबेकमधे

माट्रीयल पासून क्युबक फक्त दोन तासाच्या अंतरावर ! सकाळची खद थडगार हवा आणि कारचा प्रवास, त्यामुळे आपण प्रवास करतोय कधी जाणवतच नाही क्युबेकमधे पोहचलो तेंव्हा सकाळचे १० वाजले होते. तिथे अनेक टूरस् होत्या वॉकींग टूर किंवा फेरीने ! 'बोर्ड-वॉक हा जेरूसलेम नदीच्या किनाऱ्यावर लाकडी फळ्यानी तयार केलेला जगप्रसिद्ध रस्ता ! खाली, वर टेकडीसारखे चढून जातानाही हा लाकडी रस्ता इतक्या वर्षात टिकून आहे. वारा इतका जोरदार वहात होता की टल आपण उडून तर नाही जाणार ? थंडीने हुडहुडी भरलेली, पण काही गरम कपडा न घेताच निघालेलो ! वाऱ्याचे बोट धरून त्या कडी बोर्डावरून कधी जिन्यासारख्या पायऱ्यावरून तर कधी सपाट डावरून जाताना उत्साह वाटत होता

प्रीति, सुजाता, प्रभा आणि मी सर्वात पुढे होतो पुरूषवर्ग मात्र गेच रेंगाळला होता. जगप्रसिद्ध cyclorama बघण्यासाठी मन उत्सुक-े होते जगात सगळ्यात मोठा असा हा cyclorama त्यामुळे दिवस-' इतर सर्व बघून शेवटी त्या ठिकाणी जायचे ठरवले होते या बोर्ड-कलाच डफरीन टेरेसही म्हणतात चालता चालता एका पुतळ्याजवळ बलो क्युबेक ही क्युबेक प्रॉव्हीन्सची राजधानी असल्यामुळे जुनी फ्रेंच कृती तिथे दिसते वर खाली असे रस्ते असल्याने बहुधा टुरिस्ट लोक रीच फिरतात ह्या पुतळ्याचे वैशिष्टय म्हणजे जुन्या काळच्या

सोल्जरचे ते हुबेहुब चित्र होते. राजकीय फ्रेंच पुढारीचे ते प्रतीक होते. त्या पुतळ्याजवळ उभे राहून सर्व टुरिस्ट फोटो काढून घेतात

सर्वत्र रंगीबेरंगी परिसर ! नदीवर रंगीत नावाचे संमेलन ! तर या नदीच्या काठावरच तेथील लोकल आर्टीस्ट आपली देखणी कला माडून बसलेले दिसतात दुसरीकडे फुलाचे ताटवे आणि ती फुलगुच्छ विकणारी फ्रेंच युवती ! फुल विकत घ्यावी अस फार वाटत होत हे ओळखून की काय प्रभाने सहज किंमत विचारली तर २।। डॉलरला एक गुलबाचा बच म्हणजे ५ फुल ! इंडियन माणसाला इथे फुलात पैसे घालवणे परवडतच नाही किती वेळ तरी मी तें फुलाचे ताटवे बघत राहिले ! एक मात्र लक्षात आल की इकडे कॅनडात घरासमोर किंवा बागेत आतापर्यंत जितकी फुल पाहिली तेवढ्याचे रंग अतीशय सुंदर एकाच रंगाच्या अनेक शेडस् पण फुलाना सुवास मात्र नाही. म्हणूनच मॉंट्रीयलला पब्लिक लायब्ररीत काही फ्रेंच कवींची अनुवादीत पुस्तक वाचली तेव्हा लक्षात आल की या फ्रेंच साहित्यात कुठही सुगंधाच उल्लेख नाही. फुलाच्या विविध रंगाचा उल्लेख आढळतो पण सुगंध नाही Twinkle ही कवियत्री फ्रेंचमध्ये म्हणते,

" Cette petite perla qui tremlalotte
All buot ton oreille, et qui chuchotte
Fe ne suis quoi de tendre et de malin,
A l'air a lafois modeste et coquin,
Si go quenarde est cue et si d'evote "

यात भाव निराळे असले तरी एकूणच सुगंध घ्यावा तो भारती साहित्यातच ! याचे कारण स्पष्टच आहे. इथल्या फुलाना सुवासच नाह तर तो त्याच्या साहित्यात उतरणार कुठून ? आपल्याकडे प्राजक्ता जा जुई मोगरा किती सुगंधी फुल. कवींच्या काव्यातूनही ह्याच मनोज्ञ दर्श घडलेल ! तर हे लोक सुगंध आयात करून परफ्युमज् बनवतात तऱ्हे तऱ्हेची परफ्युमज् बनवावी ती याच लोकानी ।

फुलाचा मोह टाळून आम्ही पुढे सरकलो. ठिकठिकाणी पुतळे पुतळे ! पुतळ्याचे गाव म्हणावे इतके पुतळे या सिटीत आहेत. सर्वा जुनी कॉन्व्हेन्टची वास्तूही इथे अजून आहे. ही उत्तर अमेरिकेतली सर्वा

जुनी म्हणजे १७०० शतकातली आहे. सात एकर जमीनीवरची ही वास्तू दोनदा जळूनही तिच्या ज्या जुन्या भिंती आहेत त्या अजूनही तशाच आहेत जुना संस्कृती टिकवून ठेवणारी ही फ्रेंच मंडळी मला आपल्या जुन्या लोकांची आठवण करून देत होती सर्वत्र फ्रेंच भाषा या भाषेचा मूळ स्रोत सिटी हॉल ! १६३५ मधे उभारलेला ! तिथे जुने कॉलेज होते मला आठवल अनुपमा कुकडे क्युबेकच्या एका फ्रेंच कुटुंबात फ्रेंच बोलणे शिकण्यासाठी मुद्दाम येऊन राहिली होती प्रभा प्रीति व सुजाता फ्रेंच भाषा बोलत असल्याने सर्व माहिती गाईड सारखी देत होत्या चालता चालता आम्ही क्युबेक सिटीत या लाकडी पुलावरून वरेच चाललो होतो शॉपींग सेंटरला एखादा स्वेटर विकत घ्यावा म्हणून डोकावलो सेंटर मॉंट्रीयल सारखच देखण पण किंमती मात्र जास्तच वाटल्या.

सर्वांनाच जाम भूक लागलेली होती म्हणून कुठेतरी रेस्टारंटमधे जावे म्हणून एका चायनी रेस्टारंटमधे गेलो. पण चायनी फूड संपल्याने पिझ्झा खाऊनच भागवले. पोटात गेल्याने पुन्हा हिंडण्याचा उत्साह आला. दुपार होऊन गेली होती. Cyclorama पाच वाजता बंद होत असल्याने जाय लवकर उचलणे भाग होते चार वाजता आम्ही तिथे पोहचलो. लांबलचक क्यू होता तिकीट घेण्यासाठी ! आम्हीही त्यात उभे राहिलो. क्यू मात्र भराभर सरकत होता. तिकीट घेऊन आत एका गुहेसारख्या जागेत जावून बसलो वर बघणाऱ्याची लाईन संपली की आम्ही जाणार होतो. इंग्लिश व फ्रेंच भाषेत चाललेली कॉमेंट्री कानावर येत होती. उत्सुकता अनावर होत असतानाच आम्हालाही वर नेण्यात आले गाईड वगैरे नसतोच कॉमेंट्रीवरून आपणाला सर्व कळते Cyclorama म्हणजे जेरूसलेमचे २००० वर्षापूर्वीचे पॅनोरॅमीक भव्य दृष्य. ते वर्तुळाकार भिंतीतून दाखवतात ते बघत असताना वाटतं आपण त्या काळातच आहोत १८९५ साली ते 'पाऊल किलीपोटचक्स' या पॅनोरॉमीस्ट फ्रेंच माणसानी बांधलेलं आहे डोळ्याचं पारण फिटावं असं हे दृष्य याची उंची १४ मीटर आणि परीघ ११० मीटर असून १५४० स्क्वेअर मीटरचंच, हे आश्चर्य वाटावे असे व जिवंतपणा जाणवावा इतकं जिवंत चित्रण !

यात जेरूसलेमचा पश्चीम व पूर्वभाग येतो. आपण जिथून बघतो ते जिझस काईसला सूळावर जे चढवण्यात आल ते दृष्य, असत. जेरूसलेमच्या आसपासचे लहानमोठे पर्वत, दूरवर दिसणारे आकाश आणि ढगाळलेली हवा की कोणत्याही क्षणी पाऊस पडेल, अशी वातावरण निर्मिती केलेले हे दृष्य अप्रतीम सुंदर आहे. २००० वर्षापूर्वी घडलेल्या ऐतीहासीक घटनाची एक पूर्ण फिल्म बघत आहोत अस वाटल, नव्हे प्रत्यक्ष आपणच त्यातले एक होतो. दरवर्षी अमेरीका व कॅनडा येथील लोक हे दृष्य बघण्यासाठी एकदा तरी क्युबेकची टूर करतात. चाळीस मिनीटाचा हा डोळ्याचा प्रवास अती सुखद तर आहेच पण अविस्मरणीय ही आहे. बाहेर पडल्यानंतर कुणाशीही बोलाव अस वाटत नव्हत. आतल्या आत तो अनुभव सतत जिवत होऊन स्पर्श करीत होता.

बाहेर पडलो तर सध्याकाळ होत आली होती. Cyclorama बाहेरूनही एका उत्कृष्ट शिल्पाकृतीचा सुंदर देखणा अविष्कार भासत होता.कधीही न विसरण्यासारखी ही क्युबेकमधली वॉकींग टूर! क्युबेकचे मुख्य आकर्षण किंवा वैशिष्टच हे पायी फिरण्यातच आहे इथे तऱ्हेतऱ्हेचे लोक त्यामुळेच पायी फिरताना दिसतात कॅनडात आतापर्यंत फ्रेंच लोक इतकी जवळून बघता आलीत ती इथे पायी चालताना !

● ○

# कॅनेडियन लोकांचा पाहुणचार

न्यूयार्कला जावून आल्यानंतर तेथील एम्पायर इस्टेट, स्टॅच्यू ऑफ liberty,सारं मनात घोळवत मॉंट्रीयलमधे आलो तेव्हा वाटल कॅनडातल्या आणि अमेरीकेतल्या लोकामध्ये तसा बराच फरक आहे अमेरीकन लोक हे थोडे तुटक स्वभावाचे, बुद्धीवादी, अनंत शोध लावणारे, सतत बुद्धीची धार परजत ठेवणारे ! कॅनडातले लोक हे सौंदर्यवादी, कलासक्त असे. नीटस आणि रेखीव ! पायापासून डोक्यापर्यंत सतत काळजी घेणारे ! रोज वजनाच्या काटयावर उभ राहून वजन मोजणारे ! या कलासक्त देशातला एक तुकडाही अजून पूर्ण पाहून व्हायचा होता. पण शितावरून भात कळावा तसे मॉंट्रीयलच्या या देखण्या शहरातूनच या देशाची कल्पना येते. यात्रा कंपनीतून फिरल्याप्रमाणे घाईघाईने नुस्ती गावे अगर स्थळे बघायची नसल्याने चवीने एकेक गोष्ट न्याहाळण्यात त्या देशाचे खरे रंगरूप कळत होते

आता हळूहळू इथल्या सवयी, माणसे अंगवळणी पडत होते. कचरा दिसला तर तो हातात घेऊन कचऱ्याच्या बास्केटमधे पडत असे. एक दिवस सकाळी मला वाटत गुरूवार असावा, प्रभा भराभर सर्व घरात जमवलेला, अंगणातला, लॉनवरचा कचरा जमा करून भल्या मोठ्या प्लॅस्टीकच्या दोन पोत्यासारख्या पिशव्यात कचरा भरून तोंड बांधून भराभर रस्त्यावर गेली आणि कचऱ्याच पोत ठेऊन आली मला कळेना की एवढ्या घाईत ही हे सार आजच का करते ? त्याचे कारण गुरूवार आणि शनिवार हे दोन वार कचरा वाहून नेणारे ट्रक येतात सुटा कचरा उचलत नाहीत. ज्यानी अशा व्यवस्थीत रीतीने कचरा बांधून ठेवलाय अशीच प्लॅस्टीकची पोते ते रस्त्यावरून उचलतात या दिवशी आपण जर रस्त्यावरून फिरायला गेलो तर असंख्य पोती नजरेस पडतील दिलेल्या वेळेच्या आत ते पोत तिथे तयार नसेल तर ते तसच राहात त्यामुळेच कुठेही कचरा न टाकण्याची सवय अंगी भिनते. शिवाय दंड कसा परवडणार ? साधी गाडी वेडीवाकडी पार्क केली तरी सुद्धा तिथे

दंड होतो. मोजक्या जागेत गाडी पार्क करणे हेही तिथे कुशलतेने करावे लागते.

सेंटलॉरेन्स नदीच्या किनाऱ्याने वसलेले हे मॉंट्रीयल शहर अंडर-ग्राऊंड रेल्वेने – मेट्रोमुळे सर्वत्र तळघराशी जोडलेले असे आहे. Under ground city असच वर्णन करता येईल पण मेट्रोमुळे सर्व दळणवळण जोडले गेलेय. वर्षातून ८ महिने बर्फाने घेरलेले हे शहर ! सर्व जगात सर्वात जास्त बर्फाचा काळ इथे मॉंट्रीयल असतो म्हणून तर तळघराचा शोध लावावा लागला. मॉंट्रीयलबद्दल एका ब्रिटीश मॅगझिन मध्ये क्लीफ मिचेल मोर याने लिहून ठेवलेले उद्गार अतिशय बोलके आहेत तो म्हणतो, " let me assure you that the space, the layout the high ceilings and cascading lights the mosaics of glass and colored tiles inlaid in walls and floors combine to give brightness and airiness to this subterranean city जवळजवळ पाचशे वर्षा-पूर्वी लिआनार्डो डा व्हेन्सि याने अत्यंत खालीवर असणाऱ्या या जागेवर हे गाव वसवले. कारण तिथे Sub zero temp आणि सतत बर्फाची वादळ होतात अशा ठिकाणी सर्व सोयी निर्माण करण हे अत्यत बिकट काम ! ' to come in from the cold ' असच वर्णन कराव लागेल. पण ' Three dimentional planning करून लोकाना enjoy करता याव अशा सोयी करून बाहेर न पडताच Underground Railways ने सर्व ठिकाणी जाता येत जवळजवळ दहाहजार Indoor पार्कींग जागा मॉंट्रीअलमधे आहेत त्यामुळे बर्फातही एखाद्याला डाऊन टाऊनमधे जाता येते. मेट्रो ' हे महत्वाचे साधन म्हणूनच मानल्या जाते तिथे ! अशा या मॉंट्रीयल मधे तेथील लोकांनी दिलेला पाहुणचारही कलात्मकच वाटला.

शनिवारी सुट्टी असल्यामुळे येथील कनकरडिया युनिव्हर्सिटीत प्राध्यापक असलेले कादळगावकर याचेकडे आम्हाला बोलवले होते. अर्थातच मिसेस कादळगावकर या फ्रेंच असल्यामुळे फ्रेंच कुटुंबात गेल्यासारखच वाटले. त्याची आई, मुले सर्वच जण फ्रेंच सस्कृतीत मुरलेली पण इग्लिशही बोलणारी. इतकच काय पण रोझ कादळगावकर साडी देखील उत्तम नेसून भारतीय पदार्थही बनवतात. त्याच्याकडे गेल्या गेल्याच

ड्रॉईंगहॉलच्या दर्शनी भागची सजावट, पुस्तके यानी मन वेधून घेतले. सर्व घर पाव्हण्याना दाखवणं हा इथला Enjoyment चा भाग असतो. रोहित आणि शशाकच्या खोल्यावरुन जाताना पाहुण्यानी दाद दिली पाहिजे या हुशारीने सजवून ठेवल्या होत्या परदेशी किचनबद्दल मला विलक्षण आकर्षण आहे. म्हणून रोझबरोबर आधी किचनमधेच गेलो.

I am Queen
of this Kitchen
I reign supreme
If you donot agree
starve "

गेल्या गेल्याच कीचनमधल्या सेल्फामधे लावलेल्या या ओळी मला दिसल्या. रोझच्या आकर्षक व्यक्तिमत्वाशी त्या राणीसारख्याच जुळणाऱ्या होत्या. ठिकठिकाणी छोटे मोठे स्टीकर्स चिकटवलेले होते.बेडरुममधे सुदर झालरीची बेडस्प्रेड तशीच कुशन्स, आणि उशागतीला तऱ्हेतऱ्हेचे सेंटस्. माणसं आणि त्यानी जमवलेल्या वस्तू याचा, मी त्याच्या स्वभावाशी नेहमी मेळ घालण्याचा प्रयत्न करते कित्येकदा फसव्या चेहऱ्या खालचे बुरखे निघाले की ते किती केविलवाणे दिसतात हे मी बघितले होते. रोझाच्या लाघवी स्वभावाला कादळगावकराचा मृदु स्वभाव जुळला होता. रोझ तशी वडबडी नव्हतीच पण अबोलही नव्हती. इकडे आल्यापासून फॅमिली रुम ही कसेप्ट मला छान कळली होती नी आवडलीही होती. सर्व कुटुबातील माणसानी एकत्र वेळ घालवण्यासाठी असलेल्या या खोलीत टी. व्ही पुस्तक लिहिण्याच सामान, फुलझाड, फोटो, कलात्मक वस्तू इत्यादी माडलेल असत पण हॉलची शिस्त या रुमला नसते. इथे जास्त मोकळेपण असत. इथल्या आपुलकीच्या उबेत अवघडलेपण लगेच जात. सर्व फिरुन, लॉन बघून आम्ही जेवणाच्या खोलीत आलो. रोझने मेनू छानच केला होता पण मी कट्टर व्हेजिटेरियन असल्याने, त्याचा आस्वाद घेऊ शकले नाही सूप, म्हणजे यात बीफ सुद्धा, कादा, लसूण, गाजर टमाटो आणि सेलरी घालून करतात पुलाव व मॅकरोनी आणि हिरवे सॅलडस् त्यावर घालायचे निरनिराळे ड्रेसिंग्ज ! आणि शेवटी डेझर्ट म्हणून बदामी हलव्यासारखा खास पदार्थ, 'बकलावा' ! एकएक पदर उलगडत जाणारा हा एक कोमल पदार्थ ! रोझ फ्रेंच असूनही आणि नोकरी

करणारी असूनही तिच्या हाताला मुळातच चव असावी असं वाटत होतं. आपल्याकडे आपण मोठयाना ताई, राव जोडून नावाची मलावण करतो तसे इकडे नाही फोनवर बोलतील तरी पहिल्या नावानें एकेरीच ! रोझला मी म्हटले तुमच्या आईला काय म्हणतात ? ती म्हणाली इथें सर्वंजण एकेरीच नाव घेतात जेवताना हसत खेळत, गप्पा करत आणि थोडीशी साडलवणही होतेच शेवटी स्त्री पुरुष इथले काय नी भारतातले काय सर्वांच्या मानवी स्वभावाच्या रीती एकच ! फरक असेल तो आकारात, अभिव्यक्तीत ! कदाचित मी माझी कविता मोगऱ्याच्या सुगंधात मांडत असेन तर इकडे ती डॅफॉडिलच्या आकारात ! इतकाच काय तो फरक त्यामुळे रोझकडे खूप होमली वाटले. आपल्या देशाच्या एका तुकड्याला स्पर्श केल्यासारखे वाटले.

कॅनडियन, अमेरिकन माणसे प्रवास खूप करतात. त्यामुळे शोभिवंत वस्तूनी घर सजवलेल असत. सुतळीच्या वेण्या गुंफून बाहुल्या अडकवणे, किंवा गिल्ड बनवणे म्हणजे वेगवेगळे तुकडे जमवून त्याची गोधडी बनवण आणि शोपीस म्हणून ठेवणे. या ठिगळ कामाच्या प्रदर्शनात माझी मैत्रीण अजिता काळे नी मीरा देवरस तर अगदी आघाडीवर आहेत. रिंग, चमचे असे अनेक छंद ! माझ्या एका मैत्रिणीकडे नुसत्या परड्याचच प्रदर्शन होतं रोझनेही यातील बऱ्याच वस्तू बनवल्या होत्या Family room मधे आपल्या कुटुंबियाचे फोटो तर इतके लावले होते रोझने, लग्नातले, मुलाचे पार्टीचे, इ. अनेक फोटो पाहुण्याना दाखवण हाही एक महत्वाचा Job असतो. आपण कटाळू पण ते तितक्याच रसिकतेने दाखवत असतात. रोझ म्हणाली मला माझ्या मुलाची लग्न हिंदू पद्धतीनेच करायला आवडतील. मला रोझचे बोलणे अगदी खरे वाटले कारण माझी एक मैत्रीण तिचा अनुभव सागताना मला म्हणाली होती की, माझ्या मद्रासी मैत्रिणीच्या मुलीने अमेरीकन तरुणाशी लग्न ठरवलेय्. आणि त्या तरुणा-सकट त्याच्या आई वडीलांना हिंदूपद्धतीने धार्मिक विधी करुन मुंडावळ्या वगैरे बांधून लग्न करायचे आहे त्या मैत्रीणीने रीतसर तसे लग्न अमेरीकेत केले हे लग्न कितपत यशस्वी होईल असा माझ्या मनात विचार आला कारण आपली संस्कृती आणि अमेरीकन संस्कृती यांच्यात केवढी तरी तफावत आहे. दिसण्याच्या कल्पनेपासून तो खाण्याच्या कल्पने-

पर्यंत. मैथिली आवडीने बकऱ्याचे व गायीचे मास (बीफ) खाते म्हणजे भारतीय सस्कृतीला तडाच नाही का ? मी माझ्या मैत्रिणीला विचारले ती आता सुखात आहे का ? ती म्हणाली ती तर आहेच पण तिचा नवरा कार्ल, त्याचे आई वडील देखील ! कार्लची आई मानसशास्त्रज्ञ आहे. ती विचारत होती या लग्नात तुमच्या मुली तुमच्या सारख्या भोवतीच होत्या, इतकी आपुलकीची भावना कशामुळे निर्माण होते ? आमच्याकडे सर्व प्रकारच्या सवलती, सोयी व स्वातन्त्र्य देऊनही घटस्फोटाचे प्रमाण वाढतच आहे मानसिक विकृती, बाल गुन्हेगारी हे ज्वलत प्रश्न आम्हाला भेडसावित आहेत. या कार्लच्या आईच्या बोलण्याने मला अंतर्मुख केले. आपल्या रीतीरीवाजावद्दलच्या श्रद्धा ढासळत आहेत. एकाच नवऱ्या-बरोबर सबध जन्म काढायची काय गरज ? असाही विचार स्त्री मुक्ती चळवळीच्या दिशेने प्रगट होत आहे. •

कुठे तरी किंवा कोणावरुन तरी मी जीव ओवाळून टाकीन म्हणजेच आत्मसमर्पण करीन ही भावना प्रत्येक माणसात, स्त्रीत किंवा पुरुषात, असण त्याच्या प्रगतीच्या दृष्टीन फारच आवश्यक असत हाच नवरा आणि त्याच्या शिवाय गत्यतर नाही ही खात्री झाल्यावर त्यावर तोंड काढण्यासाठी म्हणजेच तो आपल्यापेक्षा कमी असेल तर त्याला आपलया पातळीला आणणे, स्वत: कमी असलो तर त्या पातळीवर जाणे प्रतिकूल परिस्थितीवर मात करणे, यासाठी प्राण पणाने प्रयत्न करताना अनेक गुण कसाला लागतील त्यामुळे जीवनाचा वेग वाढेल. यातसुध्दा आयुष्य जगण्याचे तेज आहेच. स्त्रीला वटसावित्री तर पुरुषाला विवाह करताना अग्नी व ब्राह्मण ह्याना साक्षी ठेऊन'धर्मेच' 'अर्थेच कामेच नातिचरामि नातिचरामि नातिचरामि' म्हणाव लागत ही जबाबदारी साधी नाही आपल्या धार्मिक विधीचा अर्थ या अमेरीकन कार्लनी कसा केला असेल ? कार्लचे आई वडील विचारवत मडळी आहेत. ते जेंव्हा आपल्या चालीरीती, भारतीय विचारपध्दती व जीवनमूल्ये याविषयी गंभीरपणे विचार करू लागतात तेव्हा आपणही विचार करायला हवाय् की सर्वांगीण आणि खूप सखोलविचार करता शास्त्रशुध्द पाया शोधण्याचा प्रयत्न केल्याशिवाय जुने रीतीरिवाज सोडणे हानीकारकच होईल.

रोझ सागत होती की कॅनडा अमेरीकेत कायद्याने घटस्फोट फार सोपा करुन दिलाय. धुम्रपान करतो म्हणून, मुलांवर जास्त प्रेम करतो म्हणून, जास्त घोरतो म्हणून, मानसिक यातना सहन कराव्या लागतात म्हणून मी या नवऱ्याशी सबध ठेऊ इच्छित नाही अस म्हटल की स्त्रीला इथे घटस्फोट मिळतो मी तिला म्हटले, "रोझ, ज्यावेळी आपण जोडीदाराचे दोष सहन करूनही त्याला आपला म्हणून त्याच्याबरोबर जगण्याची तयारी करतो त्यावेळी मनाची सहनशक्ती वाढत असते योग्य प्रकारचा सयम मनावर ठेवण्याची सवय माणसाला लागली तर त्याच्या व्यक्तीमत्वात तेजस्वी कणखरपणा येतो. योग्य प्रमाणात केलेला त्याग मनाला विक्षक्षण समाधान देऊन जातो. उलट मनाचे चोचले पुरवित गेले तर त्याला अतच उरत नाही." शिवाय घटस्फोट घेण्यासाठी मुलाकडे दुर्लक्ष होणारच नतर दुसरा नवरा शोधण्यासाठी स्वत च्या शारीरिक सौंदर्याकडे जास्त लक्ष देणे, पार्टी वगैरे ओघाने आलेच. म्हणजे एक नवरा सोडून दुसरा करणे यात काय झीज होईल ही कल्पनाच करू शकत नाही रोझला मी म्हणत होते ते कळत होते म्हणाली इकडे मुलाकडे जे दुर्लक्ष होते तेही बायको माझ्याकडे पूर्वीप्रमाणे लक्ष देत नाही अशी तक्रार करतात, त्यामुळे निष्प्रेम असुरक्षीत वातावरणात मुले वाढल्यामुळे त्यातूनच विकृती निर्माण होतात.

मुलाना आयाच्या भरवशावर ठेऊन जातात, त्यातूनही अनेक मुले लहान असलेली गुदमरून मरतात, अशा केसेसबद्दलही रोझनी बरेच सागितले. रोझच्या घरचे वातावरण मात्र मिश्र स्वरूपाचे ! आपल्याला वाटत कॅनेडियन, अमेरीकन माणसाला प्रेमच नसत. पण रोझचं कुटुब याला अपवाद होत त्यानाही काका, मामा, भाच्चे याचा गोतावळा हवा असतोच त्याच्या फोटोच्या वेडातून ते कितीतरी वेळा प्रकट झाल होतं

रोझचा पाहुणचार घेऊन आम्ही कारनी प्रभाच्या जुन्या मॉट्रीयल मधल्या घरावरून यायचे ठरवले. ते एक अपार्टमेंट होते.त्याची मालकीण मिसेस कोटन आम्हाला रस्त्यातच घराजवळ भेटली. प्रभाशी फ्रेंचमधे ब्ऱ्याच आठवणींच्या गप्पा करून मग आमची तिच्याशी ओळख झाली. ती सध्या काय करत असेल तर तिने फुटपाथवर एका खाबाला एक

बोर्ड टांगला होता 'एल्डरली पीपल ! मिसेस आणि मिस्टर कोटन रिटायर्ड पिपल होते तिने तिच्या गप्पांचा मोर्चा आमच्याकडे नवीन म्हणून वळवला अभिमानाने ती सांगत होती मी नेव्हीत होते तेंव्हा माऊंट बॅटन सारख्या ऑफीसराची देखभाल करत होते तारुण्य सगळ समुद्र आणि जहाजावर काढलय् आणि मिस्टर कोटन सबमरीन डिटेक्टीव्ह होते. त्याच्या बोलण्यावरून वाटल की समुद्र सोडून ते शहरी वाता-वरणात आले तरी समुद्राने त्याचा पाठलाग सोडला नाही एकाकीपणाच्या गर्द समुद्रलहरी अजून जास्तच त्याच्या भोवती दाटल्या आहेत समुद्र जवळ होता त्याना, म्हणून ती अजूनही समुद्राशी जुळलेलीच राहिली. पानबुड्याच्या सहवासात समुद्राच्या कुशीत त्याचे जीवन गेल्यामुळे ती स्वप्नात हरवल्यासारखे सांगत होती. 'सबमरीन मला समुद्राच्या आत आत त्याच्या गर्भापर्यंत घेऊन जाई. मी इतकी समुद्रात राहिले की माझी मुल देखील माझ्या गर्भात एवढे राहिले नाही मी समुद्रकन्या आहे.' ती अशी स्वप्नात हरवून बोलत होती की तिच वृद्धत्व जाणवतच नव्हत अमेरिकन न्युक्लियर सबमरीन बेस वर प्रतिक्रिया देताना ती म्हणायली, फारच डेंजरस आहे हे न्युक्लियर सबमरीन बेस म्हणजेच समुद्राच्या आतील एटामिक फ्युयेल. त्याचा बेस घातक आहे. वाटत की समुद्राच्या गर्भामध्ये कॅन्सर झाल्याय मोठमोठे कीटाणू तिथे पाळतात. कधी न्युक्लि-यर वॉर झालेच तर या समुद्राची दाणादाण होईल मग कोण जाणे आमचा देश कुठे असेल ?' मिसेस कोटन एवढी गंभीर झाली होती खर तर आता तिचा देश कुठला असणार ? तिनी आपल्या मऊ ओलसर हातात माझे हात घट्ट धरले नी म्हणाली 'come soon 'and meet me इतक प्रेमभरानी म्हटल की माझ्या आतल्या तरल संवेदनाना गदगदून आले तिच्या हातातून हात सोडवत तिचा निरोप घेतला नी जुन्या घराचे दर्शन घेऊनच घरी परतलो.

● ●

# कॅनेडातील भारतीय कुटुंबात

कॅनडात प्रत्येक गावात फिरताना कुठे ना कुठे भारतीय लोक भेट-तच त्यातही मराठी माणसानी कॅनडा खुपसा व्यापलेला देश आहे खुद्द मॉंट्रीयलमधे तर मराठी मंडळात किती तरी मराठी नाव ओळखीची वाटली तशी आटावा, टोरान्टोलाही मराठी कुटुंबाची वस्ती आहे.

मला सुरवातीपासूनच माणसाबद्दल, स्त्रियाबद्दल कुतुहल वाटत आले आहे प्रत्येक भूमीवरचे स्त्री पुरुष एका वेगळयाच बंधनानी जखडलेले असतात जशी माती तशी माणस अस आपण नेहमी म्हणतो पण परदेशात गेलेल्या मराठी स्त्रिया गाडयाबरोबर नळयाची यात्रा म्हणून पतीराजाबरोबर गेल्या असल्या तरी त्या तिथे स्वस्थ बसलेल्या नाहीत. प्रत्येकीने आपआपले व्यवसाय क्षेत्र निवडून त्यात यश मिळविले आहे. त्याचे परदेशातील वास्तव्य केवळ अत्याधुनीक घरापुरतेच मर्यादित नाही तर सर्वस्वी निराळया अशा या परदेशच्या भूमीतही त्यानी भरघोस यश प्राप्त केले आहे

मला भारत सोडूनही बरेच दिवस झाले होते फिरण्या, बोलण्यात वागण्यात एक पाश्चात्य आत्मविश्वासही आलेला होता. निघतानाच मी ठरवले होते की माझ्या देशातील स्त्रियाचे प्रश्न जसे आपल्याला भेडसावतात तसेच याही संपन्न देशात काही प्रश्न असतीलच त्याना जवळून पहायच, जाणून घ्यायच मानवजात इथून तिथून सारखी असली तरीही वातावरण, औद्योगिकरण, यांत्रिकीकरण या सर्वांचा एक सामुहिक परिणाम असतो, म्हणून मग प्रत्येक स्त्रीच निराळेपण लक्षात येत

जगप्रसिद्ध नायगऱ्याची किनार लाभलेला हा कॅनडा देश कलासक्त व सौंदर्यपूजक आहे. अशा या पार्श्वभूमीवर आपल्या भारतीय कुटुंबातील स्त्रिया परदेशात कुठला व्यवसाय करतात, त्याचे राहणीमान, त्याच्या मुलाचे प्रश्न, वृद्ध लोकाचे प्रश्न, सगळयाच प्रश्नानी माझ्या मनात त्याच्या विषयीचे कुतुहल जागृत केले. एकूणच जवळ जवळ २० टक्के भारतीय स्त्रिया तिथे नोकरी करतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियाचे प्रमाण तिकडे

जास्त असण्याचे कारण, कोणत्याही वयाला ती मिळू शकते. प्रत्येक शिक्षण घेताना एकाच विषयावर भर देऊन त्याचा कोर्स केला की तिकडे नोकरी लगेच मिळते. त्यामुळे स्वत च्या घराला हातभार लाव-ण्यासाठी, स्वत च्या समाधानासाठी, करीअरसाठी ही स्त्री नोकरी करते

माट्रीयलमधच ओळख झालेल्या आणि प्रभाची मैत्रीण म्हणून अनु-पमा कुकडेकडे आम्ही सहज गप्पा मारायला गेलो होतो.तीचे आईवडील आल्याने तिने सत्यनारायणाची पूजाही केली त्या दिवशी ! कॅसेटवर टेप करून आणलेल्या, मंत्राच्या श्लोकाच्या सुरेल संगीतात ही पूजा असते पण अनुपमाने त्या प्रत्येक श्लोकाचा अर्थ माहीत करून घेतलेला कारण प्रसादाला कॅनेडियन,फ्रेंच मैत्रिणी आल्या तर त्या त्याचे अर्थ विचारतात म्हणून ! भारतात आंधळेपणानी रूढीपरंपरा चालत आलेली म्हणून ही पूजा सर्व गडबड गोंधळात होते. तेंव्हा किती जणाना त्याचे अर्थ समज-लेले असतात ? पण इथे अनुपमा डोळसपणे ते समजावून घेते

कॅथरीन बुथ हॉस्पीटलमध्ये अनुपमा ऑक्युपेशनल थेरिपिस्ट म्हणून काम करते अनुपमाचे काम मलाही समजावून घ्यावेसे वाटले ती म्हणाली, तिथे जास्तीत जास्त वृद्ध लोकाना त्याच्या resident abilities प्राप्त करून दिल्या जातात. हे लोक कुटुंबापासून तुटलेले असतात नातेवाईक किंवा लोक याची फिकीरही करीत नाही त्यामुळे एकाकी जीवन वाट्याला येत आणि या एकाकीपणातूनच मग ६० व्या अगर ७० व्या वर्षी ते लोक लग्न करतात ' अशा वेळी आपल्या आई, आजीच वय डोळ्यापुढे येत मला तर वाटल की प्रथम पासूनच आईवडिलाचे जीवन स्वतंत्र व मूलाचंही स्वतंत्र ही दृष्टी असल्यामुळे तसे वृद्ध स्त्रियाना टाकून दिल्या जात नाही. पण त्याच्या अंगात भिनलेली स्वतंत्र वृत्तीच त्याना पुढच्या जीवनात तडजोड करू देत नाही. अनुपमाशी गप्पा कर-ण्यात तो पूर्ण दिवस निघून गेला

मॉंट्रीयलमधेच बरेच दिवस राहिल्याने कुठल्या तरी निमित्याने प्रभाच्या मैत्रिणी अनत भावजीचे मित्रसर्कल अशा अनेक मराठी कुटुंबि-याशी आमची ओळख झाली होती. प्रत्येकजण दर सुटीला घरी जेवायला

बोलवित आणि त्याचे अगत्यशील निमंत्रण आम्हीही स्वीकारीत असू. प्रत्येक भारतीयाचे घर इथले समृद्ध, सर्वसोयींनी नटलेले आणि खूप पॉश आहे ही सर्व पिढी साधारणत: ४० ते ४५ वयाची नी ह्या लोकाची मुले १२ वी करून पुढच्या ग्रज्युएशनची तयारी करणारी अशी वयाची त्यामुळे प्रत्येकाकडे आपल्या भारतीय मुलाचेही काही प्रश्न ओघाने आलेच एक पिढी मनाने अजूनही भारतीय आहे तर ही तरूण पिढी पुर्णत: पाश्चात्य विचारसरणीची झालेली आहे त्या सर्वच कुटुंबा-तील स्त्रीवर्ग हा नोकरी करणारा ! काळाची व परिस्थितीची गरज म्हणून का होईना या स्त्रिया करीयर करतात आपल्या कडल्यासारखी वयाची मर्यादा नौकरीत आड येत आही.त्यामुळे कोणच्याही वयाला नोकरी मिळू शकते. अर्थातच त्याचे नेमलेले कोर्स करुनच ! रजनी कर्णिककडे जाताना तिच्या मुलांशी आज चर्चा करायची असे ठरवूनच गेलेलो.

अमेरीकेत नोकरी करताना भाषेची अडचण येत नाही. सर्व व्यवहार इंग्रजीतून करायचा असल्याने भारतीय स्त्रीचे तिथे अडत नाही पण कॅनडात मात्र फ्रेंच भाषा आल्याशिवाय पुढची सारी दार बंद असतात. त्यामुळे रजनीने फ्रेंच आधी शिकूनच ही नोकरी मिळवलेली या व्यवसायात स्त्रिया अधिक आहेत ती म्हणाली की इथे कॅनेडियन स्त्रिया बरोबर काम करताना कुणीही कमी लेखत नाही. वातावरण अत्यंत खेळीमेळीचे असते शिवाय जी प्रमुख टेक्नालॉजिस्ट आहे तिही भारतीय स्त्रीच आहे भारतीय आणि 'स्त्री' या दोन्ही गोष्टीना तिथे मान दिल्या जातो रजनी मराठी मंडळाची सेक्रेटरीही आहे प्रभा, अनुपमा या साऱ्याच तिथल्या मंडळात मराठी कार्यक्रम घडवून आणतात

रजनीच्या घरी कॅसेटसच, कलेक्शन सर्वतऱ्हेच जमवलय्, शिवाय ह्या सर्वांनाच संगीताची आवडही दिसली. प्रभाला क्लासीकल, भीमसेन, गंगुबाई हनगलची आवड तर रजनीला आधुनिक नाटयगीत. आणि मुख्य म्हणजे हे सार करायला वेळ मिळतो कारण कॅनडात खाण बहुतेक टीनच्या डब्यातून किंवा फ्रोझन फुडसच्या पॅकेट मधून फ्रूट ज्युस,सिरील-साठी तयार डबे,कॉफीसाठी क्रीमसुद्धा रेडिमेड,काही वेळा तर तयार जेवण टीन मधील – गरम करा आणि जेवा. रजनीच्या मुलाना तर रोज पिझा

नाहीतर वेळ मिळाला की स्टीक, पाय किंवा बेक केलेले पदार्थ किंवा बार्बेक्यू खूप आवडायचे. रजनीची दोन्ही मुल Healthy and Wealthy वाटली एकुणच इकडच्या मुलावर खाण्यापिण्याचाही परिणाम दिसतोच येताजाता चॉकलेट कॅण्डीज, कुकीज व सुकामेवा वगैरे गोष्टीची रेलचेल शाळेत मुलाना ब्रेकफास्टही सकस मिळतो शाळेतून घरी येताच पकज कॉम्पूटरवर गणित सोडवित असे इतरही अभ्यास कॉम्प्युटरच्या सहाय्यानेच करीत असे कधी अभ्यासाचा कटाळा आला की कॉम्प्युटरवर खेळही खेळायचा ते सर्व बघून वाटल की कॉम्प्युटर हा नुसता त्याचा गुरू नव्हता तर एक दोस्त, एक साथी होता

शाळेत म्हणे प्रत्येक मुलाना कुठला ना कुठला खेळ खेळावाच लागतो फुटबॉल, बेसबॉल, हॉकी – शाळेच्या वेळात नी आवारातच त्याच्यासाठी खेळाची व्यवस्था असते तिथे त्याना ट्रेनिगही दिल्या जात. रजनी सागत होती शाळेत इतकी शिस्त असते की एकदा पकज रात्री खूप जागला, गाण्याच्या कार्यक्रमामुळे, तर दुसरे दिवशी वर्गात त्याला झोप यायला लागली तर लगेच रजनीला शाळेतून चिठ्ठी आली की 'काल त्याला वर्गात झोप येत होती, तो नीट वेळेवर झोपला नव्हता का ? तुम्ही बघितल नाही का ?'

मुलाची इतकी काळजी घेणाऱ्या व त्याच स्वतत्र व्यक्तिमत्त्व घडवणाऱ्या शाळाकडे बघताना नकळत मला आपल्या मुलाच्या शाळा आठवल्या. पहाटे उठण्यापासुन तो ड्रेस तयार करून देऊन खाऊचा डबा तयार करून देण यातच किती वेळ जातो. शिवाय सध्याकाळी घरी येतात तेव्हा खाद्यावरच्या पुस्तकाच्या ओझ्यापेक्षाही होमवर्कच ओझ मोठ असत शाळेत खेळ नसतोच आणि प्रचड होमवर्कमुळे सध्याकाळचा खेळही बुडतो. अशी ओझ्यान वाकलेली, खेळाच कसब नसलेली पण निव्वळ पुस्तकी अभ्यासात गुतुन पडणारी व सर्वस्वी आईवडलावर अवलबून असणारी आपली मुल पाहिल्यावर इथली तरतरीत आनदी रसरशीत मुल वेगळीही वाटली स्वत च, स्वत.च करून घेणारी ही मुल अभ्यासाबरोबर जगण्याचा आस्वादही घेणारी वाटली

शनिवार, रविवारची तर सारेच जण इकडे उत्सुकतेने वाट बघतात. अशा उत्साहातच आम्हाला ज्योती इनामदार आणि उषा मुखडेकर

भेटल्या ज्योती तर अजूनही मी नागपूरचीच . म्हणत हळवी होते. मुलाना वीकएण्डला तबू ठोकून Enjoy करणारी ज्योती एकदमच जवळीक साधून गेली उषाताई तर घरी भेटणार नाही म्हणून आम्ही त्याच्या ऑफीसमधेच गेलो स्वभावाने मोकळ्या आणि आणि गोड बोलण ! त्यामुळे दुसऱ्यावर सहज छाप पडावी गाणे असो, नाटक असो, स्मिता पाटीलचा सत्कार असो उषाताईचा सहभाग सर्वच क्षेत्रात, व्हॉयेजर कपनीत त्या एजट आहेत ऑफीसमधे विमानाची तिकीट बुक करण्याकरीता लोकाची सतत वर्दळ असते, आम्ही गेलो तेंव्हाही त्या एका हाती फोन त्यावर त्या कुणाशी तरी फ्रेंचमधून बोलत होत्या , समोर बसलेल्या अमेरीकन वृद्ध जोडप्याशी इग्लिशमधून तर मधेच आमच्याशी मराठीतून एकाच वेळी पाच भाषातून बोलणाऱ्या उषाताईना ही नोकरी मनापासून आवडलेली आहे. कारण कुणाचेही प्रश्न आपुलकीने सोडवून दिले की त्या खूष होतात अनेक अनुभवही येतात एकदा म्हणे फ्रेंच कॅनेडियन स्त्री तीन मुलीना घेऊन आली आणि तिला लडनला जायचे होते तिकीट तिने स्वत च्या पैशातून काढले होते नवऱ्याला हे कळताच त्याने तिला मारहाण केली आणि उषाताईकडे पैसे मागण्यासाठी आला सर्व तिकीटाचे पैसे स्वत.च घेऊन गेला " उषाताई म्हणाल्या इथले मराठी लोकच आमचे कुटुबीय झाले आहेत मुलाना भारतीय वळण लावण्याचा प्रयत्न त्या करतात मराठी बोलण, साध्र खाण ! पण मुल सागतात की आज काय खाल्ल ? म्हणताच वरण-भात खाल्ला हे उत्तर देता येत नाही. त्यामुळे मुलानाही इथल्याच वातावरणाशी सडजोड करावी लागते. मुलीच्या लग्नाचा प्रश्न मात्र त्याना फार भेडसावतो तसे तर ही दूसरी पिढी ही पूर्ण त्याच वातावरणातली आहे

तेजा अडकरकडे आम्ही न कळवताच गेलो इडियन स्टाईलने ! पण सुदैवाने सर्वच मडळी घरी होती मग रात्री जेवण, टी व्ही बघूनच घरी परतायचे ठरले तेजाकडे तिला दोन मुलीच आहेत ! तेजा स्वत च त्या वातावरणाशी पूर्णत समरस झाली आहे गेल्या गेल्याच तिने सर्व घर दाखवले स्वत साठीचा खास कीचन टेबल वरचा टी व्ही दाखवला. मुलींच्या खोल्याही ! तिची एक मुलगी कुणा कॅनेडियन मुलाबरोबर अभ्यास करीत होती आम्ही जाताच ती समोर येऊन आम्हाला भेटली

लगेच तिच्या बॉयफ्रेंडशी ओळखही करून दिली. आणि ५ मिनीटात ते दोघे त्याच्या अभ्यासात मग्नही झाले. मला मात्र वाटल की हा मित्र तिच्याशी लग्न करेल का ? आणि मी सरळ तेजालाच विचारल, तेंव्हा ती म्हणाली की बहुधा जे अगदी निकट येतात त्याची लग्न होतात नाही-तर बाकी मैत्री बाहेरच्या क्षेत्रातच मर्यादित असते. तेजाने तिच्या मुलीनाही त्या वातावरणात धीटपणाने वाढवले आहे स्वातन्त्र्य दिले आहे. रात्री जेवण होताच आम्ही T. V. समोर बसलो इथल्या वृध्द लोकाना T. V हा एक मित्रच वाटतो एकाच वेळी अनेक चॅनेलवरुन (जवळ-जवळ ४५ चॅनेल्स) शेकडो प्रकारचे कार्यक्रम तुमच्यापर्यंत येतात कार्यक्रम कुठलाही असो दरदहा मिनिटानी जाहिरात ! असा वैताग वाटला मला (आपल्याकडेही हे जाहीरातीचे लोण पोहचले आहेच) पण इथले लोक या जाहीरातीतल्या वेळेचाही उपयोग करून घेतात कुणी तेवढ्या वेळात फ्रीज उघडून कोकचा डबा आणतात कुणी जाऊन टोस्ट बनवून घेतात काही तरुण फोनवरुन मैत्रिणींच्या डेटस् घेतात तर लहान मुल होमवर्कही उरकुन टाकतात. तेजानी दोन तिन कॉमीक्सची पुस्तक बघायला दिली. त्यात एक व्यगचित्र होत. टी. व्ही वर सतत दिसणाऱ्या या जाहिराती दाखवण बद केल तर काय होईल ह्या प्रश्नाला त्या व्यगचित्रकाराने चित्र काढून दाखवल होत त्याच्या पहिल्या चित्रात घराचा कुटुबप्रमुख जाहिरातीच्या वेळात पेपर वाचता येत नाही म्हणून तक्रार करतो, दुसऱ्या चित्रात त्याची पत्नी एरवी जाहिरातीच्या वेळात डिनर फिक्स करीत असते (म्हणजे डब्यातील तयार पदार्थ फक्त गरम करून बाहेर आणणे) या कामासाठी आता कार्यक्रम सोडून येताना ती नाराज होते तिसऱ्या चित्रात एका क्लास टीचरच्या ‘ होमवर्क का केल नाही ? या प्रश्नाला छोटी मुलगी उत्तर देते ‘ हल्ली टी व्ही वर जाहीरातीच नसतात तर होमवर्क करायला वेळ कुठून मिळणार ? ! म्हणजे या परदेशी लोकानी जाहीरातीना आपल्या जीवनात कस नेमक सामावून घेतलय त्याचच हे बोलक चित्रण होत तर दुसऱ्या कॉमीक्समधे टी. व्ही वरच्या कार्यक्रमा-पेक्षा, कार्यक्रमाच्या पूर्वी, मध्यतरी आणि नतर दिसणाऱ्या जाहीरातीच सुदर असतात अस चित्रकारानी सुचवलेल होत. इकडील दूरदर्शनचे कार्यक्रम बघताना मला हे चित्र कायम आठवत असते.

एकूणच कॅनडात टी. व्ही बघताना मला सर्वात आवडलेले टेलि–व्हिजनवरचे कार्यक्रम म्हणजे मुलासाठी असणारे कार्यक्रम ! किती विविध प्रकारचे कार्यक्रम असतात. कधी फॅन्टसीज, तर कधी विज्ञानावर आधारलेल्या कथा, कधी संगीत नृत्याचे तर कधी वॉल्ट डिस्नेनें रंगव-लेल्या मिकी माउस आणि डोनाल्ड डकच्या गोष्टीचे ! शनिवारी सुट्टी म्हणून खास कार्यक्रम त्या दिवशी सकाळी उठल्याबरोबर मुले ब्रेकफास्ट आटपून दिवसभर टी व्ही पुढेच बसलेली असतात अर्थात वीकएण्डला इतरही कामे सुरूच असतात. वीकएन्ड म्हणजे नुसती विश्रांती नव्हे तर साठलेले कपडे धुणे, व्हॅक्युमक्लीनरने घर साफ करणे आणलेल्या सिने-माच्या कॅसेट पाहून परत करणे कॅसेट बाक्स मधे टाकून आले की झाले. केवढा परस्परावरचा हा विश्वास-! खूपदा विश्रांतीच्या काळात ही मंडळी आपआपल्या हॉबीसरु मधे काही ठोकठाक करीत असतात. गेल्सबर्गला अजिता काळेकडें आम्ही अशी हॉबीरूम बघितली. दरवाजाशी भिंतीवर एका बोर्डावर सारी हत्यार माडून ठेवली होती. हातोडे, स्पॅनर्स, स्क्रुड्रा-यवर्स, कानस, करवत एक ना दोन अनेक वस्तू व्यवस्थित लावलेल्या होत्या. इथ प्रत्येकालाच जरूरी पुरत सुतारकाम, लोहारकाम, माळी-काम, इलेक्ट्रीकच आणि इलेक्ट्रानिक्सच ज्ञान अवगत असाव लागत. अजिताची मुलही टेपरेकॉर्डर उघडून दुरुस्त करतात. लहान मुल देखील आगगाडयाचे रूळ तयार करतात. गाडया पळवतात हे सार बघताना मनात आल हे लोक इथे गुडी पाडव्याला गुडी किंवा दसऱ्याला अवजाराची पूजा करीत नसतील पण अवजाराचा उपयोग करून त्याचा सन्मान करतात. मुख्य म्हणजे घरात कुठेही अडगळी सारखे सामान दिसले नाही. अडगळीची अशी खोलीच नसते मुळी सगळीकडें स्वच्छता नीटनेटकेपणा ! हे आपले भारतीयच का ? असा प्रश्न पडावा इतके ते त्या वातावरणाशी, शिस्तीशी, स्वच्छतेशी रूळलेले आहेत

हे सार पाहिल तरी मनात येत होत, ह्या दोन पिढीतील अतर वाढलेले आहे मानसिक दृष्टया ! एक पिढी पूर्ण भारतीय संस्कार आत्मसात करून तिकडे गेलेली तर दुसरीची मूळच त्या जमीनीतली ! गेल्सबर्गच्या माझ्या एका मैत्रिणीकडें–मीरा देवरसकडे आम्ही बराच वेळ घालवला होता. तिच्या दोन मुली पूर्णत तिकडच्या वातावरणा–

तल्या ! तिच्याकडे गेले तेव्हा बाहेर थंडी वाटत होती पण तिच्या घरात शिरताच वाटल की आपल्या देशाच्या हवेत आलो. आत हिटींग होते म्हणून नव्हे तर तिच्या मुली चक्क मराठी बोलत होत्या म्हणून मी म्हटले ' मीरा तुझ्याकडे तू अगदी मराठी वातावरण,भाषा जपले आहेस? ती म्हणाली खरच का ? कारण कधी कधी मलाच भीति वाटते की आपली भाषा आपण विसरणार तर नाही न ? तरी आम्ही मुलींना मराठी गाणी मराठी पुस्तक वाचायला देतो कार मधे मराठी गाण्याच्या कॅसेटस् ठेवतो. पण एखाद्या इंजेक्शनच्या सुई प्रमाणे ही भाषा मी त्यांच्यात किती दिवस उतरवू शकेन ? शेवटी संस्काराचे कण तर श्वासात जाणाऱ्या हवेतच असतात आणि इथली हवा तर अशी की १६ व्या वर्षाचीच मुले वाट बघत असतात इथली मुले तर या सोळाव्या वर्षांच्या शिडीवरून भर्रकन उडून जातात स्वत.च्याच कन्फ्युजड् आकाशात ! तिचे हे म्हणणे मात्र अगदी खरे होते तरीही तिची धडपड बोलकी होती

अमेरीकन डिशेस उत्तम करणारी ही मीरा तेथील सेंट मेरी हॉस्पीटल मधे सोशलवर्क करते तिच्याबरोबरच आम्ही हॉस्पीटलमधे गेलो. तिथेच अजिताही भेटली इथे ऑक्झीलरी या संस्थेलाच गिल्ड असेही नाव आहे. अशा संस्था तिकडे देशभर आहेत. वर्षातून कित्येक वेळा सेमिनारस् आणि अधिवेशने भरविली जातात ध्येय एकच असते हॉस्पीटलला मदत करण्याचे तसेच शैक्षणिक कार्यक्रमही चालतात क्रॅफ्ट शो द्वारा अपंगाना मदत करतात ह्या मदतीच्या कार्याला मीरानें वाहून घेतले आहे पूर्ण हास्पीटल स्वच्छ, प्रत्येक लहान मुलांच्या वॉर्डस्मध्ये T V सेट, खेळणी असतात. त्यामुळे मुलांना आजाराचा विसर पडतो. सर्वत्र वॉर्ड फिरताना एक जाणवले की मुलाजवळ नर्सेसच असतात. त्याचे आईवडील नसतात. दोघाच्या नोकरीमुळेही असेल पण एकूणच तिकडे मुलांना लहानपासूनच एकट रहाण्याची सवय होते. अजितानेंही तिकडेच M.S W केले आणि Family Planning Centre ची ती आता डायरेक्टर आहे. आमची उत्सुकता बघून तिनेही तिच्या ऑफीसमधे नेले प्रथम दर्शनीच तिथले प्रशस्त ऑफीस, वेगवेगळे चार्टस कुटुंबनियोजनासाठी लागणारी सारी व्यवस्था हे सर्व बघताना ती

केवढ्या तळमळीने सामाजिक काम करते हे लक्षात आले. अजिता सांगत होती की बर्थ कंट्रोलचे प्रात्यक्षिक तेथील शाळा, कॉलेजामधून एका मॉडेलद्वारा दाखवतात. 'The daestlaes by becoming Teennage parent, Am I a parent meterial ?' यासारखे छोट्या पुस्तिकाद्वारे हा प्रचार केल्या जातो अत्यंत कमी लोकसंख्येच्या या देशातही Family planning केंद्र उघडावीच लागतात कारण १४, १५ वर्षांची मुलं जेंव्हा डेटिंग करतात नी मग मुलीला लहान वयात दिवस जातात तेंव्हा समस्या निर्माण होते आम्ही तिथे असतानाच एक १३वर्षांची प्रेगनट मुलगी आली होती तिच्या बरोबर तिचा बॉयफ्रेंडही होताच. अजिताने तिला अॅब्रॉरशनचा सल्ला दिला. परंतु एवढ्या लहानवयात तिला मूलच हव होत पण तो मित्र तर तिच्याशी लग्नही करणार नव्हता आणि मग ते मूल वाढवणार ते कुणाच्या भरवशावर ? अजिताने तिला समजावले तरी तिचा मात्र हट्ट कायमच होता. अशा मुक्त मुलींचे भवितव्य फार अंधारात असते कारण एक मूल झाल्यावर ती पुन: दुसरा बॉयफ्रेंड शोधते आणि त्याही पासून तिला मूल होत. अशा मुलांची सख्या वाढत जाते. अशा मुलांवर आणि मुलीवर मानसिक परिणाम होतो. या साऱ्या समस्या सोडवता याव्या अशासाठी ही अजिताची संस्था. मुलांची मानसिकता लक्षात घेऊन त्यांचा हळूवारपणे विचार करावा लागतो 'आई जर १५ लग्न करते तर मी का नको बॉयफ्रेंड बदलू ?' अशी धारणा काही मुलांची होते. 'शेल्टर फॉर वूमन' यासारख्या सस्था त्याना मदत करतात या सर्व कामात अजिता रुळलेली आहे तिचे म्हणणे की इथे बसून आपला देश आठवत रडत बसायच त्यापेक्षा जिथे जे चागल आहे ते कराव.' ती गमतीने म्हणाली, भारतात गेल की विचारतात 'स्वर्गातून नर्कात आल्यासारखे वाटते न ?' तिच्या मुलाना तिथेच रहावस वाटत. ती म्हणाली माझा मुलगा पाच वर्षांचा होता तेंव्हा त्याला नुसत 'जेवायला ये' अस म्हटल तरी त्याच स्वातंत्र्य हिरावून घेतल असं त्याला वाटायच एकूणच तिकडे कमिटमेंट जास्त आहे. शिस्त व नागरिकत्वाची भावना या परदेशी लोकांची जास्त आहे.

अजिता व अशोक दोघेही लेखक असल्याने त्यांच्या तियल्या

जीवनाकडे बघण्याचा सुजाण दृष्टिकोण त्याच्या वागण्या बोलण्यातून सतत जाणवायचा मीराकडे सर्वजण जमलो तरी पुन अजिताकडे जेवणाच्या निमित्याने मैफेल भरलीच खास महाराष्ट्रीय मेनू तिने केला होता. कारण हम्बुरबर्ग आणि हॉट डॉग, बीफ ही नाव ऐकूनही कटांळा आला होता. नुसती नाव ऐकण्याइतकीच माझी मजल गेली होती. अजिताकडे बाहेरच डेकवर 'गॅस'ची ग्रिल लावलेली आहे. ग्रिल म्हणजे स्टॅंडवर उभी असलेली कोळशाची शेगडी शेगडीला गॅसच कनेक्शन असल की ती लवकर पेटते उन्हाळ्यात बहुतेकदा आठवड्यातून एकदा दोनदा ग्रिलवर हबर्गर्स (खिम्याच्या पॅटीसची सॅंडविचेस) आणि हॉटडॉग्ज् ती बनवते मधूनमधून बार्बेक्यू सॉस लावलेल चिकन किंवा पोर्क. ग्रिलवर केल्या जाणाऱ्या पदार्थांना बार्बेक्यू म्हणतात कोळशाचा खमग वास सगळ्या पदार्थांना लागतो व वेगळाच खरपूसपणा त्याला येतो. त्याचही खास तत्र आहे. अशोक ह्यात एक्सपर्ट आहेत. इथे बार्बेक्यू साधारणपणे पुरूषच करतात मात्र आमच्या जेवणात तिने हे केले नव्हते कारण कदाचित अगोदरच मीराने तिला सागितले असावे पण ती उत्तम सुगरणही आहे हे मात्र लगेच पटले नागपूरच्या गोष्टी निघताच अशोकने कवी ग्रेसची आवर्जून आठवण केली. एकेकाळी ग्रेस युगवाणीचे सपादक असताना अशोक त्यात कथा लिहीत असे. जेवण वगैरे झाल्यावर फॅमिलीरूम मधे डॉ. शिवदे,आम्ही अजिता, अशोक अशी एक मैफलच भरली. कवी कार्लसॅंडबर्गच्या या काव्यभूमीत आमचीही एक काव्याची मैफल रगली. माझ्या कविता झाल्यानतर अजिताने 'चद्रमाधवीचे प्रदेश' मधल्या ग्रेसच्या कविता वाचल्या तर अशोकने गौरी देशपांडेने एडिट केलेल्या पुस्तकातल्या निस्सीम इझाकेलच्या कविताचे वाचन केले. मग दिलीप चित्रे, पाडगावकर, ग्रेस याच्याही कविताचे सामुहिक वाचन झाले 'रोजनिशी' ही कथा अजिताने वाचली. ती जेथे काम करते त्या परिसराशी निगडित अशीच ही कथा होती. शेवटी गाणीही झालीत. आणि अशोकने विडबन काव्य म्हणून मैफिलीत चागलाच रग भरला.अनपेक्षितपणे अजिताकडे हे सारे जमून आले.आणि मराठी साहित्यासाठी भुकेले असलेले अशोक व अजिता त्यात रगून गेले

अजिताकडे असे भारतीय गेस्ट नेहमीच असतात. स्पष्टवक्ती पण स्वतःच्या मताशी प्रामाणिक राहणारी अजिता मैत्रिण म्हणून मला तिथे खूपच आवडली. तिच्या कामाच्या संदर्भातले अनेक किस्से तिने सांगितले. दुःखाच्याही प्रती असतात. ती सांगत होती त्या स्त्रियांची दुःख निराळीच आहेत सुंदर आणि टुमदार घरामधे सुरेख वेशभूषा करून रंगविलेल्या चेहऱ्यामागे अनेक खोल दुःख दडलेली आहेत ती सांगत होती की पाच सहा वर्षापूर्वी मिसेस रॉबर्सनच्या नुकत्याच लग्न झालेल्या तरुण मुलीला एका चोराने छातीत सूरा खूपसून ठार मारलं. तेव्हापासून मिसेस रॉबर्सन अफाट पिऊ लागली डॉ बेड्सच्या मेडीकलच्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या हुशार मुलाने झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या केली आहे तर इथे असलेले डॉ मार्टिन हे कट्टर कॅथोलिक आहेत. रिपब्लिकन पक्षाचे पुरस्कर्ते आहेत ते ' बर्थ कंट्रोल, पिल्सचे प्रिसक्रिप्शन देत नाहीत अजिता करीत असलेल्या कुटुंबनियोजनाच्या कामाबद्दलही ते उघडपणे राग व नापसती व्यक्त करतात. असे एक ना दोन अनेक अनुभव अजिताजवळ आहेत

शिकागोला आम्ही डॉ जयंत शिंदे यांचेकडेच उतरलो होतो. शिवाय आम्ही तिथे असतानाच, नार्थ अमेरीकन मराठी कन्व्हेनशन ' प्रथमच होणार होते. या संमेलनामुळं अनेक मराठी मंडळी भेटली. भारतातून मी येणार हे शीला शिंदेला माहितच होते त्यामुळे संमेलनात तिने माझ्या काव्याचा कार्यक्रम ठरवूनही टाकलेला होता भारतामधून द. मा मिरासदार, लक्ष्मण देशपांडे, आणि छोटा गायक आनंद भाटे आलेले होते. विशेष म्हणजे हे सर्व प्रयत्न करणारी आणि भारतीय संस्कृती टिकून रहावी म्हणून झटणारी व्यक्ती होती जयश्री हुपरीकर ! एका स्त्रीने पुढाकार घेऊन हे संमेलन यशस्वी करून दाखवले जयश्रीताई ' बृहन्महाराष्ट्र ' हे छोटेखानी मासिक वृत्तपत्र चालवतात. यात भारतवृत्त अधीक असत शैक्षणिक, साहित्य, संगीतकला, क्रीडाजगत इत्यादिविषयी मजकुरानी हे मासिक गजबजलेलं असत त्याच्याच मनात बृहन् महाराष्ट्र मराठी मंडळाचे संमेलन घ्यावे ही कल्पना आली त्या म्हणाल्या मराठी माणूस वाघासारखा ! तो शेळ्यामेंढराप्रमाणे कळपात फिरायचा नाही तामिळ, गुजराती आणि इतर भाषीक मंडळी दरवर्षी

संमेलने उत्साहाने पार पाडतात मराठीतले मात्र हे पहिलेच. उत्तर अमेरीकेत (कॅनडा यातच) एकूण ७ ते ८ हजार मराठी लोक आहेत. सुसंवादाने नवे नाते जुळेल, अनुभवविश्व वाढेल या हेतूनेच त्यांनी हे संमेलन उभारले तरी भारतातल्या प्रमाणेच तिथेही 'अधिवेशन जुलैत कशाला ठेवले ? गरमी केवढी असते ' थंडीत हे आतले कार्यक्रम जास्त बरे !' तर दुसरीकडून डिस्नेवर्ल्डला का नाही ठेवले ? लोकांना वेकेशनला जायला अशा ठिकाणी आवडत वाटेतच अधिवेशन जमलं असतं' अशा सूचनांचा त्यांच्यावर भडिमार झाला पण तरीही उत्साह कायम ठेऊन निरनिराळ्या संस्थांशी संपर्क साधून त्यांनी हे संमेलन यशस्वी करून दाखवले ' अमेरीकेत वाढणारी भारतीयांची दुसरी पिढी ' आणि दोन पिढीतील अंतर' तसेच 'व्यवसायक्षेत्रातून निवृती अमेरीकेत की भारतात?' असे परिसंवाद चांगलेच रंगले. आपल्याकडे जेवढा प्रतिसाद मिळत नाही तेवढाच तो प्रत्येक कार्यक्रमांना तिकडे मिळाला ' भव्य स्टेज आणि हाती माईक घेऊन म्हणणे ' पण तरीही कुठेच दडपण आले नाही. एका आगळ्या वेगळ्या रंगाने नटलेल्या या भारतीय मराठी कुटुंबात आम्ही सारे रंगून गेलो होतो.

या सर्वच मराठी भाषीक मंडळींची भारतात परत येण्याची अनावर ओढ मात्र जाणवत होती. शेवटी ' भारत माझा देश आहे ' हेच खरे !

० ●

६८६ २५२९८ ३०।१२।९८ शाखा

# टोरोंटो – मराठी माणसांचं गाव

टोरोंटो म्हटल की कॅनडातल मराठी गाव असच समीकरण असत. इतके मराठी लोक इथे वस्ती करून आहेत नाट्यमडळ, साहित्यीक सस्था ह्या लोकानी इथे स्थापन केल्या आहेत 'एकता' हे मासीकही इथलच। कॅनडात येऊनही आपल मराठीपण जपून असलेले हे लोक आयुष्याच्या अस्तापर्यंत तिथे राहूनही तिथले नागरिकत्व स्वीकारीत नाही, स्वीकारलेच तर वरवरचे, मनात मात्र भारताविषयीचे प्रेम दाटून आलेले असते. तसे तर कॅनडात फ्रेंच व इग्लिश अशा दोन्ही भाषा व सस्कृतीचा प्रभाव दिसला क्युबेकमधे वावरताना वाटल की इथे फ्रेंच भाषेशिवाय काहीच नाही जुनी फ्रेंच सस्कृती जतन करून ठेवलेली दिसते. तर ओटावा या कॅनेडाच्या राजधानीत मात्र फ्रेंच व इग्लिश अशा दोन्ही सस्कृतीचा प्रभाव अधिक आहे. ते कुठल्याही भूमीवरून आले असले तरी स्वत ला पूर्णत कॅनेडियन समजतात औद्योगिक प्रगती, वैज्ञानिक प्रगती याच बरोबर तेथील निसर्ग सौंदर्य या तिन्ही गोष्टींमुळे आज तरी कॅनडा हा देश इतका सपन्न झाला आहे की जगातील वैभव–शाली राष्ट्रात त्याची गणना केली जाते.

शिकागोहून येताना आम्ही मुद्दामच बसने आलो वाटेत टोरोंटोला उतरायचे व मग मॉट्रीयलला! जवळ जवळ १७–१८ तासाचा प्रवास करून आम्ही जेंव्हा टोरोंटोला आलो तेव्हा प्रवासातल्या दमण्याचे कुठ–लेही चिन्ह नव्हते बसमधल्या सुखसोयी आणि निसर्गातील निरोगी हवा त्यामुळे उतरल्यावरही फ्रेश वाटले आम्हा गल्सवगहून निघून आधी शिकागोला आलो, तिथून पुन दुसरी बस घ्यायची होती. शिकागोचा बसस्टँड इतका मोठा की आमची टोराटोला जाण्याची बस कुठली तेही कळू नये! त्यातच सामान उतरवताना, त्या सर्व सामानात आमचे सामान दिसे–चना। डोक अगदी बधीर झाल तेवढ्यात मनात आपल किती नुकसान होईल याचा हिशोबही करून झाला. शिकागोला जातेवेळीच जी काय खरेदी ५०० डॉलर्समधून केली होती त्या प्रचड बॅगा आमच्याबरोबर

होत्या. त्यामुळे टोरोंटो बस सुटेल, हेंही ध्यानी नव्हते. पण तिथल्या ड्रायव्हरनी आम्हाला दिलासा देत सागितल की तुम्ही बसा जावून बस-मधे, सामान मागून येईलच ! टोरोटो बस सुटायला अवघे १० मिनीट उरली होती एसकेलेटरवरून बसकडे जाईपर्यंत सुद्धा ५ मिनीट गेलीत. टोरोंटोच्या बसमधे जावून बसलो पण हे तर खालीच उभे ! अस उभ असण पॅसेजरने, तिकडे अलाउड नसत. त्यामुळे ड्रायव्हर हेर्लेकराना बसमधे बसण्या विषयी आग्रह करीत होता. तर ह्यानी सामानाची धास्ती घेतलेली.अखेर बसमधले सगळे पॅसेजर' whats the matter ' करीत आमच्या जवळ आले ! हा गोंधळ परदेशात अपेक्षित नसला तरी झाला होता शेवटी एक अमेरीकन प्रवासी आम्हाला म्हणाला, काळजी करू नका,सामान निश्चित येईल.किंवा मागच्या बसनेही येईल.मग तर वाटल की या बसमधून उतरूनच जाव बसमधे बसवत नव्हत आणि खाली उभ राहण्याची सोय नव्हती अशा मनाच्या अवस्थेत बसची वेळ झाली आणि ड्रायव्हरने बस सुरूही केली मला तर बॅगेतले सगळे सामान दिसू लागले पण बस सुरू होऊन तिने वळण घेतले. आणि ढकल गाडीतून आमचे सामान येताना दिसले. ' आनदाचे डोही आनद तरग ' अशी अवस्था ते सामान बघून झाली. ड्रायव्हरने ते लगेजच्या जागी चढवले आणि आमच्या मनावरचे ओझे हलके झाले. घरी जावून जेंव्हा ही हकीगत प्रभा व अनतभावजीना सागितली तेंव्हा ते म्हणाले. हरवले असते सामान तरी त्याच्या दुप्पट डॉलर्स तुम्हाला नुकसान भरपाई म्हणून मिळाले असते ! पण आपल्या आवडीचे सामान तर पुन मिळाले नसतेच नाही का ?

टोरोटोला आलो तेंव्हा दुपारचे १२ वाजले होते. जवळच्या रेस्टा--रंटमधे जावून सँडविचेस् आईसक्रीम खाऊन लगेच टूर बसकडे वळलो इथे बाहेर व्हेजिटेरीअन् असे कुठलेच पदार्थ मिळत नाहीत सॅलडस् वगैरेवर प्रवासात भागवाव लागत.

१९८४ हे टोरोटोचे १५० वा वाढदिवस साजरा करणारे वर्ष ! त्यामुळे मोठमोठी जहाज,निरनिराळ्या ठिकाणाहून आलेली तर, आत-रराष्ट्रीय गाण्याचा,नृत्याच्या फेस्टीव्हलसाठी आलेले निरनिराळे कला-कार ! या निमित्याने कॅनडातील कला कौशल्याचे एक विविध रूपातले

दर्शन घडले. ' कॅनेडियन ऑपेरा, विविध फुलांचे प्रदर्शन आणि माडणी याचाही एक देखणा अविष्कार दिसला ! अलिकडच्या दहा वर्षात कॅनडाने जी प्रगती केली ज्याचा अभिमान वाटावा अशातील एक म्हणजे सी. एन टॉवर. (कॅनेडियन नॅशनल टॉवर). न्यूयार्कला नुकतेच आम्ही world Trades centre बघून आलो होतो. तिथल्या obsesvatory Deck मधून खाली असलेले न्युयार्क शहर म्हणजे खेळातले कौलारू घर, आणि आगपेटी सारख्या दिसणाऱ्या आगगाड्या,बसेस,पाहून अमेरिकन लोकांबद्दलची बुद्धीची तिक्ष्णता कळली होती. वर असताना खाली वाचलेले आठवत होते ' The closest some of us will ever get to haven ' इथे ५०००० लोक काम करतात आणि ८०००० लोक सेंटर बघायला रोज येतात. एप्रील १९७३ मधे तयार झालेल्या या टॉवरवरून इतक्या वर आपण असतो की सध्याकाळच्या धूसर अधारानतर आता आकाशातल्या चादण्याला आपण सहज हात लावू, असे वाटते. पण याही टॉवरला शह देऊन की काय टोरोंटो येथील C. N. Tower ची उची अधीक करण्यात आली आहे. १८१५ फूट उचीचे आणि १ लाख ३० हजार टन वजनाचे! या टॉवरवरून देशातील टेलिकॉम्युनिकेशन व ब्रॉडकास्टिंगची व्यवस्था पाहिली जाते बिझनेस म्हणून सुरू केल्यानतर त्याला मनोरजन वा करमणुकीचेही स्वरूप प्राप्त करून देणारे हे कॅनेडियनस् ! हा टॉवर प्रदर्शनासाठी नेहमीच खुला ठेवतात प्रत्येक टप्प्यावर फिरती रेस्टारंट नाईट क्लबज्, टेलिस्कोप वगैरेची योजना केली आहे. लिफ्ट मधे चढताना, आपण विचार करतो न करतो तोच ती टॉवरची लिफ्ट हजारो फुट आपल्याला उच घेऊन जाते न्यूयार्क सारखेच इथेही खाली बघताच पूर्ण टोरोंटो शहर दिसत इथे गाईड वगैरे कुणी दिसलाच नाही पण तिथली रिसेप्शनिस्ट आपल्या हाती एक काडी (wand) देते कानाशी रिसीव्हर धरला की त्यातुन गाईडचा आवाज ऐकू येतो. आपण ज्या टॉवरवर उभे असू, त्या टॉवरबद्दलची पूर्ण माहिती तो आपल्याला देतो कुठे, कसे उभे आहोत हे त्याला बरोबर कळते. किती अदभूत कल्पना !

आपण येऊन गेल्याची खूण म्हणून अनेकजण आपली नाव कोरून ठेवतात अशा रोमिओ ज्युलियेटसाठी तर एक पुर्ण भागच राखून ठेवला

आहे आपल्या नावाची पट्टीही करून मिळते. ती ऑफीशीयली लावताही येते टुरीस्टच्या सर्व मर्यादा, आकांक्षा लक्षात घेऊन केलेल्या सुखसोयी बघितल्या की वाटत इथे येण्याच सार्थक झाल. टॉवरवरून खाली उतरताना अनेक दारापैकी आपण कुठून जायचे ते प्रथम कळतच नाही हातातली नळकांडी नामक वस्तू वरच्याच बॉक्समधे टाकून यावी लागते. जर का आपण विसरलो तर दरवाज्याच्या शेवटच्या क्षणी अलार्म वाजतो व ५–६ माणस गोळा होतात. विज्ञानाचा हा चमत्कार फारच करमणुकीचा वाटला. विज्ञान सामान्य माणसानाही किती रिझवू शकत याचा अनुभव ' सायन्स नॉर्थ ' बघताना आला गाईडची स्वारी बरोबर नसल्यामुळे मोकळेपणी या प्रचंड प्रयोगशाळेत फिरता आले गमत अशी की इथे प्रयोग आपणच करायचे असतात आपलाच टेप झालेला आवाज दुसऱ्या क्षणाला ऐकता येईल असे टेलिफोन्स तिथे एका भागात लटकत होते. मी २ मिनीट त्या फोनवर जे बोलले ते लगेच फोन कानाला लावताच मला ऐकायला मिळाले एका विभागात गाण्याचे सूर ऐकू आले म्हणून गेलो तिथे कॉम्प्युटर बेस पियानो दिसला त्यावरच्या पट्ट्या दाबल्या की आपण इलेक्ट्रानिकने सगीत सुरावट तयार करू शकतो त्या सुरेल झाल्यात की नाही हे हेडफोनवरून अथवा तिथल्याच छोट्या स्पीकरमधून ऐकू येते. सगीताचे ज्ञान असणाऱ्याना तर इथे वेळ कसा गेला ते समजत नाही सूर विघडला तरी पुन बदलता येतो. दुसऱ्या वाद्यावरही प्रयोग करता येतो नकळत आपणच सगीताचे कपोझर बनतो.

कॉम्प्युटरवर गणिताची कोडी सोडवण्यात मग्न असलेल्या मुलामधे आम्हीही जाऊन मिसळलो निरनिराळे डिझाइन, तयार करायचे, बटन दाबताच त्याच डिझाईनमध्ये निरनिराळे रग भरले जातात. लहानपणी भिंतीवर आरसा दाखवून त्या कवडशाच्या प्रकाशात एक जण नृत्य करायची व दुसरी प्रेक्षक बनायची ! तसेच इथे एका भिंतीवर आपली पडछाया दिसते सात रगात. आणि थोडी जरी हालचाल केली तरी ती छाया नृत्याचा भास करते अशा अनेक गमती करीत आम्ही मुख्य प्रवेशद्वाराजवळ आलो ह्या प्रयोग शाळेचा हा बोगदा दोन लाख वर्षापूर्वीच्या जुन्या खडकातून कोरून काढला आहे आतील विस्तार तर इतका भव्य नी विशाल की आपण कुठल्या तरी दुसऱ्याच प्रदेशात गेलोत असे वाटते.

रॉमसे लेक, खाण, आणि हे सर्व पृथ्वीच्या आतले, कल्पनाच रोमॅंटीक होती पृथ्वीवरचे डोंगरापर्यंतत दऱ्या माहीत असत पण पृथ्वी आतून कशी आहे हे बिग निकेल माईनमध्ये जावून पाहिले खाणीत जाताना एक लोखंडी टोपी डोक्यावर चढवून जावे लागते

पृथ्वीच्या आतले तर पाहिले पण एका विमानात बसून अंतराळात ही जाता येत सूर्य, चंद्र, ग्रह, तारे हे सर्व जवळून पहाताना कविकल्पना धाडधाड कोसळायला लागतात

विज्ञानाच्या या प्रचंड झेपेकडे मी किती तरी वेळ स्तिमीत नजरेने पहात होते एकीकडे हे थक्क करणारे विज्ञान तर दुसरीकडे आपले अनाकलनीय भविष्य जाणून घ्यायची उत्सुकताही असतेच. म्हणूनच इथे एके ठिकाणी कोपऱ्यात फॉरचून टॉवर सुद्धा असतो अंगात काळा झगा चढवून भविष्य वर्तवणारी ती जिप्सी वृद्ध स्त्री ही एक रोबोट स्त्री आहे हे कळतही नाही पैसे टाकले आणि यांत्रिक कळ दावली की ह्या वृध्द जिप्सीचे डोळे चमकतात आणि ती आपल्याला भविष्य सांगते उगाच निराशा पदरी पडायला नको म्हणून मी भविष्य जाणायला उत्सूक नव्हतेच अर्थात अशा भविष्यावर मी विश्वासही ठेवणार नव्हतेच. ह्यांनी मात्र लगेच पैसे टाकून आपली भविष्यवाणी ऐकली. 'पोलाईट आणि जंटलमेन' यावरच हे खूष होऊन गेले होते.

आपल्याकडे पूर्वी वैद्यकी बरीच चालायची नाडी बघून पूर्ण शरीराचे आरोग्य ते वर्तवित. इथे सुध्दा केवळ तर्जनीच्या स्पर्शाने आपले आरोग्य सांगणारा एक छोटा कॉम्प्युटर देखील इथे आहे वजनाच्या काट्याप्रमाणे दिसणाऱ्या या कॉम्पुटरच्या जवळ जावून उभे राहिले आणि तर्जनी तिथल्या एका खाचेत खुपसली, की लगेच काही क्षणात आपले ब्लडप्रेशर, हृदयाचे सपन्दन वगैरेचा आलेख तिथल्या स्क्रीनवर दिसतो

असे अनेक प्रयोग करता करता आणि एकेक मजले चढून जाताना वेळ समजतही नव्हता १४ व्या १५ व्या मजल्यावरून सारख खाली बघून आता टोरोंटो कसे दिसते हे बघताना वय विसरल्या जात. दुर्बिणीतून खाली बघितले की गाड्या, माणस, झाडे, सारे स्पष्ट नी जवळ आल्यासारखे वाटत खर म्हणजे वर पहायच ते ग्रहतारे आणि आकाश पण पृथ्वीवर असल की आकाशाची ओढ असते आणि आता आकाशाजवळ झेपावलो तर पृथ्वी जवळ कराविशी वाटत होती.माझ्या मनात

आल की मृत्यूचं आपल्याला भय वाटत असावं म्हणून जमीनच बरी !

इथले पार्क सुध्दा प्रेक्षणीयच! एका दिवसाच्या आत सारे डोळ्यात मी त्यातून मनात कोंबायचे ! पण उत्सुकता कायमच सतेज होती. 'मीट द टू हड्रेड पिपल' हे पार्कच वैशिष्टय असलेल्या पार्कात फिरताच वाटल की तसा कॅनेडा देश उत्तरेकडील प्रेअरीजच्या गवताळ प्रदेशात येतो. जगल आणि वन्य जीवन याची सुबत्ता ! त्याहूनही वन्य पशूच्या या देणगीचा कॅनेडियन लोकानी केलेला उपयोग पाहण्यासारखा आहे

सफारी बागा, ॲम्युझमेंट पार्कस् आणि झुऑलॉजिकल गार्डन्स हे वैशिष्टचपूर्ण तर आहेतच पण सातशे एकर पसरलेल्या आणि तीनशेहून अधीक वन्य पशू असलेल्या झुऑलॉजिकल पार्कचे आणखी वैशिष्टय असं की तलाव, सरोवर, नद्या, लहान धबधबे वगैरे अगदी नैसर्गिक सेटिंगमधे टिकवून ठेवलेले दिसतात. उन्हाळ्याच्या सुट्टयामधे मुलासाठी इथले अधिकारी व कर्मचारी आपापल्या तैनातीतील प्राण्यासह मनोरजनासाठी तयार असतात हे सर्व प्राणी व पक्षी निरनिराळे खेळ करण्यात पटाईत असतात हे सर्वच प्राणी माणसालेले असल्याने मुलाशी अगदी जवळून सपर्क साधतात

असाच दुसराही एक पार्क आहे सफारी पार्क ! या पार्कमध्ये स्वत च्या गाडीन फिरता येत प्राण्यांच्या हालचाली दुरून पहाता येतात. मला मुबईचा बोरीवली पार्क आठवला. पण इथल्याइतकी विविधता आपल्याकडे नाही इथे कटाळा आला की लगेच नृत्य, बोटींग, मुलासाठी विदुषकाचे खेळ तयारच असतात

दिवसभर टोरोंटो शहराचे दर्शन घेऊन आणि फिरून सध्याकाळच्या बसने आम्ही मॉंट्रीयलला परतलो टोरोंटो मराठी मडळात बोलावणे असूनही वेळेच्या अभावी जाता आले नाही कारण टोरोंटो शहर बघणे हाच उद्देश मुख्य होता सुरवातीला मुबईहून निघताना विमानात भेटलेल्या सौ. देशपाडे टोरोटोत कुठेतरी भेटतील अस वाटल होत पण एवढ्या प्रचड शहरात त्या दिसण अशक्यच होत ! पण सर्वदूर फिरताना मराठी माणसापेक्षाही तामीळ, तेलगू कुटुब आम्हाला भेटली. आणि मनमोकळेपणानी ओळखही करून घेतली. परक्या देशात आपले लोक आपल्या जवळ येतात याचे प्रत्यतर पुन. एकदा आले.

० ०

# कॅनडाच्या चिरतरुण राजधानीत

ओटावा ही कॅनडाची राजधानी. मॉंट्रीयलपासून ४–५ तासाच्या अंतरावर असल्याने कारने सकाळी जावून संध्याकाळी परतायचे ठरले. सुरेश कणिकला सुट्टीच असल्याने तेही आमच्याबरोबर आले सुरेश, अनंत भाऊजी, व आम्ही दोघे, असे त्याच्या टोयाटो गाडीतून पहाटे पहाटेच निघालो ऑगस्टची थंड हवा, बर्फ संपल्यामुळे सृष्टीसौंदर्याची दार उघडलेली, आणि रस्ते असे सापासारखे वेटोळे देत गेलेले लांबच लांब ! स्वच्छ, निळसर डांबरी रंगाच्या या रस्त्यावरून जाताना गाडीत पोटातले पाणी सुद्धा हलत नाही नाहीतर आमचे रस्ते प्रत्येक ठिकाणी खड्डे झालेले, त्यात पावसाचे पाणी साठून ते कळतही नाहीत इतके खोलवर आणि शरीरातली हाडं खिळखिळी झाल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे या रस्त्याबद्दल मला आत्मीयता वाटली वाटेमधे पार्कींग प्लेसला बरोबर घेतलेले डबे संपवून ९॥-१० वाजता आम्ही ओटावाला पोहचलो. त्या दोघानी अनेक गेस्ट बरोबर ओटावा बघितलेले असल्याने आम्ही दोघानी टूर बस घेतली इथे निरनिराळ्या प्रकारच्या टूर बसेस असतात काही फक्त दोन तासाच्या, काही दिवसभरच्या आम्हाला पूर्ण सिटी बघायची असल्याने आम्ही ४ तासाची टूर बस घेतली युनिव्हरसिटी, पार्लमेंट, लेक, ओटावा नदी, सर्वच प्रेक्षणीय इमारती अतीशय भव्य आणि आकर्षक असून जुन्या पद्धतीचे आर्किटेक्चर आहे सिनेट हॉलचे आर्कि-टेक्चर बघून तर डोळे दिपतात वर छताला रंगीत काचाचे सुशोभित आवरण व बाजूला मोठमोठ्या कमानीत पेंटीग्ज बसवलेले.शोभिवंत खूर्च्या आणि झुंबराचा लखलखता प्रकाश ! पेंटीग्ज मधून कॅनडाचा इतिहास आपल्या समोर येतो लांबच लांब पसरलेल्या या हॉलच्या एका बाजूला प्रेक्षकाची गॅलरी आहे मधे लाल गर्द कारपेट व बाजूला डेस्कवजा खूर्च्या प्रत्येक डेस्कला लावलेला माईक असे हे सिनेटचे दर्शन. १८८४ मधे कॅनडाने प्रथम वॉरमधे भाग घेतला असे तिथे नमूद केले आहे. व्हिक्टोरीया राणीचे मोठे चित्र ह्या पार्लमेंटच्या लायब्ररीत आहे. कॅनडाचे सिनेट हे भारतातल्या राज्य सभेप्रमाणे असत कुठलाही कायदा

तयार व्हायच्या अगोदर तो बिलाच्या रुपात सिनेटपुढे यावा लागतो. आणि सिनेटनेते पेरीक केल्यावरच तो कायद्याच्या स्वरुपात बाहेर येतो. सिनेटचे सभासद तिथल्या गव्हर्नर जनरल, पतप्रधानाच्या सल्यानुसार नेमतात आणि कित्येक वेळला सिनेटचे बरेचसे सभासद हे मंत्रिमंडळातले मिनीस्टर्सही असतात तिथली राजनीती ही अजूनही ब्रिटीशाची राजनीती वाटते १४ जुलै हा फ्रेंच राज्यक्रांतीचा दिवस मानतात.

इथे बसमधे ड्राईव्हरच गाईड असतो त्याची सागण्याची पद्धतही विनोदी होती अमेरीकन्स किंवा युरोपियन्स जे प्रवासी आमच्या बरोबर होते ते खूष होऊन त्यानी डॉलरस् गोळा करून त्या ड्रायव्हरला देणगी म्हणून दिले बस टर्न होऊन एका चौकात थाबली ओटावा हे शहर कॅनडात सुदर मानतात स्टीफन झ्वाईगन पॅरिसला ' सिटी ऑफ इटर्नल युथ ' अस म्हटल आहे कलेच माहेरघर म्हणजे पॅरीस. तसच एक चिरतारुण्याच वरदान असलेल हे ओटावा शहर आहे कॅनडातला हा तसा उन्हाळाच होता भर दुपारी स्वच्छ सूर्यकिरणात इथे फिरताना मला मोकळ्या स्वभावाच्या आणि दिलदार व्यक्तीत्वाच्या अतरगात शिरल्या-सारख वाटल. फुलझाड, छोटे धबधबे, कालव्यातून जाणार झुळझुळ पाणी, हे सार पार्कची शोभा वाढवत होत

इथल्या बिल्डींग्ज म्हणजे तर स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना होता. टोरोंटोला सी एन टॉवरबघतानाही असेच वाटले होते सी एन टॉवरची उची डोळ्यात भरावी म्हणून आसपास मोठ्या बिल्डीग्ज बाधणे जाणीवपूर्वक टाळले आहे. या पार्कच्या आसपासचे वातावरण खूप आवडले, आमच्या बसमधले, आणि चित्र विचित्र पोशाख केलेले देशोदेशीचे प्रवासी कुणी चित्र काढीत होते,कुणी फोटो घेण्यात मग्न होते तर कुणी हिरवळीवर विसावले होते तरुण मुल मुली घोळक्यानी गप्पा करीत उभे होते रंगी-बेरंगी छत्र्या हातात घेऊन कुणी डान्स करीत होते, कुणी गिटार वाजवित होते, बाकीचे त्याला साथ करीत होते पार्काजवळून जाणाऱ्या रोडवर तिथले भिकारी (अर्थात मला ते भिकारी वाटलेच नाहीत) सुटबुटाचा वेष करून गिटार वाजवून हॅटमधे पैसे गोळा करीत होते. काही मुलं, मुली तर गुगल्यासारखी नाचत होती अमली पदार्थांचा सचार, इथेही झालेला दिसत होता

नॅशनल आर्ट गॅलरी, पार्लमेंट हाउस, सेंट्रल एक्सपेरीमेंटल फार्म,

पतप्रधानाचे निवास स्थान, प्रिन्स ऑफ वेल्स धबधबा, सुप्रीम कोर्टच बिल्डींग, कॅनडाचा पूर्ण इतिहास सागणारा नॅशनल वॉर म्युझीयम सारेच देखणे, शिवाय कॅनडात जी नाणी तयार होतात तो मींट कारखाना, ओटावा युनिव्हरसिटी, दोन युनिव्हरसिटीतून जाणारे मधले पाणी तर मनाला प्रसन्न करून जाते सिनेट हॉलच्या समोर एक फ्लेम अखड जळते कॅनडाचा ध्वजही तिथे झळकत असतो राजधानीला शोभतील अशाच साऱ्या वस्तू ! त्यामुळे कॅनडाच्या सौदर्यात एक खानदानीपण आले आहे

सर्व टूर करुन सुरेश व अनतभावजी ज्या रेस्टॉरेंटमधे थाबले होते तिथे गेलो बस मधून उतरता उतरताच पावसानी घेरले दोन मिनीट पाऊस पडला पण पूरे भिजवून टाकले तसेच निथळत रेस्टारटमध्ये आणू सॅलाड, सॅन्डविचेस आणि चहा घेतला. तिथे एक बरे असते की कुणाच कुणाकडे लक्ष नसत. तेव्हा आपण भिजले आहोत आता आपल्याल कुणी बघेल वगैरे गोष्टी मनातच येत नाहीत पाऊस थाबल्यावर आम्ह स्मिता थत्तेंकडे गेलो तिला आधी फोन केलेला होताच स्मिताचे नुक तेच लग्न झालेले दोघेही डॉक्टर व इजिनिअर ! नोकरीनिमित्य सत घराबाहेर ! पण आम्ही जाताच नागपूरचे आपल्या घरचेच कुणी भेटा असे स्वागत तिने केले ! तिला एकूण कॅनडा आवडल्याच तिच्या प्रसन्न तेवरूनच कळत होत ओटावालाही मराठी माणस बरीच आहेत मर

कार्यक्रम हातच असतात, तिथूनच एकता हे मासीकही निघत गेल्य वर्षीच टोरोंटोला साहित्य समेलन भरल होत. आणि विविध नाटक साहित्यीक कार्यक्रम व गाण्याचे कार्यक्रम त्या लोकानी केलेही होते सत काम करणे हेच ध्येय इथे प्रत्येकाच्या डोळ्यापुढ असत

म्युझीयम मधून फिरतानाही सतत जाणवल, की डायऱ्या उघडून काही तरुण मडळी सतत म्युझीयमच्या वस्तूबद्दल माहीती गोळा करी होते वॉरमधे असणारे सर्व हत्यारे माडून ठेवलीच होती. शिवाय महायु कालीन एक सगीताचे स्वरही त्या वातावरणात मिसळले होते पुतळे फोटो, पुढे बाग, युद्धाची बाग फुलवणारे हे ओटोवा शहर !

स्मिता कडून निघालो तेव्हा बराच अधार झाला होता पण मुक्का करायचा नव्हता शॉपीग सेंटरमधून चक्कर मारून आमची कार त्या काळोखातून पुन माँट्रीयलकडे निघाली.

# पूनः एकदा मॉँट्रीयलमधे

इकडे तिकडे फिरता फिरता मॉँट्रीयलची प्रेक्षणीय स्थळे बघायची ाहूनच गेली होती क्युबेक, ओटावा, टोरोटो ही शहरे फिरून आल्या- ातर मॉँट्रीयल मात्र भव्य आणि वेगळेच वाटले जुन्या मॉँट्रीयलच्या आर्ट ॅलरी बद्दल खूप ऐकले होते. शेवटी आम्ही दोघानीही ठरवले की ाँट्रीयल टूरबसने काही ठिकाणे बघायची पहिला उत्साह आता सप- ेला होता. पण कटाळा मात्र नव्हता. तसे मॉँट्रीयल हे कॅनडातील ागळ्यात मोठे शहर आणि जगामधे फ्रेंच भाषा बोलणारे दुसऱ्या क्रमा- ाचे शहर! मॉँट्रीयल हे नाव कसे पडले असेल ? हा प्रश्न मलाही डलाच कारण प्रत्येक गावाच्या नावामागे काहीतरी कथा असतेच.

तीनशे पन्नास दशलक्ष वर्षापूर्वी मॉट रॉयल नावांचा अति थंड ालेला ज्वालामुखी हा, सध्याच्या मॉँट्रीयल शहराच्या मध्यभागी होता. ा कल्पनेतून मॉँट्रीयल हे नाव अस्तित्वात आले कला बुद्धिमत्ता औद्यो- ेकता, व्यापार या सर्वांगाने हे शहर नटलेले आहे. जगातली उत्तम ाहणी इथे आपल्याला दिसते सेंटलारेन्स नदीच्या भोवती पसरलेले हे ाहर एखाद्या कोंदणात बसविलेल्या हिऱ्यासारखे भासते.

मॉँट्रीयल शहराचा शोध सर्वप्रथम जे कार्टीअे या शोधकाला १५३५ ाली प्रथम लागला व्होचेलोगे हे त्या जुन्या खेड्याचे नाव ! हे पूर्वीचे ंडियन्स व्हिलेज. ( काळे इंडियन ). व्यापाराच्या निमित्ताने ्रेन्च शोधक तिथे आले आणि त्यानी वसाहत केली चारशे र्षाच्या या ऐतिहासिक काळात मॉँट्रीयल शहराला फ्रेंच संस्कृतीचीच वंत्र झाक आलेली आहे, क्युबेकची राजधानी म्हणून मॉँट्रीयलला वशेष स्थान आहे जुन्या मॉँट्रीयलमधे तर ३०० ते ४०० वर्षापूर्वीच्या तिहासीक इमारती अजूनही दिमाखात उभ्या आहेत

जुन्या मॉँट्रीयलमधे आम्ही, रविवारी सुट्टी म्हणून कारनेच गेलो. डगार हवा, आणि रंगीबेरंगी चित्राची आर्ट गॅलरी रस्त्याच्या एका डेला तर दुसरीकडे थोडे खाली उतरताच गिटार सारखी अनेक वाद्ये

वाजणारी तरुण मंडळी ! इथे मात्र माणसाची जत्रा दिसली कु
पेंटींगज् बघू, कुठले घेऊ, असे चित्र बघताना वाटले मॉंट्रीयलचा
असलेले एक चित्र मी विकत घेतले. तेही थोडे स्वस्त मिळाले म्हण
जे चित्र मला आवडायचे ते ३० ते ४० डॉलरला असायचे ! शे
चित्राच सुंदर प्रदर्शन बघाव तस बघूनच दुधाची तहान ताकावर भा
वली येथे एकाच शहरात दोन शहर बघितल्या सारखे वाटते.
अद्यावत असे ज्यात उंच स्काय स्क्रेपर्स इमारती-त्यात औद्योगिक दृष्ट
ऑफीसेस्, शॉपींग सेन्टरस् थिअेटरस् युनिव्हरसिटीज् तर आम्ही
फिरत होतो ते जुने शहर १७ व्या शतकातील फ्रेंच वसाहतीचे अवश
त्याच्या खुणा अजुनही जपून ठेवल्या आहेत इथे। इथेच सेंटलॉरेन्स न
बोटीतून प्रवास करताना, विशेषत. मॉंट्रीयलचे सौंदर्य नजरेत भ
३०० ते ९०० पॅसेंजरस् एकाच वेळी ही बोट वाहून नेते

बोटीतून फिरून आल्यावर तिथे एक जुन्या फ्रेंच युवतीचा फॅ
शो बघायला मिळाला बाजूलाच रस्त्यावर गाड्यामध्ये आपल्याकडे
मक्याची कणस भाजून मिळतात तसे पण उकडून ठेवलेली कणस आ
विकत घेतली. मुंबईच्या भेळ पुरीची आठवण यावी असा हा सारा प
सर गजबजून गेला होता अमेरीकेत अब्राहम लिंकनच्या व्हिलेजला
असाच अनुभव आला तिथें तर येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला मक्या
कणस फुकट भाजून देतात. लिंकनच्या औदार्याच प्रतीक समजायच
ते ? दुसऱ्या समांतर जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला रंगीत छत्र्याच
खाली कुणी ड्रिंक्स घेत होते कुणाचे माईकवरून गाणे चालले हो
तुम्हाला जिथे हवे तिथे थांबून आनंद लुटा. रोजच्या व्यवहारात
स्वत ला विसरता याव अस हे ठिकाण. जुन्या फ्रेंच संस्कृतीला या जुन्
मॉंट्रीयलमध्ये जतन करून ठेवल्यामुळे एकदम २०० वर्षे मागे गेल्या
सारख वाटत इथे !

दुसरे दिवशी मॉंट्रीयलमधे झालेल्या एकविसाव्या ऑलम्पिक गेम
साठी जो पार्क तयार केला होता तिथे गेलो. या संपूर्ण जागेला ऑल
म्पिक व्हिलेज असच नाव दिल आहे. याच आर्किटेक्चर अतिशय सुं
केल्यामुळे ते एक प्रेक्षणीय स्थळ झालेल आहे. म्हणून एकाने म्हटले आ
' THE OLYMPIC PARK . a world that takes your brea

y ' प्रचंड अशा डोमखाली, स्वीमींग टँक, रेसेसच्या धावपट्टया, काच्या बसण्याच्या खूर्च्या, हे सर्व दूरदर्शनवर वघितलेल प्रत्यक्ष ले. एक गाईड आपल्या बरोबर देतात आणि तो सर्व ठिकाण दाख. . एका इटालियन आर्कीटेक्टने याचे आर्किटेकचर बनवले होते. सतत वर्षभर याचे काम चाललेले होते. पण हे अस आता रूक्षपणे वघ- ा आणि गाईडच्या कॉमेंटस् पेक्षाही त्याच वेळेस लॉसजलस्च्या ंपिक गेमस् टी व्ही, वर वघताना मजा वाटायची.टी व्ही वर फक्त डियन विजेत्यावर अधिक फोकस करायचे. त्यात कुठेतरी एखादा ाडू भारतीय दिसला की अभिमान वाटायचा देशाप्रमाणे आपली मनही ाचं घडत असतात.

हा ऑलेंपिक पार्क वर्षभर तसा गेम्सनी परिपूर्ण असतो प्रदर्शन, ा सुध्दा भरतात सायकलीच्या स्पर्धा तर नेहमीच सुरु असतात पाव- ठ्यात इनडोअर गेम्स खेळल्या जातात बेसबॉल हा इथला वैशिष्टय गेम फुटबॉल आणि बेसबॉलच्या मॅचेस सुरू असताना लोक दूरून ायला येतात आम्ही गेलो तेंव्हा एकीकडे फुटबॉलच्या मॅचेस सुरु या. मॉंट्रीयलमधल्याच दोन क्लबज्तर्फे या आयोजित केल्या होत्या. ळेत असताना फुटबॉल खेळ बघायला मला फार आवडायचा. या ाच इकडे सर्वांनाच वेड दिसल आपल्याकडे भारतात अलीकडे रतीय जनता क्रिकेटवेडी झाली आहे अलींकडची पिढी, नुसतेच तरूण हे तर तरूण स्त्रिया, आज्या, मुली, आजोबा अशा साऱ्यानाच क्रिके- ी वेड लावलेय. दूरदर्शनवर घरबसल्या ते क्रिकेटचा मनसोक्त, आनद तात पण मला मात्र लहानपणापासूनच सतत घडत असलेल्या क्रिये- ळे फुटबॉल प्रेक्षणीय वाटतो अवघ्या ९० मिनिटात, एकेका सेकदात वतपणाचा अनुभव येतो. एखादा खेळाडू चागला खेळला, गोल जास्त ाले किंबहूना एखादा गोल घेतला की सर्वच खेळाडू त्याला मिठया रून त्याच अभिनदन करतात. इतक की तो गुदमरून जातो त्याच्यात. वनाच हे मनमोकळ प्रदर्शन पहाताना वाटत की या सर्व खेळाडूचा ॅमिडसारखा एकसघ ढीग पहातोय. त्यामानाने असा जिवतपणा मला केटमधे दिसत नाही. बराचवेळ पर्यंत आम्ही फुटबॉलचा खेळ एनजॉय

ला

ऑलेंपिक बघून लगेच आम्ही बॉटनीकल गार्डनला जाणारी बस घेतली

तिथून निघालो तेंव्हा पावसाचे मुळीच चिन्ह नव्हते तिथे पोह–चताच आधी रेस्टारेंटमधे जाऊन चहा घेतला हे गार्डन इतक भव्य आहे की लडन आणि बर्लिन सोडल तर जगामधे या गार्डनचा तिसरा क्रमाक आहे त्यामुळे हे गार्डन बघण्यासाठी तिथे एक मिनी ट्रेन ठेवली आहे. आम्ही तिकीट घेऊन त्या ट्रेनने गार्डनमधे फिरलो. उष्ण व थड प्रदे–शातील जवळ जवळ २० हजार नमुने झाडाचे इथे पहायला मिळतात. तीस मोठ्या बगिच्यातून बाराशे नमुने फक्त ऑर्चिडस व बोनसायचे आहेत मोठमोठे काचेचे डोम तयार करुन त्यात ही झाड वाढवतात. एकीकडे गाईड आम्हाला अभिनयासकट माहिती सागत होता त्या वर्णनापेक्षाही झाडाफुलाच्या या सहवासात मन मुग्ध होऊन जाते १९३१ साली फ्रेंच बॉटनिस्ट केरी मेरी व्हिक्टोरियन याने या गार्डनची स्थापना केली १८० एकर जमीन या झाडानी व्यापली आहे. शिवाय दूरदूरचे विद्यार्थी इथे शिक्षण घ्यायला येतात. आशिया, युरोप, अमेरीका,आफ्रिका असे भाग करून त्यातील मुख्य झाडाच्या तऱ्हा अशा रीतीने माडून ठेवल्यात की आपले मन वेधून घेतात मैलोंगणती फुलाचे गालीचे पसरलेले मात्र बर्फ सुरू झाला की ही फुले पार जमीनदोस्त होतात. या फुलाच्या ताटव्यात आम्हाला दोघाचा एक फोटो हवा होता पण तो कोण काढणार ? म्हणून जरा बाजूला पाहिले.एक इटालियन तरूण बॉटनीच्या सशोधन कार्यासाठी आलेला होता त्यालाच विनती केली. त्याने मोठ्या खुषीनें आमचा फोटो काढला कॅनडाच्या या साऱ्याच वास्तव्यात कधी हिरमुसलेले, आक्रसलेले चेहरे दिसले नाहीत सारे कसे प्रसन्न या फुलासारखेच ! तो तरूण थँक्यु म्हणेपर्यंत ह्यानीही त्याचा एक फोटो टिपलाच.

ग्रीनहाऊस मधली झाडे बघपर्यंत बाहेर पाऊस सुरु झाला आला तोच मुळी इतका जोरदार की सारेचजण ओलेचिंब ! पण कुणीच धावून शेल्टरखाली गेले नाही अशा पावसात भिजताना 'नभ मेघानी आक्रमिले' हे नाट्य गीत आठवत होते. त्यातली मजा या परदेशीयाना कशी कळणार ? भाषेची अडचण आणि आपल्या भाषेतले सुबक अर्थ त्याना कोण सागणार ?

पावसाचा वेग वाढतच होता आम्ही सर्वजण ट्रेनमधून रेस्टॉरंट मधे जावून उभे राहिलो. एकही टेबल रिकामे नव्हते. मघाशी रिकामे असणारे रेस्टॉरंट आता माणसानी गच्च भरले होते चहा घेऊन पाऊस थावण्याची वाट न बघताच आम्ही तिथून बाहेर पडलो ते थेट कार्टीए-अॅव्हेन्यूला उतरून घरीच !

इथे पाऊस पडतोही जोरदार आणि लगेच थावतोही रस्ते स्वच्छ निळसर आभाळाच्या प्रतिबिंबासारखे ! जणू थोड्यावेळापूर्वी पाऊस पडलाच नाही मात्र आपण अगदी ओले गच्च ! अंगावरचे कपडे वाळ-ण्याचे यंत्र अजून शोधले नाही ह्या लोकानी !

मॉन्ट्रीयलमधे अनेक चर्चेस् प्रसिद्ध आहेत त्यापैकी एक दोन बघावी या उद्देशाने आम्ही निघालो.चर्चला मात्र आम्ही टूर बस घेतली डोमी-नीयर स्वेअरला जावून तिथून सेंट कॅथरीन स्ट्रीटवर गेलो आधी बसला वेळ होता म्हणून फिरून आलो मॉन्ट्रीयल मधला सर्वात जास्त गजबजलेला माणसाच्या वर्दळीचा हा रस्ता ! याच रोडवर मुख्य मेजर डिपार्टमेंटल स्टोअर आहेत इटन सिम्पसनला याच रोडवरून जाता येत इटन सिम्प-सन मधे म्युझीकल क्लबज् आहेत तिथे डिस्को डान्स किती तरी वेळा पाहिला तेथील रेडिओ वरच्या आर्टीस्ट अशा शॉपींग सेंटरमधे येऊन नृत्य व गाण्याचा कार्यक्रम करतात या रस्त्यावर आणि इटन, सिम्पस-नच्या आत एक प्रसन्न लाईफ असत. नुसते काचाच्या कपाटाआड ठेव-लेल्या वस्तू जरी बघितल्या तर वाटत इंद्राच्या मयसभेतून जात आहोत

जुन्या मॉन्ट्रीमलमधे नार्थडॅम बेसिलिका या नावाच चर्च आहे हे चर्च म्हणजे इथल्या लोकाच हृदय आहे. मोठमोठ्या कमानींच हे चर्च, यात एक मोठी घंटा आहे आतरराष्ट्रीय कीर्तीचे संत इथे येतात, १९७८ मधे आगीत पूर्णत जळून गेलेले हे चर्च पुन जसेच्या तसे उभे आहे. कॅनेडियन आर्ट असलेला म्युझीयम, अटीक्स, वाटीक इत्यादींचे प्रदर्शन म्हणजे कॅनडाच्या कलावंताचे कौशल्यच होय.

हे चर्च बघत असतानाच मला पणजीचे चर्च आठवले. ३०० वर्षा पूर्वीच्या बॉडीज तिथे प्रिझर्व करून ठेवल्या आहेत. पण एकूण चर्च सर्वत्र सारखीच वाटतात.

मॉन्ट्रीयलमधलेच दुसरे सेंट अॅने-डी-बेपर चर्च आहे—हे ठिकाण म्हणजे नुसते प्रेक्षणीय नाही तर इथले लोक जागृत स्थान समजतात इथे येणारा अंधळा असेल तर डोळे मिळतील, लगडा असेल तर चालू लागेल असे गाईडने सागताच मला आश्चर्य वाटले जवळ जवळ ५०० पायऱ्या चढून या चर्चमध्ये जावे लागते पायऱ्याचे सुद्धा तीन रस्ते ! मधला गालीचा टाकलेला असतो ! आम्ही डावीकडून चढून होतो. गालीच्यावरुन दोन फ्रेंच स्त्रिया गुडघे टेकून एकेक पायरी चढत येत होत्या कुतुहल म्हणून मी त्या फ्रेंच स्त्रीला विचारले की सरळ पायऱ्या चढून न जाता तुम्ही असे गुडघे टेकवून का चढता ?' त्यावर तिने सागीतले की माझा मुलगा खूप आजारी असताना मी नवस केला होता की गुडघ्यावर पायऱ्या चढून वर ३०० मेणबत्या लावीन म्हणून ' म्हणजे मुलाला बरे वाटेल ती स्त्री मुलासाठी नवस बोलली होती ही अंधश्रद्धाच नव्हे का ? आपल्याकडे भारतातही आपण गणपती पाण्यात ठेव, नवस बोल हे प्रकार पहातोच माणसाच्या वरचे पोषाख निरनिराळे असतील, कातडीचे रग वेगळे असतील पण आतले माणूसपण सारखेच आहे ! वर जाताच मेणबत्त्याची नुसती आरास माडलेली होती सर्वच दालनात भाविकपणा दिसत होता.

चर्चेसपैकी मुख्य चर्च बघितल्या नतर इतर काही चर्चेस मध्ये न जाता आम्ही ' MAN AND HIS WORLD ' बघायला गेलो १९६७ साली जे जागतीक औद्योगिक प्रदर्शन झाल ते एका पार्कच्या स्वरुपात वाढवून दरवर्षी तिथे सर्व देशाच्या सास्कृतीक कलेचे प्रदर्शन भरवतात. सेटलोरेन्स नदीच्या मध्यभागी असलेल्या बेटावर हा पार्क तऱ्हेतऱ्हेच्या फुलापानानी सजलेला आहे वेगवेगळे खेळ, हॉटेल्स उघडून लोकाच्या करमणुकीसाठी इथे सोयी केल्या आहेत वॉल डिस्ने, Six flag रगीबेरगी खेळ बनवून मुलानाही आकर्षण वाटेल असे तर मोठ्याना निरनिराळ्या देशाच्या सास्कृतीक कलेचे दर्शन घडते आम्ही तिथे पोचलो तेव्हा चार वाजून गेले होते त्या दिवशी तिथल्या भव्य स्टेजवर इजिप्तच्या डान्सेसचा कार्यक्रम बघितला. वेशभूषा, नृत्यातली शिस्त आणि म्युझीक हे सारच विलक्षण लयबद्ध वाटल. खूपदा भारतीय नृत्याचीच आठवण होईल अशा नृत्याच्या हालचाली दिसत. ह्या गोलाकार स्टेजवर मध्यभागी डान्स व भोवती एकावर एक गोलात प्रेक्षकाची व्यवस्था असते त्यामुळे त्या नृत्याचा व आपला एक जवळून सवाद साधल्या जातो तिकडे स्टेजवर

एकूणच प्रेक्षक आणि कलाकार फार दूर नसतात हे नृत्य बघत असताना एक वृध्द फ्रेंच स्त्री माझ्याजवळ आली इंडियाला जाऊन आलेली असल्याने तिला ममत्व वाटले असावे, मरीया मेरी तिचे नाव ! तिला कॅनडा मुळीच आवडत नव्हता भारत देश खूप छान आहे, आई, वडील, मुलं, आजोबा कसे एकत्र असतात' याच आश्चर्य करीत स्वतःच्या देशाबद्दल अनास्था दाखवित होती तिने माझे दोन्ही हात इतके घट्ट धरले होते की ती मला आता सोडेल की नाही शकाच वाटली मला डान्सेस बघायचे होते पण ती माणसाची भुकेली होती. काहीना काही कारण घेऊन ती सवाद करीत होती. एकटी रहात असल्याने तिला बोलण्याचा सुद्धा उपास घडला असावा। या मरीया मेरी सारख्या अनेक स्त्री पुरुष तिकडे वृद्ध त्याला कटाळतात म्हणून भारतीयाच्या प्रेमळ पणाचा त्याना आधार वाटतो. गेलसबर्गमधे असताना डॉ. अशोक काळे सागत होत, की हॉस्पीटल मध्ये या वृद्ध लोकाना भारतीय डॉक्टर फार आवडतात कारण ते प्रेमळपणे विचारपूस करतात मेरीयाला, 'मी तुझ्याशी माझ्या नवऱ्याची ओळख करून देते ! म्हणून सुटका करून घेतली आणि ह्याना तिच्या तावडीत पाठवले हे तर इतके कटाळले व म्हणाले देऊन द्यायची तर ही का मैत्रिण दिलीस ?'

मुख्य म्हणजे ह्याना ज्या युनिव्हरसिटीत काम होत, तिथे जायच राहिलच होत कॅनकॉडिया व मॅगील या दोन युनिव्हरसिटी पैकी रवि लिमये हा ककॉडियाचा विद्यार्थी असल्याने त्याच्या बरोबर जायचे ठरवले. हे गणिताचे प्राध्यापक असल्याने प्रत्येक ठिकाणी त्या सर्व कॅनेडियन लोकाना फार आदर वाटायचा गणित बहुधा सगळ्याच वीक असाव. शिकागोला जाताना वाटेत दोनदा व्हिसा चेक केल्या जातो मध्यरात्री बस थाबून त्याच्या ऑफीसमध्ये जाऊन ते चेक करतात आम्ही दोघही पासपोर्ट घऊन गेलो एक तरुण स्त्री हे काम बघत होती. तिकडे अलीकडे सगळंच फार strict केलेल असल्याने उगाचच काही त्रासही देतात. प्रत्येक ठिकाणी व्हिसा बघताना, 'तुम्ही इंडियन्स कशाला आलात ? देश बघायला की शिकायला ? की नोकरी करायला ?' हे प्रश्न सर्व भारतीयानाच विचारतात. त्या स्त्रीनेही हेच विचारले. आम्ही सागितले अमेरीका बघायला 'मग तुम्ही काय करता ? प्राध्यापक आहे गणि–

ताचा ' असे उत्तर येताच ती oh, how wonderful ! म्हणून इतकी उडाली की जणू गणित म्हणजे अतीशय रोमँटिक विषय! तिला ह्याच्या-बद्दल लगेच इतका आदर गहिवरून आला की आमच्या दोघांचेही पास-पोर्ट न वाचताच सही करून ती गप्पाच करत राहिली गणिताच महात्म्य हे अस आहे ह्यावरू.च आठवल प्रभाकडे मॉंट्रीयलमधे Avon कंपनीची सेल्स गर्ल आली होती पूर्वी प्रभाही Avon मधेच काम करायची Avon कपनीचे प्रॉडक्टस् फक्त घरोघर जावून विकतात अेरव्ही मार्केटमधे ते मिळत नाहीत प्रभानी तिला–मेरीला घरी बोलवल होत काही कॉस–मॅटीक्स घण्यासाठी ! तिने दाखविलेल्या कार्डावरून मी काही कॉसमेटी-कस्ची ऑर्डर दिली लगेचच्या रविवारी ती प्रॉडक्टस् घेऊन आली. मी ते ठेऊन घेतले व बिल मागितले तिने लगेच कॅलक्युलेटर काढले व मोजायला लागली पण ते बिघडल्याने तिला हिशेब जमेना. मी म्हंटल राहू दे, हे पटकन करून देतील तू एकेक वस्तूची किंमत साग ५ मिनीटात ह्यानी हिशोब करून दिला. ती आश्चर्यचकीत होऊन बघतच राहिली. नाहीतर ती परत जावून दुसरे दिवशी पुन. येणार होती. यत्राची इतकी सवय झालेली आहे इथल्या लोकाना की भारतीय कसे तोंडीच गणित करू शकतात यावर त्याचा विश्वासच बसत नाही एकूण गणितामुळे सगळीकडे सुखद असे स्वागत झाले

मॅगील युनिव्हरसिटीचा परिसर खूप मोठा आणि उचावर आहे वळणे घेत घेत आमची कार थावली ते ठिकाण निसर्ग सौंदर्याच एक शिल्प होत पिकनिक स्पॉट वाटावा अशा ठिकाणी ही युनिव्हरसिटी आहे

उन्हाळ्यामुळे बद असल्याने विद्यार्थ्यांची वर्दळ नव्हतीच काही एक दोन महाराष्ट्रीयन लोक तिथे आहेत या युनिव्हरसिटीत आर्टस, कॉमर्स आणि सायन्स सर्वच शाखा आहेत विद्यापीठाला निसर्गाच वाता वरण अलल की ते नेहमीच मनाला सुखवणार असत. अभ्यासवर्ग चाल–तात ती इतिहासकालीन वास्तू. आजू बाजूला डेरेदार मोठे वृक्ष, बहर–लेली हिरवळ. आणि यात वावरणाऱ्या उमलत्या यौवनाचा वावर ! या युनिव्हरसिटीची स्थापना कितीतरी जुन्या काळातली मुख्य म्हणजे मॉंट्रीयलला कुठल्याही युनिव्हरसिटीत गेल की लक्ष वेधत ते प्रचड

लायब्ररीने ! वरछतापर्यंत लावलेली पुस्तके, सुदर तैलचित्र भितीवरची कलाकुसर या साऱ्याच गोष्टीनी मन प्रसन्न होऊन कुणाला पुस्तक वाचावेसे वाटणार नाही ? लायब्ररीतल फर्निचरही उत्कृष्ट सजावटीतलं! शातता, एकात हवा असेल तर इथे याव ! तसेच मॉंट्रीयल युनिव्हरसिटी जिथे कॉनव्हकेशन होत तो हॉल देखील विस्तीर्ण आणि भव्य गडद रंगाच्या जाड पडद्याने सजवलेला असतो ही युनिव्हरसिटी उचावर असल्याने कुठूनही बघितल की मॉंट्रीयलचा खालचा परिसर सुरेख बगलेवजा घरं, आणि सेटलॉरेन्स नदीचे विशाल पात्र फार सुदर दिसते. विद्यादानाच हे इतके नयनरम्य दृष्य !

आम्ही तिथे होतो तेंव्हाच आतरराष्ट्रीय फिलम फेस्टिव्हल सुरू होता. त्यासाठी भारतातून स्मिता पाटील, गिरीश कर्नाड आणि मृणाल सेन आले होते. मॉंट्रीयलच्या मराठी मडळातर्फे त्याचा सत्कार होणार होता आम्हालाही निमंत्रित म्हणून बोलावले होते. 'wine bar and snakes, असा सुटसुटीत बेत होता. कनकॉडिया युनिव्हरसिटीच्या हॉल मधे या तिघासमवेत सर्व मराठी मंडळाचे लोक आणि काही अमेरीकन निमत्रितावरोबर चर्चा होणार होती. स्मिता ज्युरी म्हणून तर गिरीश कर्नाड व मृणालसेन (दिगदर्शक) ऑब्झरवर म्हणून आलेले होते. चित्रपटसृष्टीतले तिघेही नावाजलेले कलावत भारतात न भेटता मॉंट्रीयलला भेटणार या योगाची गमतच वाटली. कदाचित भारतात त्याच्याशी इतक्या कधी गप्पाही केल्या नसत्या.

सहा वाजता सायकाळी हॉलमधे तऱ्हेतऱ्हेच्या सुदर साड्यामधे मराठी मडळाच्या बायका, पुरुष जमू लागले, सुदर कपडे व दागीने घालून मिरवण्याचा एकही chance इथल्या भगिनी सोडत नाही. कारण एरव्ही जीन, शर्ट सारखे सुटसुटीत ड्रेसेस नोकरीत वापरावे लागतातच त्यामुळे सजविलेल्या हॉलमधे वाईनच्या मद वासात एक सुगधी वातावरण तयार झाले होते ६॥ वाजायला आले तरी तिघाचाही पत्ता नाही. शेवटी आलेल्यानी पार्टीला सुरुवातही केली मला आश्चर्य वाटले की अजून chief guest आलेले नाहीत तोवर वाईन, काजू फळे याच्या डिशेस रिकाम्या होणार. पण सुरेश कर्णिक म्हणाले की इथे वेळ टळली की जेअसतील त्यानी सुरू करायचे ! वाट बघायची नाही. गेस्ट आले की ते

घेतीलच सर्वजण डिशेस घेत आहेत बघून आम्हीही सुरुवात केली wine मी घेत नसल्याने आणि अड्याचेही काहीच चालत नसल्याने काजू, फळें घेऊन मी बाजूला झाले. तेवढ्यात सुरेशने ग्लासमध्ये wine ओतून म.ज्याकडे येत म्हणाले cheers ! मी तर घेत नव्हतेच पण त्यादिवशी सुरेश, रजनी, तेजामर सर्वांनी मला औषध पाजावे तशी wine पाजली. आणि हा सर्व प्रकार दूरून बघत असणाऱ्या माझ्या दिरानी कॅमेरात ते दृष्य टिपले आजही तो फोटो बघितला की मजा वाटते

७ वाजायला आले वाटल आता काही ते लोक येत नाहीत. काही-जण तर घरी परतायलाही निघाले पण तेवढ्यात अनुपमा कुकडे बरो-बर स्मिता, मागोमाग गिरीश कर्नाड व मृणालसेन आले. सर्वचजण हाय करीत तिच्या भोवती गोळा झाले बिचारे गिरीश कर्नाड व मृणालसेन कितीतरी वेळ बाजूला उभे होते ! स्मिता अगदी छानच दिसत होती पिवळ्या काजीवरम् सिल्कच्या साडीत, कुठल्या तरी लग्नाला यावी अशी ! चित्रपटापेक्षा फार साधी मनमोकळी वाटली. तिच्या बरोबरही सर्वांनी फोटो काढले मग तीही पार्टीत सामील झाली, पण मी नुसतेच काजू घेतलेत बघून म्हणाली हे काय बाकी काही नको! मी नाही म्हटले, तिच्या डीशमधे मी भरायला लागताच म्हणाली या सर्वाचा फार कटाळा आलाय वाटतय की कुणीतरी वरण भात द्यावा शेवटी पुण्याच्या सदाशीव पेठेतली ती ! खावून काय खाणार ? ग्रुपवाईज चर्चा सुरु होती प्रथम स्मितालाच प्रश्न विचारले गेले.अमेरीकन आर्टीस्ट, स्टुअर्ट म्हणून त्यानीही तिला बरेच विचारले. तिची उत्तरेही समर्पकच होती ती सागत होती, तिला चित्रपटसृष्टीत पुढे आणण्यास कारणीभूत झालेला पिक्चर'निशांत' आणि आतापर्यन्तच्या पिक्चरमध्ये आवडलेला चित्रपट ' उबरठा ' ती म्हणाली की एक स्त्री म्हणून उबरठ्यातली भूमिका मला अपील झाली. कारण सध्या स्त्रियांचा जो मानसिक कोंडमारा होतो त्या संदर्भात त्या भूमिकेला मला न्याय देता आला ! मृणालसेन हे डायरेक्टर म्हणून आवडतात हेही तिने आवर्जुन सागितले. ' मराठी पेक्षा हिंदी पिक्चर मी स्वत. दिग्दर्शित करीन ' हाही पुढचा विचार तिने बोलून दाखवला. सेवादलात काम केल्यामुळे तिला हिंदुत्वाचा विलक्षण अभिमान आहे. स्वत च्या हक्कासाठी झगडणारी स्त्री, अशी भूमिका करताना आनद

वाटतो. म्हणून शाम बेनेगलच्या चित्रपटात काम करताना समाधानही मिळते. असेही तिने सांगितले

गिरीश कर्नाड हे मूळात तेलगू, कन्नडमधले लेखक आहेत. 'हयवदन' सारखे नाटक त्यांनी समर्थपणे पेलले आहे. नाटकात व चित्रपटात दोन्हीकडे त्यांनी काम केलेले असल्यामुळे त्यांचे अनुभव ऐकताना विशेष वाटले मराठी भाषा नसतानाही केवळ जब्बार पटेलच्या आग्रहाखातर उंबरठयातली भूमिका आपण स्वीकारली असे ते म्हणाले. मृणाल सेन ह्यानीही आपली दिग्दर्शकाची भूमिका विशद केली. मराठी चित्रपट न चालण्याचे कारण पैसा हेच आहे. हे मत तिघांचेही दिसले एकूण १॥ तास चाललेली ही चर्चा रंगली स्मिता आणि गिरीश कर्नाड ह्यांनी सफाईदार इंग्लीश बोलून तिथल्या आर्टीस्टला खूष केले. स्मिताला हा बहुमान तिच्या आतापर्यंतच्या कलावंत कारकिर्दीत मानाचाच ठरला

ह्या festival मधे आम्ही '३६ चौरंगी लेन' हा पिक्चर पाहिला. ज्यादिवशी ही चर्चा झाली त्याच रात्री घरी प्रभानी Thriller ची कॅसेट आणली होती मायकेल जॅक्सन हा सध्या संगीतातला हिरो आहे तिथे! त्याच्या गाण्याला आम्ही ५० डॉलर खर्च करून तिकीट काढले होते पण ऐनवेळी पावसामुळे त्याचा कार्यक्रम रद्द झाला पण घरी Thriller पहाताना, ह्या तरूण मायकेल जॅक्सनच्या डोक्यात किती अफलातून कल्पना साकारल्या आहेत याचे प्रत्यंतर आले. विशेष म्हणजे ह्या फिल्ममधे प्रोड्यूसर, डायरेक्टर, हलकी कामं करणारे, पडद्यामागचे सर्व कलाकार आपल्याला दिसतात. Thriller (Making Thriller) कशी बनली याच प्रात्यक्षिक फिल्मसपताच दाखवतात. दिग्दर्शनाच्या कौशल्याला मनापासून दाद द्यावीशी वाटली त्यांचेही संगीत एका वेगळ्या प्रकाराने कसे भारुन टाकते याचा प्रत्यय आला.

एकूणच संगीतामधे कॅनडात ऑपेरा हा प्रकार लोकप्रिय आहे चार्लस ड्युटाईट या कलावंताने ऑर्केस्ट्रा तयार करून-जगाच्या म्युझीकल कॉनफरसच्या मधे सादर केला. The Megill Chamber ऑर्केस्ट्रा आणि स्टुडिओ डी-ला मास्क्यू अनेसिन हेही प्रसिध्द आहेत Jazz हाही प्रकार इथे International level वर चालतो. जाझ बॅलेट बघण्यासारख असत-

फिल्म फेस्टीव्हल,आतरराष्ट्रीय फिल्म festival, नवीन सिनेमा, आर्ट फिल्म हेही इथे नेहमीच होतात. मॉट्रीयलच्या लोकाच Heart म्हणजे Theater (थियेटर)/ क्युबेक हे तर मुख्य ठिकाण आहे, कलावताच्या कला सादर करण्याच' पुस्तकाच्या जत्रा तर किती तरी भरतात सॅलम क्यूलेअर ही सर्वात मोठी आतराराष्ट्रीय पुस्तकाची जागा. क्युबेकची नॅशनल लायब्ररी किंवा मॉट्रीयलची पब्लीक लायब्ररी, या सर्वच ठिकाणी पुस्तकाची नवीन माडणी दरवेळेस दिसते. हे सर्व पहाता पहाता वाटल या समृध्द सुखाच्या काठावरुन आपण हे न्याहाळतो आहोत आपल्या देशातल्या गरीब विद्यार्थ्यांना हे पुरवले तर ? यासारखे प्रश्न तर सततच माझा पाठपुरावा करीत होते, निरनिराळ्या कपड्याच्या शॉपवरून जाताना, सेकडची एक पाटी असायची म्हणजे त्यात राजे किंवा त्यासारख्या मोठ्या लोकानी वापरलेले कपडे विकायन्दा स्वस्त दरात ठेवत श्रीमत लोक वापरून जे कपडे फेकत ते नवेच दिसत तिथले गरीब लोक ते खरेदी करतात प्रभाच्या मराठी मडळानेही हा कपड्याचा प्रश्न त्यानी चागल्या पध्दतीने सोडवला आहे सर्वच श्रीमत घरातल्या बायकाच्या साड्या, मुलाना लहान झालेले कपडे,एकदम नवीन वाटतात असे कपडे पुण्याला एका इस्टीट्यूट मधे भारतातल्या गरीबमुलासाठीएकत्र करून त्या पाठवतात पण तिथेही भारताच्या लोकाचा वाईट अनुभव आला. ज्यासाठी म्हणून ते कपडे जात, ते तिथे न पोहचता मधेच दुसरे कुणीतरी काढून घेत त्यामुळे कपडे पाठवण या बायकानी बद केल वापरलेल्या वस्तू, नको असलेल्या वस्तू, कपडे गारबेज म्हणून त्याना फेकून द्याव्या लागतात प्रभा सागत होती की तिची एक इडियातली मैत्रीण व नवरा नुकतेच इथे सेटल झाले होते मॉट्रीयलला वृत्तपत्र म्हणजे जवळपास ५० पेजेस असतात. तिच्या मैत्रिणीने ही वृत्तपत्रे जमवून अख्खी कपाट भरून ठेवलीत. एक दिवस नवऱ्याने कपाट उघडले तर शीघोशीघ वर्तमानपत्राने भरलेली । मग त्याने तिला सागितले की भारतातल्या सारखी इथे रद्दी विकत घेत नाहीत सर्व फेकावी लागतात गारबेज म्हणून ती बिचारी या रद्दीचे किती पैसे येतील या हिशोबात दग होती त्यावर विरजणच पडले शेवटी प्लॅस्टीकच्या पोत्यामधे भरून ती रद्दी हळूहळू गारबेज म्हणून फेकून द्यावी लागली क्षणोक्षणी भारतातली लोकसख्या, उपासमार, झोपडपट्टी आठवावी असे विरोधी इथले वातावरण दिसते.

ऑगस्ट सप्टेंबरचा सीझन हा फळाफुलांचा असतो. एक दिवस पायीच फिरायला निघालो तिथे कुठल्याही घराला कपाऊंड नसतेच प्रत्येकाच्या दारात भोवतालची झाड एका बगल्यासमोर अक्षरश. ॲपल्सचा, प्राजक्ताच्या फुलाचा सडा पडावा तसा सडा पडला होता. लाल हिरवट रगाची ती सतेज सफरचद मी कितीतरी वेळ बघतच राहिले वाटल सर्व गोळा करावी आणि भारतात पाठवावी. प्रभा तर चक्क कैऱ्यासारख लोणच करते त्याच ! एकूणच समृध्द असलेला हा देश आणि कलासपन्नतेच माहेर असाव अस मॉंट्रीयल, शहर ! त्या शहरात आम्ही आपलेपणान फिरलो पावलाना आपलच वाटाव इतक्या तऱ्हानी !

० ०

# काही कॅनेडियन स्त्रिया

कॅनडा आणि अमेरीका या देशात स्त्री मुक्तीची चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली आहे त्या स्त्रियाना तशी गरजही आहे. WOMEN AT WORK या नावाचे तथे एक वृत्तपत्र निघते त्यात कॅनडातल्या स्त्रिया, त्याच्या जॉबमधे कशा गुततात त्याना प्रमोशन लवकर मिळत नाही त्यासाठी एखादी महत्वाकाक्षी स्त्री किती मेहनत घेते, यासाठी हे वृत्तपत्र कार्यशिल आहे लहानपणापासूनच या स्त्रिया स्वतत्र जीवन जगतात स्वत च शिक्षणही स्वत' पैसे मिळवून करतात. मग एकीकडे जॉब आणि एकीकडे शिक्षण असे दुहेरी जीवन सुरु होते. त्यामुळे त्याच्या नोकरीची सुरुवातच मुळी सेक्रेटरी, वगैरे सारख्या जॉबने होते पण गमत अशीकी त्याना, उच्च शिक्षण घेतले, डिग्री घेतली तरी हृया स्त्रियाना इकडे वरच्या पदाची नोकरी मिळत नाही सोळा वर्षापूर्वी सेक्रेटरी म्हणून रुजू झालेली लिडा व्हाईट ही क्युबेकमधील रॉयल बँकेच्या मॅनेजरची सेक्रेटरी तिने १६ वर्षानतर स्वत.ला प्रमोशन मिळावे म्हणून प्रोजेक्ट वर्क साठी, दुसऱ्या चागल्या कामासाठी मदतीचा हात पुढे केला. पण तिला फारसे यश आले नाही १९७८ मधे तिला

कॉम्प्युटर सेक्शन मधे प्रमोशन मिळाले आणि करीअरचा मार्ग मिळाला. आज ती ऑफीसर म्हणून काम करते. पण यासाठी तिला सतत प्रयत्न करावे लागले. अर्थातच सर्वच सेक्रेटरींच्या पदावर असणाऱ्या स्त्रियाना पुढे जावे असे वाटत नाही लुईस लिओनार्ड तर म्हणते की सेक्रेटरीच्या जीवनातही पुष्कळ चॅलेन्जीग गोष्टी असतात पण काही ऑफीसर्स सेक्रेटरीचा उपयोग खाजगी जीवनात करून तिला करीअर करु देत नाहीत त्यामुळे त्याना बुद्धी आहे आणि त्या अॅडमिनिस्ट्रेटीव्ह वर्क करु शकतात हे सिद्ध करायला काही मार्गही नसतो. अॅडरसन ही ऐथील M. H अॅडरसन आणि असोसिएटस् ची प्रेसिडेंट आहे ती सागते की स्वत ची दिशा आधी ठरवायला हवी.म्हणजे निराशा पदरी पडणार नाही.

तेरा वर्षापूर्वी सेक्रेटरी म्हणून रुजू झालेली सेलीन व्हॅलीन कोर्ट ही फार जिद्दी आणि अभिमानी स्त्री. आज ती डायरेक्टर म्हणून विल्यम मर्सर या कपनीत काम करेते सेक्रेटरी म्हणून काम करता करताच तिने चेक मधील चूका, अकाऊट सेक्शनचे काम आणि कशामुळे कपनीला फायदा मिळेल हेही ती बॉसला पटवून देऊ लागली आणि बॉसने खूष होऊन तिला प्रेसिडेंटशीप दिली पण ती म्हणते ' मी किती तरी वर्षा-पासून या पदासाठी लायक असतानाही ते मला मिळालि नव्हते ' पण तिनें जिद्दीने सेक्रेटरीपद सभाळून रात्रीचे अकाऊटसीचे क्लासेस जॉइन केले त्याचा अभ्यास केला आणि यशस्वी झाली. पॉलीन पटूली ही तर शेरेटन माऊट रॉयल हॉटेलमधे सेक्रेटरी म्हणून काम करते, १९५८ पासून ! ती म्हणते मी माझ्या व्यवसायात खूष आहे पण म्हणून मला कायमच इथे रहायचे नाही नतर ती ' टूर अॅड ट्रव्हल कोऑर्डिनेटर म्हणून गेली. कंपनी चेंज न करताही त्याच पदावर राहून पटूलीने आपले करीअर घडवले अशा कॅनडात पुष्कळ स्त्रिया सेक्रेटरीचे काम करतात जेनीफर पी, वार्बस फेअर बॅरन याही स्त्रिया तिथे निरनिराळे कोर्सेस करून आपली नोकरी करीत आहेत सेक्रेटरी पासून सुरूवात झालेल्या या काही स्त्रिया आज उच्च पदावर गेल्या आहेत

कायद्याचे ज्ञानही अलीकडे स्त्रीवर्गाला आले आहे. स्वतः ते शिक्षण घेऊन आणि अनुभव घेऊनही !

मोनिका मेनार्ड ही एक लॉयर आहे तिचा अनुभव सांगताना ती म्हणते की कोर्टात जाताना एकदा माझ्याजवळ फाईल्स बऱ्याच होत्या. आणि

माझ्या विरुद्ध लढणाऱ्या वकीलाजवळ एकही फाईल नव्हती तिला जी केस लढवायची होती त्या प्रकारच्या केसेसमधे आतापर्यंत वकील लोक हरले होते पण मोनिकाने मात्र अभ्यास केला होता तिच्या विरुद्ध लढणाऱ्या वकीलाला आत्मविश्वास होता की आपण जिंकणारच कारण आपल्याविरुद्ध एक 'स्त्री'आहे जरी तिच्या हातात कामाच्या फाईल्स आहेत कारण स्त्रीया काही करु शकतात यावर त्याचा विश्वासच नव्हता पण ती जिंकली तेंव्हा आता ती अभिमानाने सागते की क्युबेकमधे चाळीस टक्के वकील स्त्रिया आहेत. म्हणून त्यानी आता स्त्रियाची स्त्रियासाठीच एक फर्म काढली आहे त्या फर्ममधे स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचा अभ्यास केल्या जातो आणि अशा स्त्रियाना ही सस्था विनामुल्य मदत करते. स्वसरक्षणासाठी आता इकडे कायद्याचा अभ्यास स्त्रिया मोठ्या प्रमाणात करताना दिसतात

माँट्रीयल येथील औद्योगिक क्षेत्रातली जेनी कॉन्स्टेटीनाईड ही सल्लागार म्हणून प्रसिद्ध आहे एकदा औद्योगिक विक्रेत्याची एक सभा भरली होती. त्या सर्व पुरुषामधे ही फक्त एकटी निरीक्षक म्हणून गेली होती तिची ओळख करुन देताना, जेनीला पधरा वर्षाचा अनुभव आहे हे सागण्यात आले होते •पण त्यातल्या काही सभासदानी तिला खोचक प्रश्न विचारून त्रास दिला तिला काही समजत नाही हेच गृहीत धरण्यात आले पण तिने स्वत दोनशे पानाचा एक शोध प्रबध प्रसिद्ध केला होता त्यामुळे हे समजताच पुरुष सभासद खजील झालेत पण त्याना एक स्त्री आपल्या पुढे जाते हेच सहन होत नाही आता मात्र ३५ टक्के स्त्रिया या बिझनेस मॅनेजमेंट मधे शिकू लागल्या आहेत या सदर्भात एका चार्टर्ड अकाऊटट असलेल्या स्त्रीचा अनुभव बोलका आहे. टेल्सा सारोराला ही अकाऊटट च्या पदावरुन, स्वत.च्या अभ्यासाने अल्पावधीत सुपरवायझर झाली पण ती केवळ एक स्त्री आहे म्हणून तिला कमी लेखण्यात येत. आता या क्षेत्रात दीड ते दोन हजार बायका काम करतात पण आता ती सागते की सुपरवायजरच्या पदानंतर जी प्रमुख भागीदारी आहे त्यात मला केवळ ' स्त्री ' म्हणून भागीदार करुन घेण्यात येणार नाही. ते मला सतत प्रश्न विचारतात, खाजगी स्वरुपातले ! पण असे प्रश्न पुरुषाना विचारीत नाही.

सेंट कॅथरीन स्ट्रीट माँट्रीयल येथील एक नृत्यागना व्हॅन विर्धन ही

सागते की नृत्यात ग्लॅमर खूप असत पण जीवन जगण्यासाठी नृत्य हे पुरेसे नाही. एकतर करीअर किंवा मुल, असाही पेच या व्यवसायात पडतो. अंड्रीया डेव्हिडसन म्हणते की मला जरी मूल हवे असले तरी मी डान्सर म्हणून, माझ्यावर मर्यादा पडते या दुहेरी भूमीकेतून जगताना मला माझे शरीर जपावे लागते बॅलेरीया या एका स्त्रीने मात्र मूल आणि नृत्य दोन्ही सभाळले पण अँड्रीया म्हणते की मी नृत्य म्हणजेच सर्वकाही अस मानत नाही, शेवटी स्त्रीला मातृत्वाची गरज असतेच.

' टोरोंटो येथील एक लेखिका सिलव्हिया बाशेव्हकीन हिने एक पुस्तक लिहिले आहे Toeing the lines– women and party politics in English Canada) ह्यात ती म्हणतें की बायकाना राजकारणात येऊ देत नाहीत जी कामे ह्या करतात ती फक्त कारकुनी असते आणि राजकारणही फक्त स्त्रीपुरतेच मर्यादित असते !' युनिव्हरसिटी ऑफ टोरोंटो येथे राज्यशास्त्राची सिलव्हिया ही प्रोफेसर आहे जी पार्टी दुबळी आहे अशा ठिकाणी स्त्रियानी महत्वाची कामगिरी केली आहे. रोझमेरी ब्राऊन हिने १९७५ मधे आणि फ्लोरा मॅकडोनल्ड हिने १९७६ मधे चागले काम करून प्रशसा मिळवली आहे. पण अजूनही इथल्या स्त्रियाना राजकारणापासून दूरच ठेवले जाते

या सर्वच क्षेत्रातल्या स्त्रियांच्या चळवळी बघितल्या की मन थक्क होते. पुस्तकाच्या सदर्भात तर गंमत अशी की काही वर्षापूर्वी स्त्रियाच्या विरुद्ध पुस्तक लिहिली जात होती ही पुस्तक स्त्री जीवनाला धक्का देणारी होती पण आता इतर क्षेत्रातल्या चळवळीप्रमाणे स्त्रीने स्वत चे करीअर कसे यशस्वी करावे ? या सारखी पुस्तकें व्हिले मेरी बुकस्टोअर ने प्रसिद्ध केली आहेत ह्यामुळे अशी पुस्तक स्त्रीला तिच्या गरजा भागवण्यासाठी, नोकरीसाठी आणि करीअरसाठी उपयोगी पडणारी आहेत Room at the Top' सारखी पुस्तके स्त्रीला दिलासा देणारी ठरली आहेत 'The working women success Book' हे तर स्त्रियाच्या क्षेत्रात मानदड मानले गेले आहे

अशा अनेक कॅनेडियन स्त्रियाची धडपड, चळवळ बघितली की वाटते भारतीय स्त्रीला ह्या गोष्टीसाठी तर कधीचेच स्वातंत्र्य मिळाले होते मग तिचा स्त्री मुक्तीचा लढा कशासाठी ?

० ०

# नायग्र्याच्या पायथ्याशी

एखादा देश आपल्याला आवडून जातो ह्याचे कारण तेथले नैसर्गिक आणि मानवनिर्मित सौंदर्य ! पण काही वेळला त्या देशाच्या प्रेमातच आपण पडतो त्याला मात्र कारण तिथले लोक असतात. कॅनडातले कलामूल्यानी नटलेले लोक हेच माझ खर आकर्षण ठरल. जायचे दिवस जवळ येत चालले होते. कॅनडाचा प्राण असलेला नायगारा आणि जगातल्या नऊ आश्चर्यापैकी एक आश्चर्य असलेला नायगारा अजून डोळ्यात आणि मनात साठवायचा होता

वॉटरलूला शकरराव एलाजाकडे जाऊन मग नायगऱ्याला जायचे ठरले. शकरराव हे वॉटरलू युनिव्हरसिटीचे (Facultay of social work) डीन आहेत मध्यतरी मॉंट्रीयलला ते जागतीक आणि सास्कृतीक स्पेशल कॉनफरन्सला आलेले असताना त्याच्या कडील सर्व मडळींशी ओळख झालेली होतीच त्यामुळे त्याच्याकडेजाताना परकेपणा नव्हताच.उलट ह्या सर्वांच्या परिचित नजराबरोबर नायगारा बघणे हा एक अनुभव होता.

पाच तास कार ने प्रवास करून जेव्हा आम्ही वॉटरलूला पोहचलो . तेव्हा सूर्यास्ताची वेळ झाली होती 'एक टुमदार सुदर शहर' अस वर्णन करता यईल अस वॉटरलू एक गाव ! उंच, सखल जागा, आणि त्यावर सर्वत्र स्वतंत्रपणे विखुरलेले कौलारू बगले ! पणजीमध्ये मला अशीच कौलारू घरें दिसली होती. गाडीने वळण घेऊन एका Duplex Type बगल्याजवळ ती थाबली ! तेव्हा एलाजा मडळी बाहेरच लॉनवर वाट बघत होती बाहेरून घराचे सौंदर्य एवढे लक्षात आले नाही पण आत जाताच, प्रशस्त ड्राईंग हॉल, कीचन, ह्यामधे माइक्रोओव्हन पासून तर अत्याधुनिक शोध लावलेली सर्व यान्त्रिक उपकरण दिमाखात कीचनची शोभा वाढवित होती. सर्वत्र पायाखाली गालीचे, हाऊस प्लॅंटस् जगातल्या निवडक कलाकृती यानी आमचे स्वागत केले चहा वगैरे घेऊन मागच्या बाजूने गेलो तर पुनः उचवटा, त्यावर पाईन, मेपलची झाडे ! मी वेड्यासारखे पाईन कोनस् खूप गोळा केले. त्यातले जेवढे आणता आले तेवढे भारतात आणलेही ! सुजाता हसत होती. म्हणाली,

पहिल्यादा आलं इकडे की सर्वंचजण वेडे होतात इथे असे ! तिच म्हणण अगदी खरं होत. तिच्याबरोबर त्या डौलदार वृक्षाच्या ओळीतून पायीं फिरताच खूप मजा वाटली.

सुजाताने रात्री, पुलाव, दहिवडे, श्रीखड पुरी असा हेर्लेकराना आवडेल असा खास आपला स्वयपाक केला होता. तिच्या बोलण्यातून वागण्यातून अगत्य, आदरातिथ्य, आपुलकी कळत होती. प्रीतीला मराठी बोलता येत नव्हते पण मराठी समजत होते मधून मधून गप्पामध्ये तीहि सहभागी होत होती तीहि सोशलवर्कच्या कोर्सला गेली होती प्रीति अतिशयच ग्रेसफूल होती. त्यामुळे तिथल्या तरूणवर्गात ती फार प्रिय होती याचा अनुभव आम्हाला मॉंट्रीयलला असतानाही आला होता. त्याच्या कॉनफरन्सचा शेवटचा दिवस कल्चरल प्रोग्रॅमचा होता. त्या दिवशी त्याचे व प्रभाचे (प्रभाही त्यात निमत्रित होती) गेस्ट म्हणून आम्ही कार्यक्रमाला गेलो होतो भव्य हॉल ! स्टेजही गोलाकार खूप मोठे आणि हॉलभर सर्वत्र गोल गोल टेबल ठेऊन रचना केलेली ! स्नॅक्स घेत घेत कार्यक्रम एनजॉय करायचा ! मी, प्रीति, सुजाता आम्ही बरेच समोर जावून बसलो होतो इटालियन, युरोपीयन सर्व डान्सेस अतीशय सुंदर झालेत. त्यानतर पब्लिकलाही कार्यक्रमात ते लोक सामील करून घेतात. एक युवक माइकवर घोषणा देतो आणि आपल्या बरोबर प्रेक्षकामधे बसलेल्यापैकीच डान्स करायला बोलवतो तिन्ही वेळेस प्रीतिला त्या युवकानी निमत्रित केल आणि तीहि जणू काही तिथलीच आहे, अशी अतीशय लवचिकपणे नृत्यात सामील झाली तिचे एक्सप्रेशनस् तिची नृत्याची शैली आकर्षक असल्यानेच तिला बोलवत असणार हे निश्चित ! पण मागच्या लाईनीत बसलेले शकरराव मात्र ह्या प्रकाराने खूपच अस्वस्थ झाले होते हे आणि शकरराव आमच्या जवळ आले नी म्हणाले ‘ चला आता घरी जावू या. ’ मला नवलच वाटले. ऐन रगात आलेला कार्मक्रम नी घरी जायच ?" शंकरराव थाबू या थोडावेळ, प्रीति तर छान डान्स करतेय ? माझ्या या वाक्यानी तर त्याचा चेहरा साफ पडला मग कुठे माझ्या डोक्यात प्रकाश पडला ! शंकरराव हे सोलापूरचे मूळचे ! जुन्या संस्कारात वाढलेले ! पण आज २० वर्षे तिकडे आहेत. तरीही आपल्या १८ वर्षाच्या मुलीने कुणाही बरोबर डान्स

करावा हे त्याच्या भारतीय मनाला पटत नव्हते. म्हणून ते अस्वस्थ झाले होते मग आम्ही सर्वांनी त्याना म्हटल की ठीक आहे ती डान्स करणार नाही पण कार्यक्रम तर बघू या ! शेवटी नाइलाजाने ते थांबले होते. प्रीति तर त्याच सस्कृतीत वाढलेली तिने भारतीय सस्कृतीचे भान कोणच्या पायावर तिथे ठेवायचे ? ज्या समाजात ज्या अमेरीकन सस्कृ- तीत ती शिकते, तशीच ती वागणार ! हे दोन पिढीतले अतर मला सर्वत्रच तिकडे जाणवले.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही वॉटरलू युनिव्हरसिटी बघून आलो तिथल सर्वात आकर्षण वाटल असेल ते लायब्ररीच ! सुदर सुदर कव्हर असलेली पुस्तके ! फार बरे वाटले तिथे ! युनिव्हरसिटीला सुट्याच होत्या पण शकररावच मुख्य असल्याने त्यानी सर्व युनिव्हरसिटी दाख- वली, त्याच ऑफीस म्हणजेही एक कलात्मक सजावट होती ! शकर- रावाच्या हाताखाली बरेच कॅनिडियन, अमेरिकन अध्यापक स्टाफ आहे. एक इडियन मुख्य जागा बळकावतो याचा त्या लोकाना फार मत्सर वाटतो, तिकडे ! आणि हे सहाजिकच आहे

दुसरे दिवशी सकाळीच नायगान्याला जायचे असल्याने रात्रीच सर्व टिफीन, तयार करून ठेवला सुजाताला खास नागपुरी पुडाच्या वड्या शिकायच्या होत्या त्याही आदल्या दिवशीच करून ठेवल्या. त्याकरता तिने आम्ही वॉटरलूला पोहचण्यापूर्वीच शिकागोहून कोथिंबीर मागवून ठेवली होती आपल्या सर्वच भारतीय भाज्याच तिथे अप्रूप वाटत. कारण ९ महिने बर्फाळ हवेत तर सर्वच फ्रोझन वस्तू विकत घ्याव्या लागतात त्यामुळे ही ग्रीन पालेभाज्याची हौस उन्हाळात पुरवून घ्यावी लागते

सर्व तयारीसह आम्ही, एलाजा कुटुंब,व प्रभाची मैत्रीण सौ फडके व श्री फडके असे सर्वजण दोन कार घेऊन निघालो. सकाळची हवा आणि ड्राईव्ह करणारे प्रीतीचे तरुण हात! गाडी वेगाने वॉटरलूला मागे टाकून नायगन्याच्या दिशेने धावू लागली रवि शकरराव सारेच गाईड झालेले, पण केव्हा केव्हा वाटत होत या निसर्गरम्य परिसराला शब्दाचं ओझं नकोच. नुसती डोळ्यानी फिल्म घ्यावी व अतर्मनात त्याचे प्रिन्टस्

उमटावेत. नायगारा नदी कॅनडा मॉंटोरिओ आणि यु एस ए. ची बांऊड्री लाईन आहे लेकइरीपासून शांतपणे निघालेली ही नदी फॉलच्या दिशेने मात्र अक्षरश वेगाने धावते ३१५ फूट लाम्बीवरून ही नदी १ मिनीटात Lakhs of million tons of water फेकत असते गोट नावाच्या आयलॅंडमुळे याचे दोन भाग झालेत एक Horse shoe म्हणजे कॅनडा-साईडचा आणि दुसरा पूर्वेकडचा अमेरीकन फॉल ५२'' फूट पाणी १ मैलावरून हा फॉल पाणी फेकत कठीण अशा लाईमस्टोन वरुन हे पाणी हळूहळू सॉफ्ट अशा खडकावर येत हे नायगाराच पाणी underground टनेलेस मधे electrical energy साठी जात. आणि कॅनेडियन साईडने ते क्युबीक फीटने एका सेकंदात तर plants साठी २०,००० cubic feet अस वापरल्या जात जहाज, बोटी 'लेक इरा आणि लेक मॉंटोरिओ मधून जातात शाम्प्लेन आणि मॉंटोरिओ ही दोनच गोड्या पाण्याची सरोवर !

गाईड सारखी सर्व माहिती एका दमात मला सर्वचजण पुरवत होते. अजून नायगाऱ्याचा पार्कसुद्धा आला नव्हता पण माहिती सर्व मिळाली होती मधेच प्रीती सागत होती आणि, NIGARA FALLS is known as the 'HONEY MOON OF THE WORLD'' and is mecca for lovers of all ages"

मी प्रीतिला विचारले, 'तू किती वेळा नायगारा पाहिला.?'

'फक्त दोनदा !' आणि आता या खऱ्या तारुण्य वहरात ती पुन: आमच्या बरोबर नायगारा पहाणार होती. जसजशी गाडी वेग घेत होती. तसे माझे डोळे नायगाराच्या पार्ककडे लागले होते. जिथे फ्लोरल क्लॉक हे ग्रीन पानाफुलानी वेढलेले आकर्षण होते. नायगारा पार्क कमीशनने तयार केलेले २५,००० हजार प्लॅन्टस्चे हे फ्लोअर क्लॉक जगात सर्वात मोठे मानले जाते दरवर्षी नवीन डिझाईन बनवणे आणि प्रवाशाना खिळवून ठेवणे हे वैशिष्टच असलेले आणि १२-२ डायामीटरचे हे घड्याळ दृष्टीपथात आले आणि मी दूरूनच दूर्बिणीतून त्याचा View टिपला. लाल, हिरव्या, ब्राऊन, पिवळ्या रगात सजलेले हे घड्याळ ! हा नायगारा फॉलला जाण्याचा पहिला थांबा होता किती तरी बाजूने त्याचे फोटो घेतले आम्ही, या घड्याळाच्या बाजूनेच अलीकडेच बनवलेले lilic गार्डन

ही अत्यत देखणे, त्याच्याच २५६ जातीच्या फुलाच्या बेडस्वर मनमुक्त लोळण घेत आम्ही या निसर्गाच्या कुशीत शिरण्याचा प्रयत्न केला. डॅफोडिस्च्या फुलातून फिरताना न कळतच आठवून गेली वर्डसवर्थची कविता

I wander'd lonely as a cloud
That floats on high over vales and hills
When all at once I saw a crowd
A host of golden daffodils,
Beside the lake beneath the trees
Fluttering and dancing in the breeve"

आणि शेवटच्या ओळी ' And then my heart with pleasure fills, And dances with the daffodils "

या ओळीप्रमाणेच मनातला आनद साडत होता या निसर्गाच्या सानिध्यात ! निसर्ग माणसाला सर्व विसरायला लावतो ते इथे कळल. इथून पाय निघतच नव्हते पण ही तर नायगऱ्याची सुरुवात होती पुन. कार ने वळण घेतले. आणि ५ मिनीटाच्या अतरावर थावली नायगरा नदीच्या किनाऱ्यावर आम्ही उतरलो होतो. हा 'Look-out point' इथून नायगारा नदीचे विस्तीर्ण पण देखणे पात्र मी दुर्बिणीतून पाहिले आणि दूरूनच एक फोटो घेतला नदीवरून, आकाशातून यावी तशी एक ट्रॉली येत होती सर्वांनीच त्यात जाण्यापेक्षा आम्ही दोघानीच त्याचे तिकीट घ्यावे असे ठरले नदीच्या किनाऱ्यावर त्या ट्रॉलीत बसताना वाटले 'हळूच भूलाबाई पाय टाका' तसे अलगद् पाऊल टाकावे लागते दोघाच्या सीटस् असलेल्या या ट्रॉलीतून जाताना वाटले देवादिकाचे रथ यापेक्षा काय निराळे असणार ? नदी पार करताना तिच्या पाण्याची शांत सळसळ इतक्या उचावरूनही कळत होती. पुन· परत येताना, ट्रालीतल्या कितीतरी नजरा 'तुम्ही भारतीय ना ?' असे उत्सुकतेने विचारीत होत्या. मी ह्यांना म्हटल नदीच्या पात्रात एक सेटचं नाण टाकू या का ?' पण लगेच लक्षात आल की इथे १ सेट सुद्धा आम्हा भारतीयाना जपून ठेवावा लागतो, मग नदीत टाकणे दूरच ! नायगारा नदी पहातानाही मला गगा, यमुनाच आठवत होत्या भारतीयांच पावित्र्य स्थान ! आणि नायगारा नदी ही सळसळत्या तारूण्यलहरी पाघरून सौदर्यशक्ति, रुपवती दिसणारी, तरीही शालीनच वाटली !

किनाऱ्यावर उतरताच, लक्षात आलं की खूप भुक लागलीय मग सँडविचेस, पुडाच्या वड्या, भेळ याचा अगदी फडशा पडला. पोटात जाताच फ्रेश वाटले पुन ताजेपणा घेऊन नायगऱ्या जवळ पोहचलो. प्रचंड डाबरी रस्ता गोलाकार गेलेला ! रस्त्याच्या कडेने असंख्य स्त्री पुरुषाची गर्दी, कुणाच्या गळ्यात कॅमेरा, कुणाच्या डोळ्याशी दुर्बिण, तर कुणाच्या खांद्यावर गोड इंग्लीश, फ्रेंच, गुटगुटीत मुले (बाबा गाड्या असुनही) ! खर म्हणजे नायगारा पार्क हा Front window of the province आणि Gateway of Canada ! कारण अमेरीकेची बॉर्डर पार करताना इथे व्हिसा लागतो त्यामुळे पुष्कळाना अमेरीकेतून कॅनडात न येता आल्यामुळे कॅनडा साईडचा फॉल न पहाताच परतावे लागले आहे

गाडी थांबवली खरी ! पण पार्कींगला अजिबात जागा नव्हती. मागे, पुढे फिरुन शेवटी एका उच्च रेस्टॉरंटजवळ पार्क केली ! ते रेस्टारंट होते कप्री रेस्टारंट ! रात्री इथेच रहावे का असा विचार मनात होताच त्या दृष्टीने गाडी इथे पार्क केली ते बरेच झाले होते आता नायगरा अगदी दृष्टीच्या टप्प्यात आला होता. आमच्यापैकी सर्वचजण विखुरले होते ' फडके म्हणत होते, लोकाना काय इतक्या वेळा बघावस वाटत कुणास ठाऊक?' मी त्याच्याकडे नुसत पाहिल ! आणि प्रीति मी, हे शकरराव भराभर रस्त्याच्या किनाऱ्याने चालू लागलो. कठड्याला टेकून नायगारा दूरून अनुभवणे हा एक अनुभव होता नायगरा बघून कुणालाही काव्य सुचावे ! यावेळी भारतातला गर्द उन्हाळा डोळ्यात घेऊन मी नायगाऱ्याच्या इंद्रधनुषी रंगाच्या धारात बुडत चालले होते सारे रंग देहाला आरपार थर्थरुन टाकत होते. किनाऱ्याने पुढे वळण घेऊन आम्ही पुढे गेलो, धारांची गाज मनावरचे असंख्य पडदे बाजूला सारत आत शिरत होती. समुद्रपक्ष्याचे थवेच्या थवे लयबद्ध हालचालीत मनमानेल तसे धारावर फेकले जात होते तर काहींच्या सथ पंखाची धडपड किनाऱ्याकडे सरकणाऱ्या लाटाच्या हिंदोळ्यावर विसावत होती

दुपार केव्हाच खाली सरकली होती. दूरवर नजरेस पडणाऱ्या या कॅनडाच्या किनाऱ्या वरुन अमेरीकन नायगाऱ्याचा क्षीण फॉल निमुटपणे काळोखमय होण्यासाठी उत्सुकला होता. प्रचंड वेगानी उडणाऱ्या लाटाच्या लांबच लांब तुषार जलानी अगदी ओलेचिंब होत होते. या

सौम्य प्रकाशात किनाऱ्याने बसलेले छोटेखानी कौलारु बगले, मोटेल्स्, त्या लाटाच्या तुषारानी अधीकच लावण्यगर्द व गहिरे दिसत होते जगातल्या नऊ आश्चर्यपैकी एक सनातन नैसर्गिक ठसा नायगऱ्याच्या रुपात उभा राहतो तो मनाच्या तळात शिरूनच ! तुषाराना चूकवत मी अधिक जवळ गेले, पाण्याच्या प्रचड गर्जना, आणि लाटाचे ताडवनृत्य मला शिवलिलामृत आठवायला लागले. वाटल, की याचे पाढरे शुभ्र दुधाळ रुप बघू की त्याच्या लयकारी नृत्यात बेभानपणे सहभागी होऊ, सभ्रमाच्या या वलयात आपण नायगाऱ्याच्या अगदी निकट आहोत ही कल्पनाच शहारुन टाकणारी !

किती वेळ मी तद्रीत होते ! प्रीति बोलवायला आली होती. टनेलसमधून जाण्यासाठी ! अगदी नायगाऱ्याच्या जवळ, पायथ्याशी ! टनेलमधे जाताना सर्वांनाच पिवळे रेनकोट, बूट देतात हा पिवळा वेष चढवून अधारातल्या फिक्या पिवळचा उजेडात टनेलमधून आम्ही अवघ्या ५ मिनिटात खाली गेलो गच्च अधारात तोडावर, अगावर प्रचड वेगानें पाण्याचे सपकारे बसत होते गॅलरीसारख्या कठडचाला. धरून मी आणखी समोर गेले वाटल, त्याच्या धाराच्या आवेगात मी इथे उभी राहिले तर हात पुढे केला तर नायगाऱ्याचा स्पर्श ! विराट असा. गच्च अधारात पिवळ्या रेनकोट मध्ये वेढणारी माणसें कोण आपले कोण परके ? वाटल नायगऱ्याजवळ आपपर भाव नाही नेमकी याच वेळेस पायथ्याशी आठवते, मनात घर करून असलेली मेरीलीनमन्रो ! नायगरा चित्रपटातली ! प्रियकरावर निस्सीम प्रेम करणारी, इथेच तर त्या प्रचड धाराना साक्षी ठऊन प्रियकराबरोबर पळून जाण्याचा बेत करणारी. पण नवऱ्याला तिचा बेत कळताच त्याचा डाव... नि प्रियकराचे रिकामे बूट बघून आकात करणारी मेरीलीन. तिचा शोक. .तिचा दाह सारं निमुटपणाने ऐकून घेणारा हा नायगरा. वाटल की तिच्यासाठीच हा, आकात देहात घेऊन घोडदौड करीत आहे.

टनेलमधली वेळ सपत आली तरी मनाचे पाऊल उचलत नव्हते. पिवळ्या रेनकोट मधला नायगारा सपला होता. Maid of the Mist Boat मधून पुन एकदा नायगाऱ्याच्या पायथ्याशी जायचे होते. ५ वाजून गेले होते बोट चुकणार असे वाटले. घाई घाईने क्यूमधे जावून उभं

राहिलो खर तर नायगऱ्याच्या या बेभान सौंदर्याला हे क्यू वगैरेचे व्यावहारीकपण मानवतच नव्हते पण पुन एकदा पायथ्याच्या दर्शनाची ओढ अखेर अर्ध्याक्यूपर्यंतचेच लोक जावू शकले आमची बोटटूर चुकली. रविने लगेच सांगितले दुसऱ्या बाजूने तसेच खाली जाता येते पुन एकदा उत्साहाचे बळ आले ! अधार हळूहळू वाढत होता

त्या रात्री मला मुळीच झोप नव्हती बरोबरचे सारे, धारा बघता बघता हिरवळीवर विसावले होते धारांचा अखड जागर अनावर होत चाललेला स्फटिकासारखा स्वच्छ प्रदेश ! या नीरवतेत आसपासच्या वर्दळीच भान केंव्हाच हरपलेल ! समोरच्या त्या रगरुप–रस गधाच्या शिडकाव्याने माझे आस्तित्वच ढवळून निघाले होते अतर्मुख झालेल्या माझ्या मनाला मन्रोच्या तारुण्यकळा स्पर्शून गेलेल्या आणि ढगाशी क्रीडा करणारा मद निळा रग स्वप्नाच्या झुल्यावर सावकाश रिकामा व्हावा, तस काहीस रिकाम रिकाम जाणवत होत सध्याकाळची एक अनोखी उदासी आत दाटून येते कुठून तरी चेतवणारे सूर आर्तपणे मनाच्या गाभाऱ्यात घुमतात चारी बाजूनी नुसत्या वेढणाऱ्या अथाग लाटा . मी पुनः एकदा पायथ्याशीअसते ही लाटाची गाजआज इतकी प्रचड रुपात मी कधी ऐकलीच नव्हती वाटत होत की आकाशाचा घुमट तुटून या सुदर नक्षत्राचाही क्षणात सडा पडेल खाली ! लडिवाळ लाटाचा सवाद कलडणाऱ्या चद्राजवळ जावून पोहचलेला ! तर आपल्या उच्चारलेल्या प्रत्येक शब्दाच गीत ही धार तार सप्तकातच नेतेय आणि शब्दामागे दडलेल सार जाणायला लागणारी एक मनस्वी लिपी या धारामधे मी वाचत होते. किती वेळ गेला असेल कुणास ठाउक ! साजवेळचे पक्ष्याचे थवे चादीच्या घटासारखे रात्रीच्या गर्द गहन अधाराला लगडून गेले होते. जणू शकराच्या विराट स्वरुपावर पार्वतीने एक छत्र धरले होते. मी हळूच आसपास बघितले माझ्यासारखे अनेक हरखून गेलेले परदेशीय लोक निःशब्दपणे धाराकडे बघत उभे होते कुठे कुठे निरोप देणाऱ्या, घेणाऱ्या डोळ्याची उदासभोर हालचाल हलकच साद देत होती उदासी कधी कुणाला श्वासात बाधता येते ? हा प्रश्न जेवढा गूढ, तेवढच आपले नायगाऱ्याजवळ असणेही गूढ वाटत होते. या असण्यात मनावरची रगीत वस्त्र केंव्हाच गळून पडलेली ! मानवी पैलूचे अनेकस्तरीय सदर्भ फेकून

मोकळ्या झालेल्या 'स्व' ला ह्या धाराचे, पाचूचे अर्थ एका अध्यात्मिक उंचीवर घेऊन जात होते कुठल्या ओंकाराचे देणे या फेसाळ धारांना लाभले होते कुणास ठाऊक ? सार जाणवण कोवळ वाटत होत

किनाऱ्याशी भेटलेली किमीको मला पुन पायथ्याशी भेटते.आनदाने बेहोष झालेले तिचे जपानी मन तिच्या भावसपन्नतेचे साक्ष देत होत. 'चादण्याचे देणे, तेथे तुझे माझे येणे.' अशी किमिको ! तिच्याबरोबर हातात हात घालून फिरताना देशाचा बधनकडा केव्हाच गळून पडल्याच्या होत्या, तिच्या सहवासात सध्याकाळच्या वेळचे अधाराचे गूढ वलय, त्याचा, मागमूसही उरलेला नसतो. मनाची उत्कट मनस्विता पाण्याच्या धारेतून व्यक्त करताना त्याची पडझड आठवतही नव्हती धो धो पडणाऱ्या आवाजाचे सगीत मानवी मनातले सदर्भ मोकळे करीत बेबद मुक्त होत पाण्यातला कुठला तरी दूरचा करूण आवाज हळूवारपणे आत झिरपत जात होता

रात्रीच्या रोषणाईत नायगरा, लाल, निळ्या, पिवळ्या रंगाच्या लाटात सजलेला असतो धाराचे सुरेल रगीत नृत्यही सुरु झालेले जवळच्याच ग्रीन व्हिक्टोरिया पार्कमधील ग्रीन हाऊसमधे Water dance च्या कार्यक्रमासाठी लोकाची रीघ लागलेली असते. मी प्रीति, रवि व प्रभा, सारेच ट्रॉलीत बसून माऊटेनवर जातो परीकथेत रगवलेल्या कथेप्रमाणे रगीत [illegible] मगीताच्या पार्श्वभमीवर पाण्याचे नृत्य सुरु होते कारज्याचे वेगवेगळे हावभाव जणू कथ्थक भरत नाट्यम सादर करीत आहे से वाटते चढत गेलेल्या नृत्याच्या ललकारी बरोबर पाण्याचे कारजे ही उच जाते, आणि हलकेच खाली उतरते एवढ्याशा डोळ्यात काय काय साठवाव ते कळत नाही शो सपतो पुन. एकदा ट्रॉलीने खाली उतरतो

रात्रीचे ११। वाजलेले असतात नायगारा रात्रीचे रग भरत असतो. विविधरगी बऱ्यापैकी लोकाची वर्दळ चढत्या रात्रीबरोबर पुन. वाढत होती. याना या लाटाचे, धारेचे काय वाटत असेल ?तेही व्याकूळ मनाला आवर घालण्यासाठी आले असतील का ? की सहजच जगाच्या आसमतातल्या लहरी अगाभोवती लपेटून घ्यायला आले असतील ? माझ्या

मोकळ्या झालेल्या 'स्व' ला हृया धाराचे, पाचूचे अर्थ एका अध्यात्मिक उंचीवर घेऊन जात होते कुठल्या ओंकाराचे देणे या फेसाळ धाराना लाभले होते कुणास ठाऊक ? सार जाणवण कोवळ वाटत होत

किनाऱ्याशी भेटलेली किमीको मला पुन पायथ्याशी भेटते.आनदाने बेहोष झालेले तिचे जपानी मन तिच्या भावसपन्नतेचे साक्ष देते होते. 'चादण्याचे देणे, तेथे तुझे माझे येणे.' अशी किमिको ! तिच्याबरोबर हातात हात घालून फिरताना देशाचा बधनकडा केव्हाच गळून पडल्याच्या होत्या,तिच्या सहवासात सध्याकाळच्या वेळचे अधाराचे गूढ वलय, त्याचा, मागमूसही उरलेला नसतो. मनाची उत्कट मनस्विता पाण्याच्या धारेतून व्यक्त करताना त्याची पडझड आठवतही नव्हती धो धो पडणाऱ्या आवाजाचे सगीत मानवी मनातले सदर्भ मोकळे करीत बेबद मुक्त होत पाण्यातला कुठला तरी दूरचा करूण आवाज हळूवारपणे आत झिरपत जात होता.

रात्रीच्या रोषणाईत नायगरा, लाल, निळ्या, पिवळ्या रंगाच्या लाटात सजलेला असतो धाराचे सुरेल रगीत नृत्यही सुरु झालेले. जवळच्याच ग्रीन व्हिक्टोरिया पार्कमधील ग्रीन हाऊसमधे Water dance च्या कार्यक्रमासाठी लोकाची रीघ लागलेली असते. मी प्रीति, रवि व प्रभा, सारेच ट्रॉलीत बसून माऊटेनवर जातो परीकथेत रगवलेल्या कथेप्रमाणे रगीत पाऊस, आणि ग्रीनरी ! थोड्याच वेळात सगीताच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे नृत्य सुरु होते कारज्याचे वेगवेगळे हावभाव जणू कथ्थक भरत नाट्यम सादर करीत आहे से वाटते चढत गेलेल्या नृत्याच्या ललकारी बरोबर पाण्याचे कारजे ही उच जाते, आणि हलकेच खाली उतरते एवढ्याशा डोळ्यात काय काय साठवाव ते कळत नाही शो सपतो पुन एकदा ट्रॉलीने खाली उतरतो

रात्रीचे १।। वाजलेले असतात नायगारा रात्रीचे रग भरत असतो. विविधरगी बऱ्यापैकी लोकाची वर्दळ चढत्या रात्रीबरोबर पुन वाढत होती याना या लाटाचे, धारेचे काय वाटत असेल ? तेही व्याकूळ मनाला आवर घालण्यासाठी आले असतील का ? की सहजच जगाच्या आसमन्तातल्या लहरी अगाभोवती लपेटून घ्यायला आले असतील ? माझ्या

मनात उगाचच प्रश्न फेर धरीत खरे तर आता इथेही एकांत वगैरे नसतोच. तेवढयात कुणाचे तरी शब्द कानावर पडले "हा नायगारा दरवर्षी २५ तरी मृत्यू या धारात खेळवतो." शब्द दूरून आले होते पण वाटलं की माझ्या अनंत उत्कट प्रार्थनातून माझ्या प्रेमाचे दोन थेंब तरी बरसू दे,या होरपळल्या जीवावर ! माझ्या विचाराचा कल्लोळ स्वाहा होत होता त्या प्रलयकर रुपात पण हे रूप भासत होते चंदनाच्या अरण्याचे बेफाम सुगंधाचे !

मेपल आणि पाईन्सच्या पानानी वेढलेला दूरचा किनारा, आणि ख्रिसमस ट्रीचे गोल गोल वळसे देत गेलेली, वळणानाही झुगारुन देऊन आभाळ कवेत घेणारी उंच झाड मला साद घालत होती. प्रीतीला घेऊन मी त्या किनाऱ्याशी जाताच तुषांराचे गोडस लाघावी विखूर पायाशी माजरीची पिलं घोटाळावी तशी विखुरलेली ! अंधाराचा या मध्यरात्री गडद रंगात नायगाऱ्याचे हळवे रूप खोलवर भिनून जाते अशा हळव्या सहवासात असताना अनोळखी मनाची स्पंदने व्यापणाऱ्या अनोळखी भावना वेगात चालत करुन येतात तेव्हा साऱ्या देहाचाच फुलोरा होऊन जातो. आरशासारख्या स्वच्छ आपल्याच प्रतिबिंबात आठवणी दाटून येतात गुलाबी फुलाच्या ताटव्यातून जाताना जगलेले सारे सुगंधी क्षण ओंजळीतून नायगाऱ्याच्या पायथ्याशी अलगद निसटून जातात

पहाटेच्या गारव्यात बोटीतून जाताना पून एकदा धाराचा साज अंगावर ! आणि बोटीतून जाताना इंद्रधनुष्याची कमान लाटेवर अलगद झेलत जीवनकळ्या घेऊन उभी होती कधीच न उमलण्यासाठी ! बोटीच्या वेगाबरोबर आठवत होता कवी कार्लसेंडबर्ग ! त्याच्या अंतर्मनाला जाणवणाऱ्या त्याच्या गुरुचे-अब्राहम लिंकनचे एक राजस सौंदर्य ह्या धाराना बिलगलेले मला दिसत होते त्या कवीच्या नजरेतून बघताना, कमळाच्या पानाची चांदीची ताट व्हावी आणि सतारीतल्या सरगमचे पडघम त्या पाण्याच्या नितांततेवर गर्जून निघावे व सरस्वतीच्या दरबारी रुजू व्हावे, असा हा सारा देखणा परिसर ! शब्दांच्या स्पर्शानीही मोडून जाईल इतका उत्कट, इतका गहिरा !

युद्धात शरणागती पत्करलेल्या सैनिकासारखी पण तरीही कणा ताठ ठेऊन ते क्षण मी अनुभवीत होते. व्याकूळ मनाची तडफडणारी जीवघेणी

मोकळ्या झालेल्या 'स्व' ला ह्या धाराचे, पाचूचे अर्थ एका अध्यात्मिक उंचीवर घेऊन जात होते कुठल्या ओंकाराचे देणे या फेसाळ धाराना लाभले होते कुणास ठाऊक ? सार जाणवण कोवळ वाटत होत

किनाऱ्याशी भेटलेली किमीको मला पुन पायथ्याशी भेटते.आनदाने बेहोष झालेले तिचे जपानी मन तिच्या भावसपन्नतेचे साक्ष देते होते. 'चादण्याचे देणे, तेथे तुझे माझे येणे.' अशी किमिको ! तिच्याबरोबर हातात हात घालून फिरताना देशाचा बधनकडा केव्हाच गळून पडल्याच्या होत्या,तिच्या सहवासात सध्याकाळच्या वेळचे अधाराचे गूढ वलय, त्याचा, मागमूसही उरलेला नसतो. मनाची उत्कट मनस्विता पाण्याच्या धारेतून व्यक्त करताना त्याची पडझड आठवतही नव्हती धो धो पडणाऱ्या आवाजाचे सगीत मानवी मनातले सदर्भ मोकळे करीत बेबद मुक्त होत पाण्यातला कुठला तरी दूरचा करूण आवाज हळूवारपणे आत झिरपत जात होता

रात्रीच्या रोषणाईत नायगरा, लाल, निळचा, पिवळ्या रंगाच्या लाटात सजलेला असतो धाराचे सुरेल रगीत नृत्यही सुरु झालेले. जवळच्याच ग्रीन व्हिक्टोरिया पार्कमधील ग्रीन हाऊसमधे Water dance च्या कार्यक्रमासाठी लोकाची रीघ लागलेली असते. मी प्रीति, रवि व प्रभा, सारेच ट्रॉलीत बसून माऊटेनवर जातो परीकथेत रगवलेल्या कथेप्रमाणे रगीत पाऊस, आणि ग्रीनरी ! थोड्याच वेळात सगीताच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे नृत्य सुरु होते कारज्याचे वेगवेगळे हावभाव जणू कथ्थक भरत नाट्यम सादर करीत आहे से वाटते चढत गेलेल्या नृत्याच्या ललकारी बरोबर पाण्याचे कारजे ही उच जाते, आणि हलकेच खाली उतरते एवढ्याशा डोळ्यात काय काय साठवाव ते कळत नाही शो सपतो पुन. एकदा ट्रॉलीने खाली उतरतो

रात्रीचे ११। वाजलेले असतात नायगारा रात्रीचे रग भरत असतो. विविधरगी बऱ्यापैकी लोकाची वर्दळ चढत्या रात्रीबरोबर पुन वाढत होती. याना या लाटाचे, धारेचे काय वाटत असेल ? तेही व्याकूळ मनाला आवर घालण्यासाठी आले असतील का ? की सहजच जगाच्या आसमतातल्या लहरी अगाभोवती लपेटून घ्यायला आले असतील ? माझ्या

मनात उगाचच प्रश्न फेर धरीत खरे तर आता इथेही एकाल वगैरे नसतोच तेवढ्यात कुणाचे तरी शब्द कानावर पडले "हा नायगारा दरवर्षी २५ तरी मृत्यू या धारात खेळवतो." शब्द दूरून आले होते पण वाटलं की माझ्या अनत उत्कट प्रार्थनातून माझ्या प्रेमाचे दोन थेंब तरी बरसू दे,या होरपळल्या जीवावर ! माझ्या विचाराचा कल्लोळ स्वाहा होत होता त्या प्रलयकर रुपात पण हे रूप भासत होते चदनाच्या अरण्याचे बेफाम सुगधाचे !

मेपल आणि पाईन्सच्या पानानी वेढलेला दूरचा किनारा, आणि ख्रिसमस ट्रीचे गोल गोल वळसे देत गेलेली, वळणानाही झुगारुन देऊन आभाळ कवेत घेणारी उंच झाड मला साद घालत होती प्रीतीला घेऊन मी त्या किनाऱ्याशी जाताच तुषाराचे गोंडस लाघावी विखूर पायाशी माजरीची पिल घोटाळावी तशी विखुरलेली ! अधाराचा या मध्यरात्री गडद रगात नायगाऱ्याचे हळवे रूप खोलवर भिनून जाते. अशा हळव्या सहवासात असताना अनोळखी मनाची स्पदने व्यापणाऱ्या अनोळखी भावना वेगात चालत करुन येतात तेव्हा साऱ्या देहाचाच फुलोरा होऊन जातो आरशासारख्या स्वच्छ आपल्याच प्रतिबिबात आठवणी दाटून येतात. गुलाबी फुलाच्या ताटव्यातून जाताना जगलेले सारे सुगधी कण ओंजळीतून नायगाऱ्याच्या पायथ्याशी अलगद निसटून जातात

पहाटेच्या गारव्यात बोटीतून जाताना पून एकदा धाराचा साज अगावर ! आणि बोटीतून जाताना इद्रधनुष्याची कमान लाटेवर अलगद झेलत जीवनकळधा घेऊन उभी होती कधीच न उमलण्यासाठी ! बोटीच्या वेगाबरोबर आठवत होता कवी कार्लसेंडबर्ग ! त्याच्या अंतर्मनाला जाणवणाऱ्या त्याच्या गुरुचे अब्राहम लिंकनचे एक राजस सौंदर्य ह्या धाराना बिलगलेले मला दिसत होते त्या कवीच्या नजरेतून बघताना, कमळाच्या पानाची चादीची ताट व्हावी आणि सतारीतल्या सरगमचे पडघम त्या पाण्याच्या नितातलेवर गर्जून निघावे व सरस्वतीच्या दरबारी रुजू व्हावे, असा हा सारा देखणा परिसर ! शब्दाच्या स्पर्शानीही मोडून जाईल इतका उत्कट, इतका गहिरा !

युद्धात शरणागती पत्करलेल्या सैनिकासारखी पण तरीही कणा ताठ ठेऊन ते कण मी अनुभवीत होते. व्याकूळ मनाची तडफडणारी जीवघेणी

एकच कळ - आत्यंतिक सुखाची, मनाच्या समाधीची ! एकदाच का होईना पण असा उतावीळ व्याकूळ करणारा उत्कट सुखाचा क्षण मी अनुभवत होते जीवनाची मोडतोड करणाऱ्या धारेतही सुख प्राप्त करुन देणाऱ्या या एकाच क्षणात आयुष्य उजळून निघत याच प्रत्ययकारिकत्व मला कळल होत या उत्कट पहाटेच्या धारामध्ये मला आठवत होत गायत्री स्तोत्र भोगान भुक्तत्वाचिर कालयते मोक्ष अवाप्नुयात, तपस्विभि कृत स्तोत्र स्नानकाले तुय पठेत् - या ओळीत दडलेले अर्थही नायगऱ्याच्या या जलआवेगा तबुडून जातात

भारतातून निघताना कशासाठी दूरदरहाआपण इथे आलो ? प्रश्न विरून गेलेला मनात, नी वाटल मन कुसकरण्यासाठी कुणाला द्यायच नसतं हे जस माहित 'होत तस ते कुणा काटयाच्या धाग्यात गुफायच नसत हेही ठाऊक होत तरी हे पारा निखळत मन नायगाऱ्याच्या एकेका धारेबरोबर उसवल जात होत फुलाच्या गारवा असलेल्या रागाण्याच्या एकेक ओळी कुणी तरी गात आहे आणि मी ते सूर घेऊन जातेय एवढ कळत होत सकाळच्या दुग्धधारा सुरु होतात, आणि मनात अनेक प्रसगाचे, घटनाचे, आठवणींचे धागे आणि त्याचे कधीच न विणता येणारे वस्त्र ! मनाच्या खोल तळातील मूक जाणिवेच्या कणावर नायगऱ्याच्या स्वच्छ बरसणाऱ्या धाराचे तुषार पेरीत मी नायगऱ्याचा निरोप घेतलेला त्या निरोपातून झालेल्या रोपावर मी ओळी लिहून टाकते.

गीत गाताना माझे
तू वाहू नको वेगाने
दव हुदक्यातूनी भरुनि
तू न्हाऊ नको सूराने
हे शब्द गहिवरलेले
— जे दुःख सनातन
हृदयातून माझ्या
तू येऊ नको दाटून ...

०	०

# निरोप

जगातल्या नऊ आश्चर्यांपैकी एक असा प्रचंड नायगरा बघून आल्यावर सगळे जगणेच फिके वाटू लागले नायगाऱ्याच्या कुठल्याच धारेने आम्ही स्वत:ला बांधुन घेऊ शकलो नाही मुक्त धारात मन बंदिस्त झाले ते आठवणीच्या रुपानं ! मॉंट्रीयलला परतल्यावर एक विचित्र हुरहुरीचा ताण आला होता. आता इथून भारतात जायचेय्, मुलांना भेटायचेय, घराला प्रवास कहाणी सांगायचीय् या सुखद भावनेबरोबरच एक उदासीही होती अनादी अनंत अशा माणसाच्या प्रदेशातून आता जायचेय्, ही इंद्रनगरी सोडून आपल्या देशात हीच भावना अधिक मूळ धरणारी होती आमची सवय झालेल्या या कॅनडाच्या घराला, माणसांना मात्र एक अनोखे उदासपण येणार हे मागे वळून न पाहताही समजत होते

इथले स्त्री पुरूष त्यांची चालण्यातली, बोलण्यातली, लयकारी, आणि आदब सारेच आठवत, आम्ही अदल्या रात्री बराचवेळ गप्पा करीत होतो। काही फ्रेंच गाणी टेप करून घेतलीत जेवण झाल्यावर वाईन्सची चव घेत, दिवस कसे पाखराच्या पंखासारखे भरकन उडून गेलेत ते आठवत होतो दुपारीच पुन. एकदा डोराल शॉपींग सेंटरला गेलो बाजूलाच ताज्या भाज्यांचं सुरेख प्रदर्शन भरलं होते माणसाच्या प्रसन्नत्तेन पुन एकदा सारं मॉंट्रीयल फिरून यावं असं वाटलं इथली वृद्ध माणस देखील प्रत्येक गोष्टीत रस घेतात. अगदी मुलांनाही त्यांच्या जाणीवानुसार वागू देतात. न्युजर्सीला प्रभाच्या एका मैत्रिणीकडे गेलो तेव्हा त्यांची मुलगी सज्यू हिला अपंगत्व जाणवू नये म्हणून पालक शिक्षक किती जपतात हे मी पाहिले होते. घरकामाला कुणी नाही हा प्रश्न कितीतरी भेडसावणारा, शिवाय अजिता म्हणाली तसे ड्रग्जची समस्या, स्त्रियांच्या घटस्फोटानंतरच्या मूक समस्या हे सारेच प्रश्न इथे असतानाही त्यासाठी ते प्रश्न सोडवण्यासाठी कितीतरी संस्था काम करतात प्रश्नावर उपाययोजना करणे यासाठी इथल्या संस्था कार्यक्षम असतात.

कॅनडातल्या लोकाचं आदरातिथ्य त्यानी केलेलं स्वागत, हे सारं अनुभवलं, त्यामुळे हे परदेशी लोक फार तुसडे असतात सेल्फ सेटरड् असतात, ही भावना खोटी ठरली प्रत्यक्ष अनुभवाने खऱ्या गोष्टी लक्षात येतात. वरवरच्या सस्कारानी घडलेली माणस सर्वदूर वेगवेगळी भासली तरी 'माणूस' तोच असतो

दुसरे दिवशी दुपारी पाच वाजता आम्हाला अेअर पोर्टवर पोहचायचे होते आम्ही निघालो लवकरच ! कारण चाळीसमैल दूर विमानतळ! आणि मधल्या अमृतसर प्रकरणामुळे चेकीग फारच कसून करीत होते बाबागाडीवर सामान घेऊन कितीतरी वेळ क्यूमधे उभे राहावे लागले चेकीग म्हणजे प्रत्येक वस्तू, उलगडून पाहिल्या गेली व्यवस्थित बॅगा लावलेले सामान पुन एकदा अस्ताव्यस्त होऊन गेले कशातरी बॅगा बद करून आम्ही चहा वगैरे घेतला विमान सुटण्या सबधीची सूचना आली आणि एकेक पॅसेजर काचेआड होण्यासाठी निघाले आमच्या बरोबर प्रभा व अनंतभाऊजी होते भारतातून येताना एक उत्सुकता होती देश बघण्याची माणस अनुभवण्याची ! जाताना, एक आगळा आनद होता मुलाना भेटण्याचा, कौलारू घराला पुन एकदा उत्साहाचा साज चढवण्याचा ! आमच्या बाजूलाच एक फ्रेंच बाई मुलाला निरोप द्यायला आली होती तिचे अश्रुपूर्ण डोळेच तिची मुलाबद्दलची उत्कटता व्यक्त करीत होती. आम्हालाही त्या दोघाना निरोप देणे अवघड झाले होते पण निघायला हवेच होते काचेआड होऊनही वरून हात, हलणारे मात्र दिसत होते. 'जाणे आणि येणे' या शब्दाचा खरा अर्थ मला या निरोपाच्या वेळी कळला. विमानाने टेकऑफ घेतला आणि आकाशाशी मैत्री करायला आम्ही कॅनडाचा निरोप घेऊन निघालो पुन. एकदा निरोपातले नवीन रोप लावण्यासाठी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६९२८
दि. ३।१२।९६
शाखा (स्थान प्रत)

REFBK-0025218